



# जनमाध्यम


paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार १८ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







## भारतात अंड्यांच्या किमतीत 30-40 टक्के घसरण

### मध्यपूर्वेतील तणावाचा भारतीय बाजारावर परिणाम

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-**देशभरात अंड्यांच्या किमतीत अचानक ३० ते ४० टक्क्यांची घसरण झाल्याने ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला असला तरी व्यापा-यांसाठी ही परिस्थिती चिंतेची ठरत आहे. या बदलामागे स्थानिक कारण नसून



मध्यपूर्वेतील वाढता भू-राजकीय तणाव हे मुख्य कारण असल्याचे समोर येत आहे. सध्या भारतीय पोल्ट्री उद्योगासाठी परिस्थिती अस्थिर बनली आहे. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे खाडी देशांकडे होणा-या अंड्यांच्या निर्यातीवर मोठा परिणाम झाला आहे. दरम्यान निर्यात ठप्प झाल्याने मोठ्या प्रमाणात अंडी देशांतर्गत बाजारात उपलब्ध झाली असून त्याचा थेट परिणाम किमतींवर झाला आहे.बाजारात अंड्यांची किंमत प्रतिअंडे सुमारे ७ रुपयांवरून घसरून ५ रुपयांपर्यंत आली आहे. म्हणजेच १०० अंडी सुमारे ५०० रुपयांत उपलब्ध होत आहेत. किरकोळ बाजारातही अंड्यांच्या दरात घट झाली असून, पूर्वी ८ ते ९ रुपयांना विकले जाणारे अंडे आता ५.५० ते ६ रुपयांच्या दरम्यान मिळत आहे. या घसरणीमागे मध्य पूर्वेतील वाढते तणावपूर्ण वातावरण कारणीभूत आहे. सुरक्षेच्या कारणांमुळे आणि वाहतूक मार्गांमध्ये अडथळे निर्माण झाल्याने संयुक्त अरब अमिरात, ओमान, कतार आणि बहरिन यांसारख्या देशांशी होणारा व्यापार मोठ्या प्रमाणात बंद झाला आहे.

**१ कोटी अंड्यांची निर्यात बंद-**उद्योगातील आकडेवारीनुसार, या संकटापूर्वी भारतातून खाडी देशांकडे दररोज सुमारे १ कोटी अंड्यांची निर्यात केली जात होती. विशेष म्हणजे भारतातील एकूण निर्यातयोग्य अंड्यांपैकी जवळपास ८० टक्के अंडी ही केवळ खाडी देशांकडे पाठवली जात होती. मात्र सध्या निर्यात थांबल्यामुळे हा मोठा साठा देशांतर्गत बाजारात आणला जात आहे.

## पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर एअरस्ट्राईक; 400 जणांचा मृत्यू

**कराची / वृत्तसंस्था-**इस्रायल-इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचा आज १८ वा दिवस आहे. अशातच पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात संघर्ष वाढला आहे. अफगाणिस्तानची राजधानी काबुलमध्ये पाकिस्तानने केलेल्या भीषण एअरस्ट्राईकमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे, सोमवारी मध्यरात्री हा प्रकार



घडला आहे.पाकिस्तानने केलेल्या एअर स्ट्राईकने काबुल येथील एक नशामुक्ती केंद्र उद्ध्वस्त झाले आहे. यात ४०० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर २५० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. पण पाकिस्ताने हे आरोप खोडून काढले आहेत. आम्ही कुठल्याही मानवी वस्तीवर हल्ला केलेला नाही, पाकिस्तानने म्हटले आहे.पाकिस्तानच्या या एअरस्ट्राईकमुळे काबुलच्या संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. मृत्यू झालेल्या व्यक्तींमध्ये अनेक रुग्ण आणि सामान्य नागरिकांचा समावेश असल्याचे तालिबान सरकारने म्हटले आहे.काबुलच्या एका नशामुक्ती केंद्रावर पाकिस्तानने हल्ला केला आहे. यात हास्पिटलचा मोठा भाग उद्ध्वस्त झाला आहे. मृतांमध्ये अधिक व्यक्ती रुग्ण होते. उपचारासाठी ते याठिकाणी आले होते, असे तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी म्हटले आहे. हास्पिटलचा मोठा भाग या हल्ल्यात उद्ध्वस्त झाला आहे. ढिगा-याखाली अनेक लोक गाडले गेले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. सुरुवातीला हा आकडा २५० सांगण्यात आला होता, मात्र अफगानच्या आरोग्य मंत्रालयाने मृतांची संख्या ४०० पर्यंत वाढल्याचा दावा केला आहे.

## अ.मंदा म्हात्रे यांना हृदयविकाराचा झटका

### ■ प्रकृती स्थिर ■ एकनाथ शिंदेंकडून विचारपूस

**मुंबई-**बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या भारतीय जनता पक्षाच्या आमदार मंदा म्हात्रे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांच्यावर मध्यरात्री तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली असून आता त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे हास्पिटलच्या सुत्रांकडून कळाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंदा म्हात्रे यांची काल रात्री प्रकृती खालावल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. तेथे तज्ज्ञ डाक्टरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्यावर आवश्यक वैद्यकीय उपचार आणि शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, शस्त्रक्रिया यशस्वी झाली असून त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. सध्या त्यांना तज्ज्ञांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले असून सर्व वैद्यकीय चाचण्यांचे अहवाल समाधानकारक आहेत.

## गुढीपाडव्यापूर्वी सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण

**जळगाव /प्रतिनिधी-** गेल्या काही दिवसांत सातत्याने वाढणा-या किमतींमुळे सोनं खरेदी करणं सामान्य ग्राहकांसाठी अवघड झालं होतं. मात्र आता परिस्थितीत काहीसा बदल दिसून येत आहे. मागील तीन दिवसांत सोनं आणि चांदीच्या दरात



लक्षणीय घट नोंदवली गेली आहे. त्यामुळे गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर दागिने खरेदी करण्याचा विचार करणा-यांना मोठा दिलासा मिळाला आहे.ऑल इंडिया सराफा असोसिएशन यांनी दिलेल्या माहितीनुसार आंतरराष्ट्रीय बाजारातील संकेत कमकुवत राहिल्यामुळे आणि अमेरिकन डॉलर मजबूत झाल्यामुळे मौल्यवान धातूंवर दबाव वाढला आहे. या परिस्थितीचा परिणाम देशांतर्गत बाजारातही दिसून आला असून सोनं आणि चांदीच्या किमती घसरल्या आहेत. या घसरणीचा सर्वाधिक परिणाम चांदीच्या दरांवर दिसून आला आहे. सर्व करांचा समावेश करून चांदीच्या किमतीत सुमारे ९,००० रुपयांची मोठी घट झाली आहे. त्यानंतर चांदीचा दर प्रति किलोग्राम २,५६,५०० रुपयांवर आला आहे. सोन्याच्या किमतींमध्येही सलग तिस-या दिवशी घट झाल्याचे चित्र दिसून आले आहे. सध्या सोन्याचा भाव अंदाजे १,६०,२५० रुपये प्रति १० ग्रॅम इतका नोंदवला जात आहे. मागील काही आठवड्यांत सातत्याने वाढलेले दर पाहता ही घट ग्राहकांसाठी दिलासादायक मानली जात आहे

## कोणत्याही वयाचे मूल दत्तक घेतल्यास मातृत्व रजा

**नवी दिल्ली-**सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी सांगितले की, आता कोणत्याही वयाच्या मुलाला दत्तक घेणा-या महिलेला १२ आठवड्यांची सुट्टी मिळेल. फक्त ३ महिन्यांपेक्षा कमी वयाच्या मुलाला दत्तक घेतल्यास सुट्टी देणे चुकीचे आहे. न्यायमूर्ती जे.बी. परदीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० शी संबंधित प्रकरणाची सुनावणी करत होते. यावेळी खंडपीठाने कलम ६०(४) असंवैधानिक ठरवत मुलाचे वय ३ महिन्यांपेक्षा कमी असण्याचा नियम रद्द केला. हमसानंदिनी नंदूरी यांनी या प्रकरणी जनहित याचिका दाखल केली होती. त्यांनी म्हटले होते की, वयाच्या आधारावर सुट्टी देणे चुकीचे आहे आणि हे संविधानाच्या अनुच्छेद १४ (समानतेचा अधिकार) चे उल्लंघन आहे. याव्यतिरिक्त, न्यायालयाने केंद्र सरकारला सांगितले आहे की, त्यांनी पितृत्व रजा (वडिलांची सुट्टी) देखील कायद्यात समाविष्ट करावी. न्यायालयाने म्हटले की, याचा कालावधी पालक आणि मुलाच्या गरजांनुसार निश्चित केला पाहिजे.

# 6 वीच्या मुलीवर ॲसिड हल्ला



## शिर्डी हादरले; विधानसभेत पडसाद

**शिर्डी/प्रतिनिधी :** साईबाबांचं जगप्रसिद्ध तिर्थक्षेत्र असलेल्या शिर्डीतील लोणी गावात संतापजनक घटना घडली असून शाळेत शिकणा-या १३ वर्षांच्या चिमुकलीवर ॲसिड हल्ला करण्यात आला आहे. या घटनेनं अहिल्यानगर जिल्हा हादरला असून थेट विधिमंडळात याचे पडसाद पाहायला मिळत आहेत. शिर्डीतील घटना अत्यंत निंदानजनक असून राज्यात कायदा व सुव्यवस्था आहे की नाही, असा सवाल आमदार नाना पटोले यांनी उपस्थित केला आहे. तर, मंत्री आदिती तटकरे, आमदार मनिषा कायंदे यांनीही या घटनेवरुन तीव्र संताप व्यक्त करत आरोपीला सोडलं जाणार नाही, असे सांगितले. आता, अहिल्यानगरचे पालकमंत्री तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घटनेवर प्रतिक्रिया दिलीय.

शिर्डीतील ॲसिड हल्ला प्रकरणाची मी माहिती घेतली आहे, १३ वर्षाची मुलगी आहे, रस्त्यावर थांबून त्या मुलाने तिच्यावर ॲसिड फेकलं. खरंतर ग्रामीण भाग आहे, त्याच्यामुळे तिथे जवळपास सीसीटीव्ही नाहीत. पण हा मुलगा गावातलाच असू शकतो, त्यामुळे पोलिसांचा तपास जलद गतीने सुरू आहे. पोलीस कसून तपास करत आहेत, आजच आरोपी पकडला जाईल, असे राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले. तसेच, अशा घटनांमध्ये जे आरोपी असतात त्यांना कठोरातील कठोर शिक्षा आणि कारवाई व्हायला हवी असे माझे वैयक्तिक मत आहे, असेही विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले. घडला प्रकार निंदनीय आहे, स्थानिक प्रशासन देखील तिथे आहे, लोणीमध्ये तिच्यावर (पान २ वर)

# माझ्याकडे मोठी माहिती



### ■ विमान दुर्घटनेवरुन रोहित पवारांचा गौप्यस्फोट
### ■ राष्ट्रवादीच्या आमदारांवरही जोरदार हल्लाबोल

**मुंबई/प्रतिनिधी :**अधिवेशनात अजित पवार यांच्या विमान आपघातची चर्चा व्हावी, यासाठी अनेक दिवसापासून आम्ही सगळेच प्रयत्न करत आहोत. परंतू अजूनही या मुद्यावर चर्चा करू दिली जात नाही असे मत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले. मी आत्ता विधानसभा अध्यक्ष यांची भेट घेतली आहे. उद्या या मुद्यावर चर्चा घेतली जाईल, असं ते म्हणाले आहेत, वाट बघूयात असे रोहित पवार म्हणाले.शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी हे सुद्धा अजित पवार यांच्या विमान अपघाता संदर्भात चर्चा व्हावी, यासाठी प्रयत्न करत आहेत. पण चर्चा होउ द्यायची नाही अस दिसत आहे. ज्च्ङ ला वाचवलं जात आहे, याच्या मागे कोणीतरी मोठा माणूस असल्याचे मत रोहित पवार यांनी व्यक्त केले.

मोठी माहिती माझ्याकडे आहे. अगदी काही माहिती आम्ही आत्ता समोर आणली आहे. सरकार काय पाउल उचलते हे बघू नाहीतर ती मोठी (पान २ वर)

## शिखर बँक घोटाळा प्रकरणी पवार कुटुंबियांना क्लीन चिट

**मुंबई/प्रतिनिधी :**गेल्या अनेक वर्षांपासून राज्याच्या राजकारणात चर्चेत असलेल्या




महाराष्ट्र राज्य सहकारी बँक कथित २५ हजार कोटी रुपयांच्या घोटाळा प्रकरणाची फाईल अखेर बंद झाली आहे. या घोटाळा प्रकरणात राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार, त्यांच्या पत्नी आणि विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्यासह ७० हून अधिक माजी संचालकांना पूर्णत: क्लीन चिट दिली आहे.आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणात सादर केलेला सी-समरी म्हणजेच क्लोजर रिपोर्ट न्यायालयाने अधिकृतपणे स्वीकारला आहे. तपास यंत्रणेला या कथित घोटाळ्यात कोणत्याही प्रकारचे ठोस फौजदारी पुरावे मिळाले नाहीत. त्यामुळे हे प्रकरण पुढे चालवण्याऐवजी ते कायमचे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. न्यायालयाच्या या निर्णयामुळे पवार कुटुंबावरील कायदेशीर आणि राजकीय टांगती तलवार आता कायमची दूर झाली आहे.हे प्रकरण साधारण (पान २ वर)

## इस्त्रायलच्या दबावामुळे इराणवर युद्ध लादले

### अमेरिकन अधिका-याचा मोठा गौप्यस्फोट, चुकीची माहिती दिल्याचा आरोप

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या इराणवरील धोरणामुळे घरचा आहेर मिळाला आहे. अमेरिकेच्या नॅशनल काउंटरटेररिझम सेंटरचे प्रमुख जो केंट यांनी मंगळवारी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला. इराणकडून अमेरिकेला कोणताही धोका नसताना केवळ इस्त्रायलच्या दबावाखाली येउन अमेरिकेने हे युद्ध पुकारले आहे, असा गंभीर आरोप केंट यांनी केला आहे. जो केंट यांनी सोशल मीडिया प्लॅटफ?र्मवर आपली भूमिका स्पष्ट केली. 'मी अत्यंत विचारपूर्वक हा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. इराणसोबत सुरू असलेल्या युद्धाला माझा पाठिंबा असू शकत नाही. इराणकडून आपल्या देशाला कोणताही धोका नव्हता. इस्त्रायल आणि अमेरिकेतील त्यांच्या



शक्तिशाली लॉबीच्या दबावामुळे आपण हे युद्ध सुरू केले,' असे केंट यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले.केंट यांनी ट्रम्प यांच्या २०१६, २०२० आणि २०२४ च्या निवडणूक प्रचारातील अमेरिका फर्स्ट धोरणाची आठवण करून दिली. 'जून २०२५ पर्यंत तुम्हाला याची पूर्ण कल्पना होती की, मध्य पूर्वेतील युद्धे म्हणजे एक प्रकारचा सापळा आहे. या युद्धांमुळे अमेरिकेच्या सैनिकांचा विनाकारण बळी जातो आणि आपल्या देशाची अफाट संपत्ती वाया जाते. तुमच्या पहिल्या कार्यकाळात तुम्ही कासिम सुलेमानीचा खात्मा केला आणि आयसीसला हरवले, पण देशाला कधीही न संपणा-या युद्धात ओढले नाही,' असे केंट यांनी म्हटले.

**चुकीच्या माहितीचा प्रसार केल्याचा दावा-**इराण युद्ध हे एका नियोजित चुकीची माहिती पसरवण्याची मोहीमेचा भाग असल्याचे केंट यांनी म्हटले आहे. इस्त्रायली अधिकारी आणि अमेरिकन (पान २ वर)



## शिंदेंची मोदींसोबत दीड तास चर्चा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**राज्यातील अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्ली दौ-यावर गेले असून, त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत दीड तास सखोल चर्चा केली. ही चर्चा सकाळी ११ ते १२,२० दरम्यान पार पडली. त्यानंतर १२:३० वाजता शिंदे यांनी संसदेचे सभापती ओम बिर्ला यांची देखील भेट घेतली आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज संसदेत दाखल झाले आहेत. यावेळी त्यांची केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री आणि अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरण रिजिजू यांच्याशी भेट झाली आहे. खासदार श्रीकांत शिंदे देखील एकनाथ शिंदे यांच्यासोबत उपस्थित होते. यावेळी रिजिजू यांनी एकनाथ शिंदे यांना 'श्रीकांत मेरा छोटा भाई है', असे म्हटले. त्यांच्या संभाषणाची आता जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, एकनाथ शिंदे कालपासून दिल्लीत असून, मित्रपक्षांमधील समन्वय, निवडणुकांतील जागावाटप तसेच काही मतदारसंघांमध्ये शिवसेनेला मिळालेल्या अपु-या सहकार्यामुळे झालेल्या पराभवाबाबतचा अंतर्गत अहवाल ते भाजपच्या केंद्रीय नेतृत्वासमोर मांडण्याची शक्यता आहे. तसेच संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेच्या खासदारांची एक महत्त्वपूर्ण बैठक दिल्लीत पार पडली. ही बैठक खासदार ड?. श्रीकांत शिंदे यांच्या निवासस्थानी घेण्यात आली होती. या बैठकीत अधिवेशनातील विविध कामकाज आणि पक्षाच्या भूमिकेवर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. शिवसेनेच्या खासदारांनी अर्थसंकल्पीय चर्चेत पक्षाची भूमिका कशी मांडायची यावर विचारविनिमय केला. याशिवाय, सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाबाबत सुरू असलेल्या न्यायालयीन लढाईचा आढावा घेण्यासाठी ते वकिलांची भेट घेणार असल्याची माहिती समोर येत आहे.

## बंगालमध्ये TMC ने 74 आमदारांचे तिकीट कापले: सर्व 294 उमेदवारांची घोषणा

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर, आता तृणमूल कॉंग्रेसच्या नेत्या आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पुढची पावलं टाकायला सुरुवात केली आहेत. कारण ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेत तृणमूलच्या सर्वच्या सर्व उमेदवारांची यादी एका झटक्यात जाहीर केली. पश्चिम बंगालमधील विधानसभेच्या २९४ जागांपैकी २९१ जागा तृणमूल कॉंग्रेस लढणार आहे. तर उर्वरीत तीन जागा त्यांचा सहकारी पक्ष भारतीय गोरखा प्रजातांत्रिक मोर्चा लढवणार आहे. देशाचं लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालसह तामिळनाडू आसाम, पुद्दुचेरी आणि केरळ या ५ राज्यात निवडणुका होत आहेत. प. बंगालमध्ये दोन टप्प्यात निवडणुका होत असून २३ आणि २९ एप्रिल रोजी मतदान तर ४ मे रोजी निकाल जाहीर होणार आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या भवानीपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत. ममता बॅनर्जींनी २०२१ मध्ये नंदीग्राम विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढली होती.



मात्र त्यावेळी भाजपच्या शुभेंदू अधिकारी यांनी त्यांचा पराभव केला होता. त्यानंतर ममता बॅनर्जीनी भवानीपूर विधानसभा मतदारसंघातून पोटनिवडणूक लढून पुन्हा विधानसभेत एन्ट्री केली होती. आता यावेळी त्यांनी नंदीग्रामऐवजी भवानीपूर मतदारसंघातूनच निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे. तर नंदीग्राममधून तृणमूलने पबित्रा कार्की यांना तिकीट दिलं आहे. महत्त्वाचं म्हणजे पबित्रा कार्की यांनी नुकताच भाजपमधून तृणमूलमध्ये प्रवेश केला आहे. त्याही पेक्षा महत्त्वाचं म्हणजे मागील २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत पबित्रा कार्की यांनी शुभेंदू अधिकारी यांच्या विजयात मोलाची भूमिका निभावली होती.

## 90 लाख शेतक-यांच्या खात्यात जमा होणार 2000 रूपये

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील लाखो शेतक-यांना आर्थिक दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा ८ वा हप्ता पुढील आठवड्यात थेट शेतक-यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित झाला असून, या हप्त्यासाठी रु . १७७४ कोटी निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील सुमारे ९० लाख ३४ हजार पात्र शेतक-यांना या निर्णयाचा लाभ



होणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांनी शेतक-यांना देण्यात येणा-या नमो शेतकरी महासन्मान निधीच्या ८ व्या हप्त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद विशेष लक्ष घालून उपलब्ध करून दिली असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने नमो शेतकरी (पान २ वर)




# जमिनीचे भाडे खर्च व कर्जाचे व्याज समाविष्ट करून शेतीपिकांना आधारभूत हमी भाव ठरविण्याची गरज -आ.संजय खोडके

## कृषी मालाच्या विक्री व विपणन पद्धतीवर विधानपरिषदेत अर्धातास चर्चा

**मुंबई/प्रतिनिधी :-** नापिकी व कर्जबाजारीपणामुळे अमरावती विभागात शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या चिंतेची बाब असून त्याची अनेक अर्थाने कारण मिमांसा केली जाते. ज्यामध्ये शेतकऱ्यांच्या कृषी मालाला योग्य हमीभाव मिळत नसल्याने सुद्धा शेतकरी नैराशेच्या गर्तेत अडकले असल्याचे दिसत आहे. शेतकऱ्यांच्या लागवडी खर्चापेक्षाही मालाला कमी भाव मिळत असल्याने आज शेती व्यवसाय करतांना शेतकऱ्यांसमोर अनेक आव्हाने उभी आहे. सध्याची एमएसपी काढण्याची पद्धत उत्पादन खर्च पूर्णपणे भरून काढत नाही, यासाठी स्वामिनाथन आयोगाच्या शिफारसी नुसार आज शेतीपिकांना आधारभूत हमी भाव ठरविण्याची गरज असून शासनाने जमिनीचा भाडे खर्च व शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे व्याज, अशा बाबीं लक्षात घ्यावात, यासाठी विद्यमान विक्री व विपणन पद्धतीमध्ये सुधारणा करून एमएसपी ठरविण्यासाठी केंद्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची मागणी आमदार - संजय खोडके यांनी राज्याविधिमंडळाच्या अधिवेशनातून केली आहे.

राज्यविधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विधानपरिषदेत झालेल्या अर्धातास चर्चेमध्ये आ.संजय खोडके यांनी अमरावती विभागातील शेती व शेतकऱ्यांच्या मागासलेपणाबाबतची कारणमीमांसा केली. त्यांनी सांगितले कि, आज नवीन युवक सुद्धा आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती व्यवसायाकडे वळत आहे. मोठ्या उमेदीने तो शेती पिकवत असून कापूस, सोयाबीन, हरभरा सारखे उत्पन्न काढत आहे. मात्र जेव्हा तो आपला कृषी माल विक्रीसाठी बाजारात आणत आहे. तेव्हा शेतकऱ्यांना अपेक्षित हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

केंद्रशासनाने शेतीमालांच्या आधारभूत किमती ठरवून नाफेड, एनसीसीएफ, सीसीआय सारखे खरेदी केंद्र सुरु केले आहेत. राज्यशासनाच्या वतीने याची अंमलबजावणी केली जाते. मात्र एमएसपी काढत असतांना अनेक त्रुट्या असल्याने त्यामध्ये दुरुस्त्या करण्याची गरज असल्याचे आ. संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले. आधारभूत हमीभाव ठरविण्यासाठी कृषी खर्च आणि मूल्य आयोग अर्थात सीएसीपी हे केंद्र सरकारच्या अंतर्गत कार्य करणारे मुख्य मंडळ आहे.

एमएसपी काढतांना बियाणे आणि खत यांच्या निविष्ठांची किंमत म्हणजेत ए -२ आणि शेतकऱ्यांनी जमिनीवर केलेला प्रत्यक्ष खर्च आणि कुटुंबाचे श्रम व मूल्य म्हणजेच (एफएल) असे दोन्ही खर्च मिळून सी-२ अशा पद्धतीने सर्वसमावेशक खर्चावर नफा जोडून किमान आधारभूत हमीभाव ठरविण्यात येतात. मात्र सध्याची एमएसपी काढण्याची पद्धत उत्पादन खर्च पूर्णपणे भरून काढत नाही, म्हणूनच शेतकऱ्यांना जमिनीचे भाडे खर्च आणि त्यांच्या कर्जावरचे व्याज हे त्यात समाविष्ट करून एमएसपी काढल्यास शेतकऱ्यांना त्यांची आधारभूत किंमत योग्य पद्धतीने मिळू शकणार आहे. यासाठीच आमचा लढा असून शासनाने याबाबत केंद्रशासनाकडे पाठपुरावा करावा. अशी मागणी करीत आमदार



संजय खोडके यांनी सभागृह दणाणून सोडले. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार शेतकऱ्यांना जमिनीचे भाडे आणि त्यांच्या कर्जावरचे व्याज म्हणजेच सी-टू पेक्षा ५० टक्के अधिक किंमत मिळणे अपेक्षित आहे , पण त्यापुढे सरकार जाऊ शकत नसल्याने आज खरी समस्या निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांचा कृषी माल काढणी नंतर पिकांचा आधारभूत किमती ठरविल्या जातात. परंतु जेव्हा खरीप हंगाम सुरु होते , तेव्हाच पिकांचे भाव ठरविण्याची गरज आहे . म्हणजेच शेतकऱ्यांना पिके निवडण्याचे पर्याय उपलब्ध होतील असे सुद्धा आ.खोडके यांनी सांगितले.

शासनाने मागच्या वर्षी ५ लाख ११ हजार ६५७ शेतकऱ्यांकडून ११ लाख मॅट्रिक टन पर्यंत खरेदी केली.असे सांगण्यात येत असले तरी, शेतकऱ्यांकडे पर्याय नाही. त्यांना त्यांच्या मनासारखे हमीभाव मिळत नसल्याने त्यांना नाईलाजास्तव आपला कृषीमाल शासनाच्या खरेदी केंद्रांवर अथवा बाजारात विकावा लागतो. म्हणून यामध्ये दुरुस्ती करून अधिकाधिक खरेदी केंद्र वाढविण्याची गरज आहे. यासाठी केंद्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची मागणी आ.संजय खोडके यांनी अधिवेशनातून केली आहे. यावर शासनाच्या वतीने उत्तर देतांना मंत्री संजय सावकारे यांनी सांगितले कि, शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य हमीभाव मिळण्यासाठी शासन सकारात्मक आहे. केंद्र सरकार किमान आधारभूत भाव ठरवत असून त्यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यशासन अंमलबजावणी करत असते. मागच्या वर्षीच्या ५६२ खरेदी केंद्राच्या तुलनेत यावर्षी ९३४ खरेदी केंद्र सुरु केले तसेच ज्या ठिकाणी आवश्यकता असेल, तेथे तपासणी करून केंद्र सुरु करण्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्या असल्याचे यावेळी मंत्री महोदयांनी सांगितले.

कृषी बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, म्हणूनच शासनाचे आधारभूत हमीभाव ठरविले जातात. त्यावरूनच बाजार समितीमध्ये खाजगी व्यापाऱ्याकडून सुद्धा शेतकऱ्यांना तेवढेच मिळते जुळते भाव ठरविले जातात. पण व्यापाऱ्यांनी थोडे जरी अधिक भाव वाढविले तर शेतकऱ्यांची तिकडे धाव होत असली तरी शासकीय खरेदी केंद्र मात्र सुरूच राहतात. शेतकऱ्यांनी शासनाचा जो चांगला भाव आहे, तोपर्यंत आपला कृषी माल शासनाकडे देण्याची विनंती सुद्धा शेतकऱ्यांना केली जात असल्याचे मंत्री संजय सावकारे म्हणाले. तसेच आ. संजय खोडके यांनी शेतकऱ्यांच्या कृषी मालाला आधारभूत हमीभाव ठरविण्याच्या सिस्टीममध्ये जी सुधारणा करण्याची सूचना केली आहे,जी चिंता व्यक्त केली आहे, त्याबाबत शासन सकारात्मक असून केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू असे , उत्तर मंत्री संजय सावकारे यांनी शासनाच्या वतीने सभागृहात दिले आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### ६ वीच्या मुलीवर ॲसिड

उपचार सुरू असून मुलगी घाबरलेली आहे. प्राथमिक माहितीनुसार, ॲसिड फेकत हे कृत्य केलंय. सीसीटीव्हीची अद्याप माहिती आढळलेली नाही. मात्र, स्थानिक पोलीस प्रशासनाला निर्देश दिले आहेत, अधिकाधिक माहिती घ्यावी, अशी प्रतिक्रिया मंत्री आदिती तटकरेंनी दिली. मुलीच्या कुटुंबीयांसोबत बोलून माहिती घेउ, अद्याप माहिती घेतली नाही. आमची मनोधैर्य योजना आहे, त्यातून आर्थिक सहाय्य देण्याच्या प्रस्तावाची मागणी केली आहे. या घटनेवर आम्ही बारकाईने लक्ष ठेउन आहोत, पीडीता असेल, आई, मावशी असेल त्या घाबरलेल्या आहेत. मुलीवर उपचार करत नंतर इन्ट्रागेशन केलं जाईल. आरोपीसंदर्भात तपास सुरु आहे, सीसीटीव्ही संदर्भात चौकशी सुरू आहे. आरोपीला सोडलं जाणार नाही, कडक कारवाई केली जाईल, असेही आदिती तटकरे यांनी सांगितलं.

### माझ्याकडे मोठी माहिती

माहिती समोर आणू असेही रोहित पवार यावेळी म्हणाले. अजित पवार यांच्या सोबत सत्तेत असणारे किती स्मरण पत्र देणार, सत्तेत असून तुम्ही आपल्या माणसाला न्याय देउ शकत नाही तुम्ही इतरांना काय न्याय देणार? असा सवाल रोहित पवारांनी केला. सुरवातीपासून मी सांगितलं होत, यात काही मी चुकीचा केलं नाही. क्क ने मला दोन वेळेस बोलवलं होत. यंत्रणाना सुद्धा दबाव होता. पण आम्ही पक्षासोबत आणि विचारसोबत राहिलो आणि न्यायालयाचे धन्यवाद मानतो. यामध्ये आम्ही काही चुकीचा केलं नव्हतं म्हणून क्लीन चिट दिल्याचे रोहित पवार म्हणाले. अजित पवार यांचा विमान अपघात २८ जानेवारीला झाला आणि महाराष्ट्राने लोकनेता गमावला. कारण या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. २९ जानेवारीला बारामतीसह संपूर्ण महाराष्ट्राने अजितदादांना अखेरचा निरोप दिला. ही घटना घडल्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार आणि अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार यांनी या प्रकरणी घातपाताचा संशय व्यक्तकेला आहे. व्हिएसआर कंपनी आणि डीजीसीएच्या अहवालाबाबतही प्रश्न उपस्थित केले आहेत.

### शिखर बँक घोटाळा प्रकरणी

२०११-१२ च्या काळातील आहे. शिखर बँकेने राज्यातील अनेक सहकारी साखर कारखान्यांना नियमबा कर्जवाटप केले आणि नंतर हे कारखाने अत्यंत कमी किमतीत विकून बँकेचे २५ हजार कोटींचे नुकसान केले, असा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणाचे पडसाद निवडणुकांमध्ये उमटले होते. अजित पवार आणि पवार कुटुंबावर सातत्याने आरोप करण्यात आले होते. मात्र, दीर्घकाळ चाललेल्या तपासानंतर अखेर यात कोणताही गुन्हेगारी कट किंवा अफरातफर झाल्याचे पुरावे समोर येउ शकले नाहीत.

### इस्त्रायलच्या दबावामुळे इराणवर

मीडियातीलकाही घटकांनी ट्रम्प यांची दिशाभूल केली. 'ज्याप्रमाणे आपल्याला इराक युद्धाच्या संकटात ओढले गेले होते, त्याच रणनीतीचा वापर करून आता इराणविरोधात युद्ध लादले गेले आहे. हा एक खोटेपणा आहे,' असा खळबळजनक दावा त्यांनी केला.जो केंट हे स्वतः एक माजी सैनिक असून त्यांनी ११ वेळा युद्धभूमीवर सेवा बजावली आहे. त्यांची पत्नी शॅनन या देखील एका युद्धात शहीद झाल्या होत्या. 'एक गोल्ड स्टार पती म्हणून, ज्याने आपली पत्नी एका इस्त्रायल युद्धात गमावली, मी अमेरिकेच्या पुढच्या पिढीला अशा युद्धात ढकलण्यास पाठिंबा देउ शकत नाही ज्याचा देशाला कोणताही फायदा नाही,' असेही केंट म्हणाले.

***राजकीय पार्श्वभूमी-*** जो केंट यांची जुलै २०२५ मध्ये या पदावर नियुक्ती झाली होती. ते कट्टर उजव्या विचारसरणीच्या गटांशी संबंधित मानले जातात. मात्र, ट्रम्प प्रशासनाच्या सध्याच्या आक्रमक इराण धोरणामुळे त्यांनी अवघ्या काही महिन्यांतच पायउतार होण्याचा निर्णय घेतल्याने ट्रम्प यांच्या फङ्करेन पङ्कलिसीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

### ९० लाख शेतक-यांच्या खात्यात

महासन्मान निधी योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतक-यांना थेट आर्थिक सहाय्य देउन शेतीचा वाढता खर्च कमी करणे आणि शेतक-यांचे उत्पन्न वाढविणे हा मुख्य उद्देश आहे. प्रधानमंत्री किसान योजनेतून प्रति शेतकरी दरवर्षी रु . ६००० अनुदान दिले जाते. त्यात राज्य शासनाकडून आणखी रु. ६००० इतकी भर घालण्यात येत असून, या दोन्ही योजनांच्या माध्यमातून शेतक-यांना प्रतिवर्षी रु . १२००० इतकी थेट आर्थिक मदत मिळते. या हप्त्यासाठी १७७४ कोटी निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली असली तरी प्रत्यक्षात १८२० कोटी इतकी रक्कम शेतक-यांना देण्यात येणार आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत आतापर्यंत सात हप्ते वितरीत करण्यात आले असून, आठवा हप्ता हा ऑगस्ट २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीसाठी दिला जाणार आहे. केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २२ वा हप्ता दिनांक १३ मार्च २०२६ रोजी वितरीत केल्यानंतर राज्य शासनानेही तत्काळ हालचाल करत नमो योजनेचा आठवा हप्ता वितरीत करण्याची प्रक्रिया गतीने पूर्ण केली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतक-यांना थेट आर्थिक दिलासा मिळणार असून, शेतीसाठी लागणारा खर्च भागविण्यास मोठी मदत होणार आहे.आठव्या हप्त्यामुळेही शेतक-यांना मोठा दिलासा मिळणार असून, ग्रामीण भागातील अर्थचक्र अधिक मजबूत होईल असे मत दत्तात्रय भरणे यांनी व्यक्तकेले.

### मनपाच्या आमसभेमध्ये विषय

आली. यासाठी गटनेतांकडून सदस्यांची नावे मांगविण्यात आली होती. गटनेतांकडून मिळालेल्या नावानुसार समिती सदस्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस आणि युवा स्वाभिमान पार्टीचे वर्चस्व पाहायला मिळाले आहे. भाजपाचे तीन-तीन ,काँग्रेसचे दोन- दोन, युवा स्वाभिमान, राष्ट्रवादी, एमआयएम, शिवसेना, बसपा गटांचे एक एक सदस्यांचा सहभाग आहे.

स्वच्छता समितीमध्ये महिला नगरसेविकांचा सहभाग-

शहरातील स्वच्छतेच्या मुद्द्यावर स्वच्छता समिती बनविण्यात आली होती. यामध्ये एकही महिला नगरसेविकांचा सहभाग न झाल्याने त्यांनी आक्षेप घेतले होते. या समितीमध्ये सभापती अविनाश मार्डीकर, गटनेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल, प्रशांत देशपांडे, भोजराज काळे, दिनेश बुब, संजय हिंगासपुरे, संजय नरवणे, नूतन भुजाडे, सुरेखा लुंगारे, मिलिंद चिमोटे, बबलू शेखावत ,ज्ञानेश्वर नाना आमले ,प्रशांत वानखडे, अजय जैस्वाल ,शेख हमीद शेख वायद, नजीम खान ,मंगेश मनोहरे, डॉ. राजेंद्र तायडे यांचा सहभाग आहे.

**विधी समिती-** मनपा विधी समितीमध्ये स्नेहा आशीष लुल्ला,मनीष बजाज, अर्चना अशोक पांडे,धीरज हिवसे,मोहम्मद रेहान मोहम्मद यासीन,सुनिता लोणारे, मधुरा कहाले,शारदा खोंडे,बिबी बतुल ताहेर शाह यांचा सहभाग आहे.

**महिला बाल कल्याण समिती-** महिला व बाल कल्याण समितीमध्ये विद्या शिवदत्त माटे, ममता आवारे,रजनी राजेश डोंगरे,डॉ. अर्चना आत्राम,लुबना तनविर सै. मखदूम,नुतन भुजाडे, सुरेखा लुंगारे,लता देशमुख,डॉ. मरीयम राराणी यांचा सहभाग आहे.

**वृक्ष प्राधिकरण समिती-** वृक्ष प्राधिकरण समितीमध्ये रेखा पंजाबराव तायवाडे,चंदु उर्फ चंद्रकांत खेडकर,महेश धनराज मुलचंदानी,माधुरी ठाकरे,संजय नरवणे,बंडू उर्फ प्रदीप हिवसे,मालता गवई, अनिता काळे,शेख हमीद शेख वाहेद यांचा सहभाग आहे.

**शहर सुधार समिती-** शहर सुधार समिती मध्ये संजय रामकृष्ण गव्हाळे,गुड्डू उर्फ प्रशांत धर्माळे, सुमती विजय ढोके,संजय शिरभाते,शाह अफसर जहा सादिक,राधा कुरील,बंडू उर्फ प्रदीप हिवसे, लवीना हर्ष,कुबरा बानो करामत अली सहभागी आहे.

**शिक्षण समिती -** महानगरपालिकेच्या शिक्षण समिती मध्ये सचीन किसनराव वैद्य,प्रमोद महल्ले,प्रिती हर्षल रेवणे,विशाल उर्फ विक्की वानखडे,सुनिता भेले,ऋषीकेश देशमुख,पुजा अग्रवाल,वंदना मडघे,फराह नाज सैयद मिर आहद अली सहभागी आहे.

### पेपरफुटी प्रकरणातील दुसराही

परिषद प्रशासनाने निलंबनाचा आदेश काढला.

निलंबित शिक्षक सुशिल अभ्यंकरला आता चिखलदरा पंचायत समिती शिक्षण विभागात मुख्यालयातच राहण्याचे आदेश देण्यात आले असून परवानगी शिवाय हलता येणार नाही. दरम्यान या प्रकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे तर या पेपरफुटी प्रकरणामुळे पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

चिखलदरा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बी.आर. गिरासे अंजनगाव सुर्जी पंचायत समितीत कार्य करीत असताना गिरासे यांना कोणत्याही प्रकरणात फसवण्यासाठी कुटनीतीचा वापर केला होता. नविन आदेशानुसार निलंबित अभ्यंकर यांना आता त्याच अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली चिखलदरा पंचायत समिती शिक्षण विभागात कार्य करावे लागेल. त्यामुळे आता बी.आर. गिरासे निलंबित विस्तार अधिकारी सुशिल अभ्यंकर यांना कशी वागणूक देतात याकडे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### 'गरीबांच्या झोपड्यांवर बुलडोझर;

मात्र ते करताना मानवी मूल्यांचा विचार होणे अत्यावश्यक आहे. कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता गरीबांच्या घरांवर बुलडोझर चालविणे ही अत्यंत क्रूर व अमानुष पद्धत आहे. प्रशासनाने या कुटुंबांच्या पुनर्वसनाचा विचार न करता केलेली ही कारवाई अन्यायकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी तानाजी नाकट मित्र परिवाराच्या वतीने नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले. निवेदनात आठवडी बाजार परिसरातील कारवाईत नुकसान झालेल्या सर्व कुटुंबांचे पंचनामे करून त्यांना तात्काळ आर्थिक नुकसानभरपाई द्यावी, तसेच त्यांच्या पुनर्वसनाबाबत ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

'प्रशासनाने आठ दिवसांच्या आत नुकसानभरपाई व पुनर्वसनाबाबत निर्णय घेतला नाही, तर गोरगरिबांच्या न्यायासाठी मोठे व तीव्र आंदोलन उभारले जाईल,' असा स्पष्ट इशारा तानाजी नाकट यांनी दिला.

या प्रकरणामुळे शहरात प्रशासनाच्या कारवाईबाबत संतापाची लाट पसरली असून, गरीबांच्या निवाऱ्याचा प्रश्न आता चांगलाच चर्चेत आला आहे. प्रशासनाने या संवेदनशील विषयाकडे तातडीने लक्ष देऊन न्याय देण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### मनपा व्यापारी संकुल भाडे व

घेतला जाईल. महानगरपालिकेच्या पाच प्रमुख व्यापारी संकुलांमधून अधिकांश दुकानांची मुदत संपलेली आहे. आता नूतनीकरण करून भाड्यांची दरे निर्धारित करण्याची मागणी जोर धरत आहे. विरोधी पक्षनेता विलास इंगोले, स्वाकृत नगरसेवक अनिल अग्रवाल, मिलिंद शिंदे, बबलू शेखावत, संजय शिरभाते, नगरसेवक शेख हमीद नजीब खान व राशीद अली यांनी प्रशासन राज मध्ये व्यापारी संकुलांसाठी बनविण्यात आलेल्या समितीमध्ये कोणते विशेष योगदान होते यांची माहिती सर्वांसमोर ठेवण्यास सांगितले. त्यांचे म्हणणे होते की भाडे वृद्धीसाठी ज्या शिफारशी देण्यात आल्या आहे त्या सध्याच्या बाजारभावाच्या हिशोबाने कमी आहे. यामुळे समितीच्या शिफारशींना मान्य नाही केले जाऊ शकत. यावर पुन्हा विचार व्हावा. यामुळे समितीच्या शिफारशींना स्थगिती देण्यात आली. मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी विचार करण्याविषयी स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, मंगेश मनोहरे, चंदू खेडकर, एड. प्रशांत देशपांडे, भोजराज काळे ,राधा कुरील,ज्ञानेश्वर उर्फ नाना आमले, मनीष बजाज यांनी मत मांडले. इतर विषयांवर आमसभे मध्ये चर्चा करण्यात आली.

### स्वीकृत नगरसेवक सय्यद

सांगितले की आयकॉन कंपनी द्वारा मनुष्यबळ पुरविण्याचे कंत्राट कंत्राटवर त्यांनी ८ एप्रिल २०२२ रोजी स्वाक्षरी केली होती. २५ मार्च २०२२ रोजी त्यांच्याशी कोणताही करार झाला नाही. कंपनीने त्यांना स्वाक्षरी करण्यासाठी प्राधिकृत केले. आणि शाखा प्रबंधनाची जबाबदारी दिली. कंपनीने २९ जून रोजी मनपाला हे सूचित केले. ३१ जानेवारी रोजी त्यांनी राजीनामा दिला. ते मनपाचे कंत्राटदार नाही. मनपा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले की सै.मुनज्जर कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी आहे. त्यांनी राजीनामा दिला आहे पण कंपनीने मनपाला अजून पर्यंत याची माहिती दिली नाही. एकतरफा राजीनामा असल्याचे बोलले जात आहे. मनपा आयुक्तांच्या या निर्णयामुळे एमआयएमच्या अडचणी आता वाढल्या आहे. या पूर्वी मीरा कांबळे यांनी बंडखोरी करून युवा स्वाभिमान मध्ये प्रवेश केला. आता स्वीकृत नगरसेवक सै.मुनज्जर यांचे पद रद्द करण्यात आले.

### नांदगाव केंद्रावर शासकीय चना

रोहनेकर, संचालक विजय पाटेकर, प्रभाकर काळमेघ, सुरेंद्र खापरी, संजय देवतळे, गजानन ढवळे, देवेंद्र काळपंडे, बळीराम वाट यांच्यासह सचिन रिठे ,मनीष सावदे ,समीर पाटील, प्रमोद ठाकरे ,संस्थेचे व्यवस्थापक अमोल खंडार, स्वप्निल रिठे ,शाम कणसे ,गौरव टोंगळे या कर्मचाऱ्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

### मोर्शीतील अर्धवट पुलासाठी

केल्यामुळे काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. याबद्दल विविध सामाजिक संघटनेच्या वतीने अर्धवट पूल बांधकामासाठी आंदोलने करण्यात आले. मात्र कोणत्याही प्रकारची शासन प्रशासन स्तरावर दखल घेतल्या गेली नाही. शेवटी आज केलेल्या आंदोलनाची दखल घेत राष्ट्रीय महामार्गाच्या कार्यकारी अभियंता यांनी १७ एप्रिल २०२६ पर्यंत पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्यावर तूर्तास आंदोलन मागे घेण्यात आले.या आंदोलनात श्यामसुंदर बेलसरे ,भूषण कोकाटे ,मिलिंद कांबळे या पदाधिकाऱ्यांसह शेकडो कॉंग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### पोलिसांनी २४ तासांत लावला

मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी सहा.पो. अधिकारी गजानन सोनवणे यांनी तातडीने तपास सुरू केला. पोलीसांना सदर अल्पवयीन मुलगी दर्यापूर-अमरावती रोडवरील खोलापूर जवळील धामणगाव येथे एकटी आढळून आली. पोलिसांनी तिला ताब्यात घेऊन आईच्या सुपूर्द केले. सदर प्रकरणात अल्पवयीन मुलीचा छडा अवघ्या चोवीसतासाचे आत लावल्याने मुलगी सुखरुप घरी आली. कुटुंबीयांनी पोलीसांचे कौतुक करत आभार मानले.

### जिल्हा नियोजनचा निधी २५ मार्चपूर्वी

यांनी जिल्हा नियोजनचा निधी व्यपगत होऊ नये, यासाठी तातडीने निधी आहरित करण्यात यावा, असे सांगितले. जिल्हा कोषागार अधिकारी शिल्पा पवार यांनी व्हीपीडीए पद्धतीची माहिती दिली. याबाबत माहिती आणि मदतीसाठी स्वतंत्र यंत्रणा असल्याचे सांगितले.

### परिवहनेत्तर नवीन वाहनांसाठी

नोटीस बोर्डवर प्रदर्शित करण्यात येईल. एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोनपेक्षा जास्त अर्ज आलेल्या यादीमधील पसंती क्रमांकासाठी ज्यांनी अर्ज केला आहे, अशाच अर्जदारांनी दि. २३ मार्च २०२६ रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत त्या क्रमांकासाठी पसंती क्रमांक शुल्काच्या डिमांड ड्राफ्ट व्यतिरिक्त जादा रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट बंद लिफाफ्यात सीलबंद करून खिडकी क्रमांक - २५ वर जमा करावे.

एकाच पसंतीक्रमांकासाठी दोन किंवा दोनापेक्षा जास्त अर्ज प्राप्त होऊन सीलबंद लिफाफ्यात सादर केलेल्या जादा रक्कमेचा डिमांड ड्राफ्टधारकांनी दि. २३ मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजता प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या दालनात उपस्थित रहावे. लिलावासाठी उपस्थित राहणा-या अर्जदाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने ओळखपत्र व प्राधिकारपत्रासह हजर रहावे. कार्यालयात सादर झालेले जादा रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट अर्जदारासमोर उघडण्यात येतील. ज्या अर्जदाराने जास्त रक्कमेचा ड्राफ्ट सादर केला असेल, त्याला तो पसंती क्रमांक देण्यात येईल व उर्वरित कमी रक्कमेचा ड्राफ्ट संबंधित अर्जदारांना परत देण्यात येईल. तसेच, विहित वेळेत अनुपस्थित अर्जदारांचा कुठलाही प्रकारचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. पसंती क्रमांकासाठी कोणत्याही अर्जदारास दुरध्वनी, भ्रमणध्वनी अथवा एसएमएस केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी केले आहे.

### चांगापूर हनुमान मंदिरात

या कारवाईत जलद प्रतिसाद पथकाचे अधिकारी व कमांडो, डॉग स्कॉड, बीडीडीएस पोलीस निरीक्षक सोनाली गुल्हाने, उपनिरीक्षक नरवणे, स्टॉप, निरीक्षक गाडगे नगर स्टेशन प्रभारी गोरखनाथ जाधव,आरसीपी पथक व चांगापूर संस्थांचे व्यवस्थापक श्यामलाल लड्ढा, दीपक शर्मा, श्यामजी शर्मा ,जयंत पांडे आणि स्टाफने सहभाग घेतला.आपसात समन्वय साधून मॉक ड्रिल यशस्वीरित्या पार पाडली. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त श्याम घुगे, गणेश शिंदे, रमेश धुमाळ, सहायक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या निर्देशानुसार ही मॉक ड्रिल घेण्यात आली.

### ८ घरगुती गॅस सिलेंडर जप्त

अशात घरगुती सिलेंडरचा कमर्शियल वापर करणाऱ्यांवर तहसीलदार अभय घोरपडे यांच्या नेतृत्वात कार्यवाही केली जात आहे. तपासणी अभियान सुरू आहे. निरीक्षण अधिकारी प्रवीण भागवत आपुर्ती निरीक्षक साधना राऊत यांनी शहरातील हॉटेल, चहा टपरी, खाद्यपदार्थांच्या गाड्या रेस्टॉरंट मध्ये तपासणी केली आणि आठ सिलेंडर जप्त केले. या कारवाई मुळे एकच खळबळ उडाली आहे. घरगुती सिलेंडरचा कमर्शियल वापर न करण्याचे आवाहन तहसीलदार घोरपडे यांनी केले आहे.

### चहा कॅन्टीनच्या आड एमडी

कॅन्टीन मधून ड्रग्स विकली जात आहे. यावरून पथकाने तेथे धाड मारून २३.५३० ग्रॅम एमडी ड्रग्स जप्त केली. आरोपी महेश राजू खोडे कॅन्टीन मधून ड्रग्स विकताना सापडला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ३ लाख ५२ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पीएसआय गजानन सोनुने,दीपक सुंदरकर, सुनील लासुरकर, अतुल संभे, सुरज चव्हाण, राजीक रायलीवाले यांनी कारवाई केली.

**सायटेशन / जाहिरनामा**

**विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. १७७/२०२६ ने.ता. ०८/०४/२०२६

**अर्जदार- माला रमेश वाघाळे, वय-५७ वर्ष, व्यवसाय - घरकाम**
**रा. गधेघाटपूरा मोर्शी, ता. मोर्शी, जि. अमरावती.**

**विरूध्द**

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण** दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचा भाऊ **नामे रमेश महादेवराव चौधरी** हे **दिनांक २४/१०/२०२२** रोजी त्यांचे राहते घरी मोर्शी, ता.मोर्शी, जि. अमरावती येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरील प्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

शिक्का

आदेशानुसार
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय, मोर्शी.**

महाराष्ट्र शासन
**महसूल व वन विभाग**
**तहसिलदार, चांदुर बाजार यांचे कार्यालय**
**Email-tah.chanduRz@gmail.com**

व्रक. प्रस्तु -३ दिनाक- १६/३/२०२६

**-ः जाहिर नोटीस ः-**

ज्याअर्थी, या महसुल न्यायालयात प्रकरण क्रमाका रा.मा.क्र.एम.सी./रा./५ कोदोरी २०२५-२६ प्रकरणात
**अर्जदार ः-** १. निर्मला किसन घोडेस्वार
२. मनीष किसन घोडेस्वार
३. संजय किसन घोडेस्वार
४. सतीश किसन घोडेस्वार
सर्व रा. कोदोरी ता चांदुर बाजार जि. अमरावती
**गैर अर्जदारः-** १. शामा जाझाजी, २. शामा लक्ष्मण

अर्जदार यांचे विनंती अर्जाचे अनुषंगाने अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचे विरुद्ध जमीन महसूल संहितेचे कलम १५५ नुसार अर्ज सादर केला असून गैरअर्जदाराचे नाव सातबारा मधील इतर अधिकारातून कमी होणेबाबत प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.त्याअर्थी, गैरअर्जदार अथवा इतर कोणास आक्षेप तथा हरकत घ्यावयाची असेल त्यांनी जाहिरात प्रसिध्दी दिनांकापासुन ३० दिवसाच्या आत या कार्यालयात हरकत आक्षेप स्वतः किंवा निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहून दाखल करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांच्या तथा हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

**नायब तहसिलदार**
**चांदूर बाजार**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, १८ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# 'ओडीएफ प्लस दर्जा टिकवण्यासाठी शाश्वत स्वच्छतेचा ध्यास घ्या' : सीईओ अर्पित चौहान

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**'ओडीएफ प्लस दर्जा टिकवण्यासाठी शाश्वत स्वच्छतेचा ध्यास घ्या' असे प्रतिपादन जि प चे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी केले. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा– २ अंतर्गत ओडीएफ प्लस मॉडेल व्हिलेज आणि दृष्यमान स्वच्छता या विषयावर आयोजित जिल्हास्तरीय एक दिवसीय कार्यशाळा नियोजन भवन येथे (दि. १७) संपन्न झाली. कार्यशाळेत उपस्थित सरपंच आणि ग्राम पंचायत अधिकारी यांना उद्देशुन सीईओ चौहान यांनी वरील उद्गार काढले.**



पुढे बोलतांना ते म्हणाले, जिल्ह्यातील ज्या गावांनी हागणदारी मुक्त होऊन ओडीएफ प्लस आणि मॉडेल हा दर्जा प्राप्त केला आहे त्यांचे अभिनंदन करुन हा दर्जा टिकवण्यासाठी शाश्वत स्वच्छतेचा ध्यास घेण्याचे आवाहन केले. यासाठी गावातील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाचे योग्य नियोजन तसेच कचऱ्यापासून खत निर्मिती यांसारख्या उपक्रमांचा अंगीकार करण्याचे निर्देश त्यांनी दिले. उत्कृष्ट काम करणाऱ्या सरपंच व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे विशेष कौतुक करून ही गावे आणि या गावांचे शिल्पकार म्हणुन पुढे येणारे सरपंच- सचिव हेच इतरांसाठी दिशादर्शक ठरतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशील पाटील यांनी केले. यावेळी मंचावर सहाय्यक गटविकास अधिकारी अविनाश ठाकूर, सहाय्यक प्रशासन अधिकारी विवेक भुयार तसेच जिल्हा क्षमता बांधणी तज्ज्ञ प्रफुल्ल काळे यांची उपस्थिती होती.

कार्यशाळेत ओडीएफ प्लस मॉडेल व्हिलेज संकल्पना, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, सेग्रिगेशन शेड, नाडेप खत खड्डे, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा कक्षाचे राम श्रृंगारे, प्रफुल्ल काळे, तसेच प्रशिक्षक प्रभू कांबळे व प्रवीण पट्टेबहादुर यांनी विषयाची मांडणी केली.

यावेळी प्रख्यात शाहीर धम्मानंद उर्फ उत्तम इंगोले व त्यांच्या संचाने सांडपाणी व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन व प्लास्टिक निर्मूलन या विषयांवर भारुण, वासुदेव, लावणी इत्यादी लोक कलेच्या माध्यमातुन प्रभावी सादरीकरण केले आणि उपस्थितांची मने जिंकले.

कार्यक्रमादरम्यान सीईओ अर्पित चौहान यांच्या हस्ते माहिती पुस्तिका आणि पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले. या प्रचार साहित्यातुन गावात शाश्वत स्वच?छता राखण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींची माहिती देण्यात आली.

### 'जलमहोत्सव' साजरा करण्याचे आवाहन

या कार्यशाळेत जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात सुरू असलेल्या जल-महोत्सव उपक्रमाची माहिती देण्यात आली. ८ मार्चपासून जिल्ह्यात जल-महोत्सव पंधरवडा आयोजित करण्यात आला असून यामध्ये लोकांनी सहभागी होऊन गावात उपक्रम राबविण्याचे आवाहन करण्यात आले. जल जीवन मिशन च्या पुष्पलता अफुने, अभय तायडे यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली.

# भूमिपुत्र कडून १९ मार्चला अन्नत्याग आंदोलन

■ प्रतिनिधी | वाशिम ■



भूमिपुत्र शेतकरी संघटना आणि किसानपुत्र चळवळीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १९ मार्च रोज गुरुवारला गुडी पाडव्याला अन्न त्याग आंदोलन केले जाणार आहे. १९ मार्च १९८६ ला यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील साहेबराव करपे पाटील आणि त्यांच्या पत्नीसह संपूर्ण कुटुंबाने सामूहिक आत्महत्या केली होती.

ही आत्महत्या सरकार ने आणि व्यवस्थेने दखल घेतलेली पहिली शेतकरी आत्महत्या होती. तेव्हापासून आजपर्यंत आर्थिक विवंचना, कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती, मालाचे पडलेले भाव या सगळ्या बाबींमुळे लाखो शेतकऱ्यांनी आपल्या कृषीप्रधान देशात आत्महत्या केलेल्या आहेत. या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना श्रद्धांजली देण्यासाठी आणि सहवेदना अर्पण करण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटना आणि अमर हबीब प्रणित किसानपुत्र आंदोलनाकडून गेल्या २०११-१२ पासून १९ मार्चला अन्नत्याग आंदोलन केले जाते. राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार कृषी चा विकासदर प्रचंड घटला आहे. नियमित आणि थकीत दोन्ही प्रकारच्या सर्व शेतकऱ्यांना सरकारने सरसकट दोन लाखापर्यंत कर्जमाफी दिली पाहिजे. शेतकऱ्यांवर कर्ज कितीही असो प्रत्येक खात्याला दोन लाख ही मर्यादा ठेवून सरकारने सरसकट कर्जमाफी द्यावी. व दोन लाखा पुढील कर्ज शेतकऱ्यांना भरण्याची मुभा सरकारने द्यावी. दोन लाख रुपयापर्यंत कर्ज माफ होईल ही मर्यादा सरकारने घालू नये. रखडलेला पिक विमा, खतावरील सबसिडी सरळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी. शेतीतील पायाभूत गुंतवणूक वाढवावी. कृषी विभागाकडून सिंचन साहित्यावर देण्यात येणाऱ्या सबसिडी तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी अशा प्रकारचे निवेदन भूमिपुत्र कडून १९ मार्चला सरकारला दिले जाणार आहे. सदर अन्नत्याग आंदोलन आपण ज्या ठिकाणी काम करतो, त्याच ठिकाणी सकाळी ११ ते ४ पर्यंत केले जाते. या आंदोलनामध्ये महाराष्ट्रासह देश-विदेशातील लोक सुद्धा सहभागी होतात. त्यामुळे राज्यभरातील भूमिपुत्रच्या पदाधिकाऱ्यासह ज्यांना- ज्यांना शक्य होईल त्यांनी या आंदोलनामध्ये सहभागी होऊन आपापल्या जागेवरून अन्नत्याग करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना श्रद्धांजली द्यावी.

# 'शासन आपल्या दारी' की फक्त दिखावा?

## वर्ष उलटलं, सबसिडीचा पत्ता नाही; शेतकरी संतप्त!

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

'शासन आपल्या दारी' म्हणत सरकार मोठ्या थाटामाटात योजना राबवत असताना प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांना दारोदारी फिरावे लागत असल्याचे चित्र मालेगाव तालुक्यात पाहायला मिळत आहे.

महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिरांचे आयोजन होत असले तरी कृषी विभागाच्या योजनांमधील शेती साहित्यावरील सबसिडी एक वर्ष उलटूनही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. त्यामुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे.

कृषी विभागाच्या योजनांचा लाभ मिळेल या आशेने शेतकऱ्यांनी ठिंबक सिंचन, तुषार सिंचन, पॉवर टिलर यांसारखी यंत्रसामुग्री खरेदी केली. अधिकाऱ्यांच्या मंजुरीनंतर शेतकऱ्यांना आधी पूर्ण रक्कम भरावी लागते आणि नंतर सबसिडी खात्यात जमा होईल असे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात वर्ष उलटून गेले तरी पैशांचा मागमूस नाही. त्यामुळे 'ही योजना नेमकी शेतकऱ्यांसाठी की कागदोपत्री दिखाव्यासाठी?' असा संतप्त सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

सततच्या नापिकीमुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांनी कर्ज काढून, उसनवारी करून यंत्रे खरेदी केली. पण सबसिडीची रक्कम न मिळाल्याने त्यांची आर्थिक कोंडी अधिकच वाढली आहे. दररोज तालुका कृषी कार्यालयाचे उंबरठे झिजवूनही केवळ आश्वासनांचीच खैरात मिळत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

### योजना शेतकरी हिताची, पण लाभ कुठे?

शासन महाराजस्व अभियानाचा मोठा गाजावाजा करत असले तरी प्रत्यक्षात उपेक्षित शेतकऱ्यांकडे दुर्लक्षच होत असल्याचे स्पष्ट दिसते. योजना कागदावर शेतकरी हिताची असली, तरी वर्षभर सबसिडी न मिळणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखेच आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, की शेतकऱ्यांची ही प्रतीक्षा आणखी लांबणार? असा संतप्त सवाल सर्वत्र विचारला जात आहे.

# सुपर स्पेशालिटी युरोलॉजी शस्त्रक्रियेचे यश

**शेलुबाजार :** येथील डॉ. तुकारामजी धोटे मेमोरियल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्यंत किचकट अशी सुपर स्पेशालिटी युरोलॉजी शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आली.

किडनी व मूत्रवाहिनीमध्ये मोठा व जुना मूतखडा अडकून रुग्णाला वारंवार लघवीच्या संसर्गाचा त्रास होत होता. याच संसर्गामुळे शरीरातील इतर अवयवांवरही परिणाम झाला होता.

या गंभीर स्थितीत तज्ज्ञ युरोलॉजिस्ट डॉ. आशिष बाळकृष्ण राऊत (MBBS, MS, MCh Urology) यांनी अचूक नियोजन व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शस्त्रक्रिया करून रुग्णाला दिलासा दिला.

# कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथे पीएम-किसान योजनेच्या २२ व्या हप्त्याच्या वितरण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण

■ प्रतिनिधी | वाशिम ■



भारत सरकारची महत्त्वाकांक्षी योजना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) अंतर्गत २२ व्या हप्त्याच्या वितरण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दि. १३ मार्च २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता आसाम राज्यातील गुवाहाटी येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. या राष्ट्रीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथे आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी कृषी विज्ञान केंद्रामार्फत बहुसंख्य शेतकऱ्यांची उपस्थिती सुनिश्चित करण्यात आली. शेतकऱ्यांनी पंतप्रधानांचे मार्गदर्शन व पीएम-किसान योजनेअंतर्गत २२ व्या हप्त्याच्या वितरणाचा कार्यक्रम थेट पाहिला. पंतप्रधानांनी आपल्या संबोधनात शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी केंद्र शासन विविध कृषी विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करीत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने कृषी विज्ञान केंद्राच्या तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना डिजिटल ॲग्रीकल्चर मिशन, नैसर्गिक शेती, कडधान्य मिशन तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञान याबाबत माहिती दिली. या माध्यमातून शेतकऱ्यांना शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करून उत्पादन व उत्पादकता वाढविण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमास स्थानिक लोकप्रतिनिधी, कृषी विज्ञान केंद्राचे अधिकारी व कर्मचारी तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.

# गॅस टंचाईचा भडका; तालुक्यात चुलींचा धुरळा!

**मालेगाव :** तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून घरगुती गॅस सिलेंडरचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. गॅस उपलब्ध न झाल्यामुळे अनेक कुटुंबांना पुन्हा पारंपरिक चुलींचा आधार घ्यावा लागत असून गावागावांत चुली पेटताना दिसत आहेत.

गॅस एजन्स्यांकडून वेळेवर पुरवठा होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. काही ठिकाणी सिलेंडर मिळवण्यासाठी तासन्तास रांगा लागत असून तरीही 'नो स्टॉक'चा बोर्ड लावला जात असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः महिलांना याचा सर्वाधिक फटका बसत असून धुरामुळे आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# गुढीपाडवा आणि कडुलिंबाचे अतूट नाते : परंपरेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश -अभिजित जोशी

■ प्रतिनिधी | वाशिम ■



हिंदू पंचांगानुसार नववर्षाचा पहिला दिवस मानला जाणारा गुढीपाडवा हा उत्सव आनंद, नवचैतन्य आणि आरोग्यदायी परंपरांचा संगम आहे. या सणाशी कडुलिंबाचे अतूट नाते असून, भारतीय संस्कृतीत त्याला 'दैववृक्ष' तसेच 'निसर्गाचा दवाखाना' म्हणून मान्यता आहे.

आयुर्वेदातील प्राचीन वैद्यक तज्ज्ञ चरक आणि सुश्रुत यांनी कडुलिंबाचे औषधी महत्त्व अधोरेखित केले आहे. पद्मपुराणात त्याला दीर्घायुष्य देणारा वृक्ष म्हटले असून, बृहतसंहितेत घरासमोर कडुलिंब लावणे कुटुंबासाठी कल्याणकारी ठरते, असे नमूद आहे. आयुर्वेदाबरोबरच युनानी औषध पद्धतीतही कडुलिंबाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो.

कडुलिंबाच्या पानांपासून ते बिया, साल, फुले आणि गोंदापर्यंत सर्व घटक औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहेत. कफ-पित्त निवारण, त्वचारोग, संधिवात, मूळव्याध, मूत्रदोष तसेच कृमीनाशक आणि सौंदर्यप्रसाधनांमध्येही त्याचा उपयोग केला जातो. गुढीपाडव्याच्या दिवशी कडुलिंबाची चटणी खाण्याची प्रथा ही उन्हाळ्याच्या दाहकतेपासून शरीराचे संरक्षण करण्यासाठी उपयुक्त मानली जाते.

भारतीय संस्कृतीने कडुलिंबाचे संवर्धन व्हावे यासाठी त्याची सांगड धार्मिक परंपरांशी घातली आहे. गुढी उभारताना कडुलिंबाची पाने व मोहोराचा वापर याच उद्देशाने केला जातो. मात्र, केवळ पाने लावण्यापेक्षा कडुलिंबाच्या रोपाची पूजा करून त्याची लागवड केल्यास पर्यावरण संवर्धनास अधिक चालना मिळू शकते.

सिमेंट-कॉँक्रीटच्या वाढत्या जंगलामुळे कडुलिंबासारखी देशी झाडे दुर्मिळ होत चालली आहेत. त्यांच्या जागी गुलमोहर, काशीद, जॅकरांडा यांसारख्या परदेशी व जलद वाढणाऱ्या झाडांना प्राधान्य दिले जात आहे. मात्र, कडुलिंब हा दुष्काळी परिस्थितीतही तग धरणारा, कमी पाण्यात वाढणारा आणि विविध प्रकारच्या मातीत सहज वाढणारा वृक्ष आहे. विदर्भ व राजस्थानसारख्या उष्ण प्रदेशातही तो ४५ ते ४७ अंश तापमान सहन करतो आणि प्रवाशांना शीतल सावली देतो.

कडुलिंबाचा उपयोग केवळ आरोग्यासाठीच नव्हे तर शेतीसाठीही महत्त्वाचा आहे. साठवलेल्या धान्यात कडुलिंबाची पाने ठेवण्याची परंपरा आजही टिकून आहे. संशोधनानुसार कडुलिंबाच्या अर्कामुळे सुमारे २०० प्रकारच्या किडींवर नियंत्रण मिळवता येते. त्यामुळे नैसर्गिक कीटकनाशक म्हणून त्याला मोठा वाव आहे.

गुजरात कृषी विद्यापीठाच्या अभ्यासानुसार कडुलिंब हा बहुउपयोगी वृक्षांमध्ये सर्वोत्तम ठरला आहे. त्यापासून मिळणाऱ्या निंबोळ्या, चारा, जळाऊ व इमारती लाकूड यांची आर्थिक किंमत इतर झाडांच्या तुलनेत अधिक आहे. तसेच त्याच्या पानांमुळे जमिनीची सुपीकता वाढते.

# माणिकराव इंगळे यांची शाळेस मदत

**मालेगाव :** राष्ट्रसेवा आणि मातृभूमीची रक्षा हेच सर्वस्व मानून...सीमेवर अनेक वर्ष प्राणाची बाजी लावून ज्यांनी देशाची प्रामाणिकपणे सेवा केली. काही वर्षांपूर्वी सेवेतून निवृत्तही झाले.परंतु देशसेवा आणि समाजसेवा मात्र थांबवायची नसते, तर ती सातत्याने वाढवत न्यायची असते.असा विचार उराशी बाळगून सातत्याने सामाजिक उपक्रमात सहभाग दर्शवणारे एक समाज तपस्वी व्यक्तिमत्त्व...राष्ट्र समर्पित देशभक्त अवलिया म्हणजे कोळगाव खुर्द तालुका मालेगाव येथील एक माजी सैनिक माणिकराव रामभाऊ इंगळे. आपण ज्या शाळेत शिक्षण घेतले, त्या शाळेप्रती आपण काहीतरी देणे लागतो.

# राष्ट्रधर्म प्रचार यात्रेचे वाशीम येथे भव्य स्वागत व राष्ट्रसंतांच्या चरण पादुकेचे व पूजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■



वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पादुकेचे पास्टटूल येथील राष्ट्रीय कीर्तनकार अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे शुकदास गाडेकर दादा यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रधर्म प्रचार यात्रा काढण्यात आली आहे.

सदर यात्रेमध्ये वंदनीय तुकडोजी महाराज यांच्या पाद स्पर्शाने पावन झालेल्या चरण पादुकाही गुरु भक्तांना दर्शनासाठी उपलब्ध आहे. स्थानिक कलश हॉल दानिश एम्पायर येते राष्ट्रधर्म प्रचार यात्रेचे स्वागत करून चरण पादुका चे पूजन करण्यात आले यावेळी समाजसेवी देवेंद्र खडसे पाटील सौ प्रमिलाताई खडसे पाटील, जनार्दन पाटील सुरजखेडकर, भागवत गोटे गणेश वानखेडे, तुलसीदास भोयर, ॲड. सौ. भारती सोमानी, निलेश सोमानी, ॲड. सुरेश टेकाळे, सो. वृषाली टेकाळे, शिंदे सर आदींच्या उपस्थितीत चरण पादुका चे पूजन करण्यात आले व राष्ट्रधर्म प्रचार यात्रा संयोजक ह भ प शुभदास गाडेकर दादा यांचा सत्कार करण्यात आला. सदर यात्रेचा १६ मार्च रोजी प्रारंभ करण्यात आला असून १७ मार्च रोजी वाशीम येथे आगमन झाले वाशीम येथून हिंगोली, परभणी पंढरपूर सांगली सातारा कराड पुणे, देहू, पनवेल मुंबई ठाणे , इगतपुरी, नाशिक शिर्डी संभाजीनगर जालना मार्गे बुलढाणा येथे समारोप करण्यात येणार आहे सदर राष्ट्रधर्म प्रचार यात्रेच्या माध्यमातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचाराचा प्रचार व प्रसार व ग्रामगीते चा प्रचार करण्यात येत आहे गाव हेच खरे तीर्थ आहे.

# अडोळी येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी पोखरा समितची बैठक संपन्न



■ प्रतिनिधी | अडोळी ■

येथील नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत पोखरा समितची बैठक दि. १७ मार्च रोजी सकाळी १० वाजता ग्रामपंचायत प्रशासक सविता इढोळे यांचे यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

बैठकीमध्ये पोखरा प्रकल्पांतर्गत ऑनलाईन केलेल्या ठीबक संच , तुषार संच, फळबाग लागवड, विहीर पुनर्भरण, पीव्हीसी पाइप,शेळी पालन, गांडूळ खत,व महा विस्तार एआय ?प डाऊनलोड करणे .तसेच पोखरा प्रकल्पांतर्गत विविध योजनांची माहिती कृषी सहायक अधिकारी जी.डी.ठोकळ यांनी दिली.तर पोखरा प्रकल्पांतर्गत येणारे कामांची माहिती पोखरा च्या समुह सहा.संजना अवस्थी यांनी दिली.

यामध्ये ग्रामपंचायत प्रशासक समिती सदस्य भगवान इढोळे, समाजसेवक राजकुमार पडघान, ज्योती इढोळे,राजू इढोळे, नारायण इढोळे, कमलबाई पडघान, गजानन इढोळे, संगीता पडघान, भागवत इढोळे, समाधान इढोळे, संध्या मार्कड ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन व सिंधुताई इढोळे यांची उपस्थिती होती. बैठकीमध्ये वरील सर्व ठराव मंजूर करून.पुढील योजना सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविल्या पाहिजे.असे सर्वानुमते ठरले.

# मलेरिया विभागाच्या कामकाजावर नाराजी

## सभापती विजय अग्रवाल यांनी घेतली मलेरिया विभागाची बैठक

### बेजबाबदारांवर कारवाईचे निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

**शहरात वाढत्या डासांच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर मलेरिया विभागाच्या कामकाजावर स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत बेजबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.**



महापालिकेत आज झालेल्या आढावा बैठकीत मलेरिया विभागाच्या कार्यपद्धतीचा पुनरावलोकन करण्यात आला. आठ दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत २० कर्मचाऱ्यांची वाढ, डस्टींग पंप खरेदी, आवश्यक फर्निचर उपलब्ध करणे तसेच नव्याने नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, यापैकी कोणत्याही बाबतीत ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे बैठकीत स्पष्ट झाले.

शहरात डेंग्यू, चिकनगुनिया व मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढत असताना विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याबद्दल अग्रवाल यांनी नाराजी व्यक्त केली. विभागात एकूण १६ कर्मचारी असून त्यापैकी काही कर्मचारी सतत गैरहजर असल्याचेही निदर्शनास आले. तरीही संबंधितांवर कोणतीही प्रशासकीय कारवाई न झाल्याबद्दल त्यांनी सवाल उपस्थित केला.

बैठकीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने डॉ. श्रीमती पहुरकर यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याचे तसेच त्यांच्याकडील पदभार काढून घेण्याचे निर्देश देण्यात आले. त्यांच्या जागी डॉ. अविनाश सोनोने यांच्याकडे वैद्यकीय अधिकारी (एमओएच) पदभार, तर डॉ. अनुप चौधरी यांच्याकडे अतिरिक्त जबाबदारी देण्याची सूचना करण्यात आली. तसेच श्रीमती शितल चव्हाण यांची उपनिबंधकपदी नियुक्ती करण्याबाबतही निर्देश देण्यात आले.

दरम्यान, सतत गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यासोबतच कामात हलगर्जीपणा केल्याबद्दल काही अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्याचे आदेश देण्यात आले. यामुळे विभागाच्या कामकाजात गती येईल, असा विश्वास अग्रवाल यांनी व्यक्त केला.या बैठकीला नगरसेवक सिद्धार्थ उपरवट, मनपा उपायुक्त विजय पारतवार, डॉ. नितीन गायकवाड, डॉ. अनुप चौधरी, डॉ. विजय चव्हाण तसेच मलेरिया विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ११० ■ बुधवार, १८ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# राष्ट्रीय लोक अदालतीत २०४९ प्रकरणांचा आपसी तडजोडीने निपटारा

## ४ कोटी ६३ लक्ष ५५ हजार रुपये तडजोड मूल्य

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या आदेशान्वये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष हेमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये २ हजार ४९ प्रकरणे आपसी तडजोडीने सोडविण्यात आली असून त्याचे तडजोड मूल्य ४ कोटी ६३ लक्ष ५५ हजार ६१६ इतके आहे.

राष्ट्रीय लोकअदालतमध्ये दोन्ही पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळते तसेच दोन्ही पक्षकारांच्या आपसी सहमतीने प्रकरणांमध्ये तडजोड होत असल्याने निकालाचे समाधान दोन्ही पक्षकारांना असते. यामुळे पक्षकारांचा वेळ व पैशाची बचत होऊन मनासारखा समझोता झाल्याने मानसिक समाधान लोक अदालतमुळे पक्षकारांना मिळते, असे विचार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष हेमंत गायकवाड व जिल्हा न्यायाधिश -१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.ए.एस.एम. अली यांनी राष्ट्रीय लोक अदालतप्रसंगी व्यक्त केले.



अदालतमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा न्यायाधीश -१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.ए.एस.एम. अली, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव विवेक देशमुख, अधिवक्ता मंडळी तसेच पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये निकाली निघणाऱ्या प्रकरणांमुळे पक्षकारांना समाधान लाभते. कारण दोन्ही पक्षकारांच्या आपसी सहमतीने प्रकरणामध्ये समझोता होत असतो. त्यामुळे वादापेक्षा समझोता बरा या विचारानुसार पक्षकारांनी आपसातील वाद सामोपचाराने लोक अदालतीमध्ये मिटवावे असे, विवेक देशमुख यांनी राष्ट्रीय लोक अदालतीच्या आयोजनामागील भूमिका विषद करतांना सांगितले.

जिल्ह्यातील न्यायालयामध्ये सपन्न झालेल्या राष्ट्रीय लोक अदालतमध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणापैकी १ हजार ७५७ प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली. तडजोड झालेल्या प्रकरणांमधील तडजोडीची रक्कम २ कोटी ८६ लाख ३ हजार ४४७ रुपये इतके होते. तसेच वाद दाखल पुर्व प्रकरणांपैकी २९२ इतकी प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली. या प्रककरणामधील तडजोडीचे मुल्य १ कोटी ७७ लाख ५२ हजार १६९ इतके आहे. न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे व वाद दाखल प्रकरणे मिळून एकुण २ हजार ४९ इतकी प्रकरणे लोक अदालतीमध्ये निकाली निघाली असून प्रकरणातील एकूण तडजोडीचे मुल्य ४ कोटी ६३ लाख ५५ हजार ६१६ इतके आहे. तसेच लोक अदालतीमध्ये विशेष बाब म्हणजे जिल्ह्यातील न्यायालयामध्ये प्रलंबित असलेली कौटूंबिक हिंसाचाराच्या ३ प्रकरणामध्ये पती पत्नीमध्ये असलेले वाद निपटारा करण्यात यश प्राप्त झाले. व त्यांनी हसत खेळत आपले संसार करण्याचे ठरविलेले आहे, असे विधी सेवा प्राधिकरणच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# आयशर च्या धडकेत १२ वर्षीय चिमुकल्याचा रस्त्यावरच चिरडून मृत्यू

## सेलू-सुकळी रोडवरील वर्धा बायपास पुलाजवळ दुपारी थरारक अपघात; चालक फरार

**सेलू जनमाध्यम :** सेलू-सुकळी रोडवरील वर्धा बायपास पुलाजवळ मंगळवारी (दि.१७) दुपारी भरदिवसा बेफाम वेगाने धावणाऱ्या आयशर मालवाहू वाहनाने सायकलस्वार १२ वर्षीय चिमुकल्याला अक्षरशः चिरडून ठार केल्याची हृदयद्रावक घटना घडली. या अपघाताने संपूर्ण परिसर हादरला असून संतापाची लाट उसळली आहे.



वैभव मनोज करपाते (वय १२, रा. बोरी बोरधरण) असे मृत मुलाचे नाव आहे. निष्पाप वयातच मृत्यूने झडप घातल्याने गावावर शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वैभव हा काही दिवसांपासून आपल्या मोठ्या वडिलांकडे सेलू येथे आला होता. मंगळवारी दुपारी सुमारे दोनच्या सुमारास तो सायकलने बाहेर पडून सेलूकडे निघाला होता. त्याच वेळी समोरून वर्धेकडे भरधाव वेगाने येणाऱ्या विनानंबर आयशरने पुलाजवळील वळण घेताना त्याच्या सायकलला जबर धडक दिली.

धडकेनंतर चिमुकला थेट वाहनाच्या चाकाखाली सापडला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या त्या निष्पाप देहाकडे पाहून उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आले. काही क्षणांतच आनंदाने सायकल चालवत निघालेला वैभव कायमचा निघून गेलाष

घटनेची माहिती मिळताच रुग्णमित्र प्रज्वल लटारे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. सेलू पोलिसांनीही तत्काळ घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय, सेलू येथे पाठविण्यात आला.


दरम्यान, अपघातानंतर आयशर चालक वाहनासह पसार झाल्याची माहिती असून पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. भरधाव, बेजबाबदार वाहनचालकांमुळे निरपराध नागरिकांचे जीव जात असल्याचा संताप नागरिकांतून व्यक्त होत आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे बोरी बोरधरण गावात शोककळा पसरली असून संपूर्ण गाव सुन्न झाले आहे. पुढील तपास सेलू पोलीस करीत आहेत.

# गॅस अपडेट चा बहाणा, सायबर चोरांचा घराघरात डाका

**वर्धा जनमाध्यम :** गॅस सिलिंडरच्या तुटवड्याचा गैरफायदा घेत सायबर भामट्यांनी आता थेट घरातील स्वयंपाकघरावरच डल्ला मारला आहे. ‘ख्ण अपडेट करा, कनेक्शन बंद होईल, बुकिंग ॲक्टिव्ह करा अशा धमकीवजा फोन करून महिलांना जाळ्यात ओढले जात असून, एका क्लिकमध्ये बँक खाती रिकामी करण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

भामटे स्वतःला भारत गॅस, एचपी गॅस, इंडेन किंवा एमजीएल कंपनीचे अधिकारी असल्याचे भासवतात. त्यानंतर मोबाईलवर एक ँइख फाईल किंवा लिंक पाठवली जाते. फॉर्म भरा असे सांगताच निष्पाप नागरिक ती डाउनलोड करतात , आणि त्याच क्षणी फोनवरील नियंत्रण गुन्हेगारांच्या हाती जाते. काही मिनिटांतच बँक खात्यातील रक्कम गायब ध्ऊझ, पासवर्ड, बँक तपशील सर्व काही लुटले जाते.



विशेष म्हणजे हा डाव महिलांवर अधिक केंद्रित असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. स्वयंपाकासाठी गॅस अत्यावश्यक असल्याने अनेक महिला घाईघाईत फसत आहेत.

**पोलिसांचा इशारा : ँइख म्हणजे डिजिटल स्फोटक**

अनोळखी लिंक, फाईल किंवा ॲप डाउनलोड करणे म्हणजे स्वतःहून चोराला घराची चावी देण्यासारखे आहे, असा इशारा सायबर पोलिसांनी दिला आहे. गॅस कंपन्या कधीही फोनवर बँक तपशील किंवा ध्ऊझ मागत नाहीत, हे लक्षात ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**फसवणूक झाल्यास तात्काळ करा**

सायबर हेल्पलाईन : १९३०

तक्रार : www.cybercrime.gov.in

सायबर गुन्हेगार दिसत नाहीत, आवाजही ओळखीचा वाटतो पण एका क्षणात आयुष्याची बचत लंपास करतात. सतर्क रहा, अन्यथा अपडेट च्या नावाखाली तुमचे खाते शून्य होऊ शकते,

# गॅस सिलिंडरची टंचाई टळण्यासाठी प्रशासन सतर्क

## मागणी ५ हजार, पुरवठा ४५००

**वर्धा जनमाध्यम :** आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे एलपीजी गॅस पुरवठ्यावर परिणाम होत असून जिल्ह्यात गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे. सध्या जिल्ह्यात दररोज घरगुती गॅस सिलिंडरची मागणी सुमारे ५ हजार इतकी आहे, तर सुमारे ४५०० सिलिंडरचा पुरवठा होत आहे. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये तसेच साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी जिल्ह्यात ९ पथके गठीत करण्यात आली आहेत.

या पथकांकडून गॅस वितरणावर लक्ष ठेवले जात असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. काही ठिकाणी अवैध साठा आढळल्यास सिलिंडर जप्त करण्याची कारवाईही सुरू आहे. व्यावसायिक गॅसचा वापर नियंत्रणात ठेवण्यासाठी पुरवठा विभागाने १९ किलोचे २७५ आणि ५ किलोचे १७३ व्यावसायिक सिलिंडर विक्री न करण्याच्या सूचना संबंधित गॅस एजन्सींना दिल्या आहेत.



दरम्यान, ऑनलाईन बुकिंग केल्याशिवाय घरगुती सिलिंडर दिला जात नसल्याने अनेक नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. बुकिंगनंतरही सिलिंडर मिळण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी आहेत.

जिल्ह्यात गॅस ग्राहकांची संख्या मोठी असून इंडियन ऑईलचे १ लाख ३० हजार ५३४, एचपीसीएलचे २ लाख ३५ हजार १०३ आणि बीपीसीएलचे ३० हजार ८८२ ग्राहक आहेत. या मोठ्या संख्येमुळे पुरवठा व्यवस्थापन करणे प्रशासनासाठी आव्हानात्मक ठरत आहे.

मागणीच्या तुलनेत सध्या पुरवठा समाधानकारक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी राजू रणवीर यांनी केले आहे. कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# तालुक्यातील सिंदीत आजपासून ‘बुलडोझर’ गरजणार!

## प्रशासनाचा अल्टिमेटम संपला

### बाजारपेठेतील अतिक्रमणे होणार जमीनदोस्त

**सेलु जनमाध्यम :**

तालुक्यातील सिंदी (रेल्वे ) शहरातील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी आणि बाजारपेठेला मोकळा श्वास मिळवून देण्यासाठी सिंदी रेल्वे नगर परिषद प्रशासन आता ’ॲक्शन मोड’वर आले आहे. प्रशासनाने दिलेली २४ तासांची मुदत संपली असून, आज बुधवार, १८ मार्च २०२६ पासून थेट तोडकाम मोहिमेला सुरुवात होणार आहे. यामुळे अनाधिकृत अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले आहेत.

बाजार चौक आणि मुख्य रस्त्यांवर व्यावसायिकांनी केलेल्या वाढीव बांधकामांमुळे रस्ते अरुंद झाले आहेत. याचा फटका सर्वसामान्य नागरिक आणि वाहनधारकांना बसत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या कडक निर्देशानंतर मुख्याधिकाऱ्यांनी ही धडक मोहीम हाती घेतली आहे. यामध्ये बाजार चौक, मुख्य रस्ते आणि फूटपाथवरील अनधिकृत दुकाने व ओटे आदी अतिक्रमण काढणार आहे. प्रशासनाने दिलेली २४ तासांची नोटीस मुदत संपली आहे.




काही अनुचित प्रकार टाळण्यासाठी सिंदी रेल्वे पोलीस ठाण्याला पाचारण करण्यात आले असून मोठा फौजफाटा तैनात असणार आहे. कारवाई दरम्यान होणाऱ्या नुकसानीस प्रशासन जबाबदार राहणार नाही, असे आधीच स्पष्ट करण्यात आले आहे. नगर परिषदेने ही कारवाई महाराष्ट्र नगरलिका परिषद अधिनियम १९६५ (कलम १७९-१८१) आणि MRTP ACT १९६६ (कलम ५२-५५) अंतर्गत प्रस्तावित केली आहे. मुख्याधिकाऱ्यांना अतिक्रमण हटवण्याचे पूर्ण कायदेशीर अधिकार आहेत. विशेष म्हणजे, अतिक्रमण हटवण्यासाठी येणारा प्रशासकीय खर्च आणि मजुरी देखील संबंधित अतिक्रमण धारकाकडूनच वसूल केली जाणार आहे. नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी शहर विकासासाठी सहकार्य करावे. ज्यांनी अद्यापही आपले साहित्य हटवलेले नाही, त्यांनी ते तातडीने काढून घ्यावे, अन्यथा प्रशासकीय बळाचा वापर करून तोडकाम केले जाईल, असा इशारा दिला आहे.

# रिपाइं (आठवले) चे जिल्हाध्यक्ष प्रकाश पाटील यांचे निधन

**वर्धा जनमाध्यम :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे वर्धा जिल्हाध्यक्ष तथा मांडवगड येथील रहिवासी प्रकाशभाऊ पाटील यांचे ब्रेन स्ट्रोकने मंगळवारी सकाळी ७ वाजता सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात निधन झाले. ते ६० वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने रिपाइं (आठवले) पक्षासह आंबेडकरी समाजात शोककळा पसरली आहे.



प्रकाशभाऊ पाटील हे गेली अनेक वर्षे सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय होते. वंचित व दुर्बल घटकांच्या प्रश्नांसाठी ते सातत्याने आवाज उठवत होते. संघटन कौशल्य, कार्यकर्त्यांशी असलेला जिव्हाळा आणि साधी राहणी यामुळे जिल्ह्यात त्यांना मानाचे स्थान होते. त्यांच्या अकाली निधनामुळे पक्षाचे मोठे नुकसान झाल्याची भावना कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार आहे. मांडवगड येथील राहत्या घरातून त्यांच्या पार्थिवाची अंत्ययात्रा काढण्यात आली. त्यानंतर स्थानिक मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.


दरम्यान, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच नागरिकांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन श्रद्धांजली अर्पण केली.

# सावंगी रुग्णालयात परिचारिकेचा विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

## विभागीय चौकशी, कथित छळामुळे टोकाचे पाऊल; घटनेने खळबळ

**वर्धा जनमाध्यम :** सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात कार्यरत असलेल्या परिचारिका अश्विनी चतुर (दुधलकर) यांनी रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारतीत विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना सोमवारी (दि.१६) सकाळी घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

माहितीनुसार, गेल्या वर्षभरापासून सुरू असलेल्या विभागीय चौकशीमुळे आणि नोकरी जाण्याच्या भीतीने त्या मानसिक तणावाखाली होत्या. चौकशीदरम्यान वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांमुळे तसेच काही कर्मचाऱ्यांकडून होत असलेल्या कथित छळामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा आहे. आत्महत्येपूर्वी त्यांनी एक सुसाईड नोट लिहून ठेवल्याचेही समोर आले आहे.



दरम्यान, या घटनेची अधिकृत माहिती बाहेर जाऊ नये यासाठी रुग्णालय प्रशासनाकडून प्रयत्न होत असल्याचा आरोप होत आहे. घटनेबाबत पोलिसांकडे तक्रार देण्याचा प्रयत्न पती आशिष दुधलकर यांनी केला असला, तरी तक्रार नोंदविण्यात विलंब झाल्याची माहिती मिळाली आहे.

अश्विनी चतुर या मागील १२ वर्षांपासून सावंगी येथील एव्हीबीआरएच रुग्णालयात कार्यरत आहेत. ऑक्टोबर २०२४ मधील एका वादानंतर त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरू झाली होती. चौकशीदरम्यान काही सुरक्षा रक्षक व कर्मचाऱ्यांकडून मानसिक त्रास होत असल्याचा आरोप सुसाईड नोटमध्ये असल्याची चर्चा आहे.

सदर परिचारिकेची प्रकृती उपचारानंतर स्थिर असल्याचे समजते. या प्रकरणाचा तपास सुरू असून सुसाईड नोटमुळे प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# बोरगाव (मेघे) येथे ‘सांज पाडवा’ उद्या; सुरेल मैफलीची पर्वणी

**वर्धा जनमाध्यम :** गुढीपाडव्याच्या निमित्ताने रामकृष्ण हरी संगीत कला मंच, बोरगाव (मेघे) यांच्या वतीने ‘सांज पाडवा’ या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम १९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता हरिहरनगर येथील हनुमान मंदिर परिसरात होणार आहे.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक डॉ. नीरज लांडे (अकोला) यांचे सुमधुर गायन सादर होणार आहे. भक्तीगीत, भावगीत व सुगम संगीताच्या विविध रचनांमुळे गुढीपाडव्याच्या सायंकाळी रसिकांना सुरेल मेजवानी मिळणार आहे. त्यांच्या गायनाला प्रसिद्ध तबला वादक डॉ. देवेंद्र यादव यांची तबल्याची साथ लाभणार असून, मैफलीत लय आणि सुरांचा सुंदर संगम अनुभवायला मिळणार आहे.

नववर्षाच्या स्वागतासाठी आयोजित या कार्यक्रमाला बोरगाव (मेघे) तसेच वर्धा शहरातील संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. गुढीपाडव्याच्या पावन सायंकाळी भक्ती, संस्कृती आणि संगीताचा संगम घडवणारा हा कार्यक्रम परिसरातील सांस्कृतिक परंपरा जपणारा ठरणार असल्याचेही आयोजकांनी सांगितले.

## वर्ध्यात गणगौर उत्सवाचा पारंपरिक जल्लोष

# माहेश्वरी महिला मंडळाचे सांस्कृतिक कार्यक्रम भव्य विसर्जन मिरवणूक शनिवारी

**वर्धा जनमाध्यम :** राजस्थानी समाजाचा प्रमुख लोकपर्व गणगौर सध्या वर्धा शहरात पारंपरिक उत्साहात साजरा होत असून माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नव्याने निवडून आलेल्या अध्यक्षा सौ. सुनिता राठी व सचिव सौ. छाया पसारी यांच्या नेतृत्वाखाली नृत्य, गीतगायन, पूजन व विसर्जन सोहळ्याची तयारी सुरू आहे.

हिंदू परंपरेनुसार देवी पार्वतीने भगवान शिवांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या केली होती. त्यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन शिवांनी त्यांना शाश्वत मिलनाचा वर दिला. त्या स्मरणार्थ विवाहित महिला अखंड सौभाग्यासाठी तर कुमारिका इच्छित वरप्राप्तीसाठी गणगौरची पूजा करतात. होळीच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू होणारा हा उत्सव चैत्र शुक्ल तृतीयेपर्यंत १८ दिवस चालतो.

या काळात ईसर-गौर (शिव-पार्वती) यांच्या मातीच्या मूर्तींची स्थापना करून महिलांकडून पारंपरिक लोकगीतांच्या सुरात पूजा केली जाते. गोर-गोर गोमती, ईसर पूजे पार्वतीष्ठअशा गीतांनी वातावरण भक्तिमय बनते. पूजनावेळी गौर मातेला महावर, सिंदूर व चूड्या अर्पण करण्याची प्रथा आहे.




मंडळाचे समन्वयक राजकुमार जाजू यांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकमान्यतेनुसार माता गौर होळीच्या दुसऱ्या दिवशी आपल्या पीहर (मायके) येतात आणि १८ दिवसांनंतर भगवान शिव त्यांना घेण्यासाठी येतात. चैत्र शुक्ल तृतीयेच्या दिवशी मूर्तींचे विसर्जन विहीर, तलाव किंवा जलाशयात केले जाते. या वेळी ईसर-गौर यांच्या आदमकद मूर्तींसह भव्य शोभायात्रा काढली जाते.माहेश्वरी महिला



मंडळाच्या कार्यक्रमांत गणगौर नृत्य, ईसर-पार्वती वेशभूषा सादरीकरण, पारंपरिक गीतगायन तसेच सामूहिक उद्यापनाचा समावेश आहे. नव्या सुना व तरुणींना संघटनेशी जोडण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत असून युवकांचा सहभाग वाढविण्यावरही भर दिला जात आहे.

शनिवार सायंकाळी संपूर्ण राजस्थानी समाजाच्या वतीने महंत नंदकिशोर पीपलवा यांच्या मार्गदर्शनाखाली गणगौर विसर्जनाची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून या सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. गणगौर हा केवळ धार्मिक विधी नसून स्त्रीशक्ती, कुटुंबीय ऐक्य आणि सांस्कृतिक परंपरा जपणारा उत्सव असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# अमरावती जिल्ह्यातील दुर्गम भागातील नागरिकांना वेळेवर उपचार मिळावेत

## सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई / प्रतिनिधी** :अमरावती जिल्ह्यातील दुर्गम भागातील नागरिकांना वेळेवर उपचार मिळावेत आणि कोणतीही आरोग्य सुविधा कर्मचा-यांच्या अभावामुळे किंवा तांत्रिक कारणास्तव थांबू नये, यासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. अमरावती जिल्ह्यातील १०२ रु ग्णवाहिका सेवेसंदर्भात निर्माण झालेल्या समस्यांवर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आरोग्यसेवा आयुक्त ड?ा.कादंबरी बलकवडे, आरोग्यसेवा संचालक डा. विजय कंदेवाड, उपसंचालक ठाणे परिमंडळ, जिल्हा आरोग्य अधिकारी पालघर, शल्यचिकित्सक तसेच आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील १०२ रु ग्णवाहिका सेवेतील तांत्रिक अडचणी आणि इतर प्रलंबित प्रश्नांचा सविस्तर आढावा घेउन मंत्री आबिटकर म्हणाले स्पर्श प्रणालीमधील त्रु टी, चिखलदरा आणि धारणी येथील इंधन पुरवठ्याबाबतचे प्रश्न तसेच रु ग्णवाहिकांच्या उपलब्धतेविषयी निर्णय घेउ. धारणी आणि चिखलदरा सारख्या दुर्गम भागात आरोग्य सेवा विनाखंड सुरू राहण्यासाठी मानधनाचे प्रलंबित विषय तातडीने निकाली काढण्यात येतील तसेच जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालय आणि स्त्री रु ग्णालयातील बालरोगतज्ज्ञ व स्त्रीरोगतज्ज्ञांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत सकारात्मक पावले उचलण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या आहेत. तपोवन कुष्ठरोग संस्थेच्या अहवालाबाबत आणि तेथील सुधारणांबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल तसेच जनसामान्यांच्या आरोग्याशी निगडित हे सर्व प्रश्न प्राधान्याने मार्गी लावून, एक सुदृढ आणि आरोग्यसंपन्न अमरावती घडवण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा विश्वास यावेळी मंत्री आबिटकर यांनी व्यक्त केला.


# सुट्ट्यांच्या दिवशीही दस्तनोंदणी कार्यालये सुरू राहणार

**मुंबई / प्रतिनिधी** : आर्थिक वर्ष २०२५-२६ संपत आल्यामुळे मालमत्ता खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये वाढ होण्याची शक्यता लक्षात घेउन नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार मुंबई शहरातील सह जिल्हा निबंधक कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व दुय्यम निबंधक कार्यालये सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत. २६, २८, २९ आणि ३१ मार्च २०२६ या दिवशी सह जिल्हा निबंधक, मुंबई शहर यांच्या अधिपत्याखालील दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक १ ते १५ ही सर्व कार्यालये नियमित शासकीय कामकाजासाठी कार्यरत राहतील. आर्थिक वर्षाच्या अखेरीस दस्तनोंदणीचे प्रमाण वाढत असल्याने गर्दी कमी करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला असून, नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन मुंबई शहरचे सह जिल्हा निबंधक भरत गरु ड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# राज्यात इंधन पुरवठा सुरळीत

## अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ

**मुंबई / प्रतिनिधी** :राज्यातील सर्व रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत असून एलपीजी उत्पादनात वाढ करण्यात आली आहे. मागील काही दिवसांत उत्पादन ९००० मेट्रिक टनांवरून ११००० मेट्रिक टनांपर्यंत वाढवण्यात आले असून पुरवठा साखळी मजबूत करण्यात आली आहे. राज्यात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत सुरू असल्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विधानपरिषदेत सांगितले. नियम २६० प्रस्तावास उत्तर देताना ते बोलत होते. मंत्री छगन भुजबळ म्हणाले, पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा, त्यावर नियंत्रण तसेच दर निश्चित करण्याचा अधिकार केंद्र शासनाकडे आहे. केंद्र शासनाने ७ मार्च २०२६ पासून घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किंमतीत वाढ केली आहे. राज्यातील रिफायन-या पूर्ण क्षमतेने कार्यरत असून एलपीजी आणि पीएनजीचे उत्पादन सुरू आहे. काळाबाजार रोखण्यासाठी कारवाई करण्यात येत असून नागरिकांमध्ये घबराट पसरू नये यासाठी रेडिओ, एफएम, दूरदर्शन आणि वृत्तपत्रांद्वारे नियमित माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सोशल मीडियावरील अफवांवरही नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.राज्य स्तरावर नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला असून ९७६९९१९२२१ हा व्हाट्सअॅप क्रमांक नागरिकांसाठी जारी करण्यात आला आहे. शाळा, महाविद्यालये आणि रु ग्णालयांना १०० टक्के गॅस पुरवठा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. इंधन पुरवठ्याच्या पार्श्वभूमीवर २० टक्के इथेन?ल मिश्रण लागू असल्याचे सांगत त्यांनी गॅस पुरवठ्यात अडचणी आल्यास कोळसा व केरोसिनसारख्या पर्यायी इंधनांचा वापर करण्याचा विचार सुरू असल्याचे नमूद केले. केरोसिन पुरवठा साखळी काही प्रमाणात विस्कळीत झाली असली तरी डीलर्समार्फत पुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.



# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळ्याच्या तयारीचा मुख्य सचिवांकडून आढावा

**मुंबई/प्रतिनिधी :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल २०२६ रोजी होणा-या जयंतीनिमित्त दादर येथील चैत्यभूमी येथे आयोजित करण्यात येणा-या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीस सामजिक न्याय विभाग, मुंबई शहर जिल्हाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई पोलीस, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मध्य व पश्चिम रेल्वे, एसटी महामंडळ आणि इतर संबंधित शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी, विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या महामानवाच्या जयंती सोहळ्यासाठी दरवर्षीप्रमाणे देशभरातून लाखो अनुयायी चैत्यभूमीवर येत असतात. हा सोहळा अत्यंत शिस्तबद्ध आणि सुरक्षित वातावरणात पार पडण्यासाठी सर्व यंत्रणांनी आपापसांत योग्य समन्वय ठेवावा, अशा सूचना मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी यावेळी दिल्या.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने चैत्यभूमी परिसर, शिवाजी पार्क आणि परिसरात स्वच्छता, पिण्याचे पाणी, फिरते शौचालय आणि आरोग्य पथकांची चोख व्यवस्था करून नागरी सुविधा पुरविण्यात यावे. मुंबई पोलिसांनी गर्दीचे नियोजन आणि सुरक्षेच्या दृष्टीने बंदोबस्त तैनात करावा आणि सुरक्षा व्यवस्था पुरवावी. रेल्वे आणि एसटी महामंडळाने अनुयायांच्या प्रवासासाठी अतिरिक्त गाड्यांचे नियोजन करावे, जेणेकरून प्रवाशांची गैरसोय होणार नाही याचे नियोजन करून वाहतूक व्यवस्था करावी, एमएमआरडीए आणि संबंधित विभागांनी मैदानातील व्यवस्था, तात्पुरता निवारा आणि वीजपुरवठ्याची जबाबदारी वेळेत पूर्ण करावी. तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने या सोहळ्याचे व्यापक प्रसिद्धी नियोजन करावे असे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितले. १४ एप्रिल २०२६ रोजी होणा-या या सोहळ्यात व्यापक लोकसहभाग असतो. दरवर्षी प्रमाणे प्रशासनाने कोणत्याही त्रु टी राहणार नाहीत याची काळजी घ्यावी. शासकीय यंत्रणांनी सेवाभावी वृत्तीने काम करून अनुयायांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देशही मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले.

# भारतासह सहा मित्र देशांमधील सैन्य दलाच्या वरिष्ठ अधिका-यांनी घेतली राज्यपालांची भेट

**मुंबई/प्रतिनिधी :** नॅशनल डिफेन्स कालेज येथे प्रशिक्षण घेत असलेल्या भारत व सहा मित्र देशातील वरिष्ठ सैन्य दल व नागरी सेवा अधिका-यांच्या एका १७ सदस्यांच्या शिष्टमंडळाने मंगळवारी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची लोकभवन येथे सदिच्छा भेट घेतली. शिष्टमंडळामध्ये भारतीय नौदल, वायुदल व स्थलसेनेतील ब्रिगेडियर दर्जाचे अधिकारी तसेच राजस्व सेवेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्याशिवाय रशिया, ओमान, इंडोनेशिया, नायजेरिया, नेपाळ व टांझानिया या मित्र देशांचे वरिष्ठ सैन्य अधिकारी देखील उपस्थित होते. नॅशनल डिफेन्स कालेज येथील वरिष्ठ सल्लागार मेजर जनरल हरकिरत सिंह यांच्या नेतृत्वाखाली हे शिष्टमंडळ सध्या मुंबई व पुणे येथे अभ्यास दौ-यावर आले आहे.

# राज्यात अवकाळीचे संकट; विदर्भात गारपिटीचा इशारा!

## उष्णतेचा प्रभाव कायम राहणार गुढीपाडव्याला पावसाची शक्यता



**मुंबई / प्रतिनिधी** : राज्यात सध्या उन्हाची तीव्रता वाढताना दिसत आहे. मार्च महिन्याच्या मध्यात अनेक ठिकाणी उन्हाच्या कडक झळा बसत आहेत. विदर्भात प्रचंड उकाडा जाणवत असून, काही ठिकाणी उन्हाचा पारा चाळीसच्या पार गेला आहे.अशातच गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्यात अनेक भागात पावसाची हजेरी लागणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये तर गारपिटीचा इशाराही देण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, १७ ते २० मार्च या कालावधीत कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह दमदार पाउस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.बुधवारी (१८ मार्च) विदर्भातील अमरावती, अकोला, वर्धा, नागपूर, भंडारा आणि गोंदिया या सहा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी गारपीट होण्याची दाट शक्यता आहे.तर मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, धाराशिव आणि लातूरसह मध्य महाराष्ट्रातील अहिल्यानगर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज आहे. कोकणातील रायगड आणि रत्नागिरी या जिल्ह्यांना वादळी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**उष्णतेचा प्रभाव कायम राहणार**

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या उत्तर कोकण भागासह नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर या एकूण १३ जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा प्रभाव कायम राहणार आहे. दिवसाच्या तुलनेत रात्री दमट हवेमुळे अधिक उकाडा जाणवू शकतो, असे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

**शेतकरी संकटात-**उष्णतेची लाट, अवकाळी पाउस आणि गारपीट या तिन्ही गोष्टी एकत्रितपणे दिसून येत आहेत. यामुळे काढणीला आलेल्या पिकांवर तसेच फळबागांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतक-यांनी आपल्या उत्पादनाचे योग्यरीत्या संरक्षण करावे. तसेच नागरिकांनीही बदलत्या हवामानामुळे उद्भवणा-या आरोग्याच्या समस्या टाळण्यासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सध्या राज्यात रब्बी हंगाम सुरू असून, अवकाळी पाउस झाल्यास याचा मोठा फटका काढणीला आलेल्या पिकांना बसेल.

# धनगर बांधव हे राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक-कृषी मंत्री



## मेंढीपालन प्रकल्पाबाबत मंत्रालयात आढावा बैठक

**मुंबई/प्रतिनिधी :** धनगर बांधव हे राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहेत. त्यांच्या पारंपरिक व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे ही काळाची गरज बनली आहे. अर्धबंधिस्त मेंढीपालन या प्रकल्पामुळे मेंढ्यांची योग्य निगा राखता येईल, मृत्यूदर कमी होईल आणि उत्पादनक्षमतेत वाढ होईल. यामुळे मेंढपाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनण्यास मोठी मदत होणार आहे. या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे तसेच लाभार्थ्यांना प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, या संदर्भात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबंधित यंत्रणांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले.भटकंती करणा-या मेंढपाळ धनगरांच्या उपजीविकेला स्थैर्य मिळावे तसेच त्यांच्या पारंपरिक मेंढीपालन व्यवसायाला आधुनिकतेची जोड देण्याच्या उद्देशाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) योजनेंतर्गत अर्धबंधिस्त मेंढीपालन प्रकल्पाचा समावेश करण्याबाबत मंत्रालयात आज आढावा बैठक घेण्यात आली.या बैठकीला कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उपसचिव अंबादास चंदनशिवे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डा. शितलकुमार मुकणे, संतोष महात्मे तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे अधिकारी उपस्थित होते.स्वातंत्र्योत्तर काळापासून वनक्षेत्राशी निकट संबंध ठेवून पारंपरिक मेंढीपालन व्यवसाय करणा-या या समुदायावर वनक्षेत्रातील निर्बंध, वाढते शहरीकरण तसेच गायरान व चराई क्षेत्रातील घट यामुळे मोठा परिणाम झाला आहे. चा-याच्या कमतरतेमुळे या समाजाला वर्षभर भटकंती करावी लागत असून, विशेषत? पावसाळ्यात मेंढ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेसंदर्भात गंभीर अडचणी निर्माण होतात. भटकंती करणा-या मेंढपाळ धनगर समाजाच्या अडचणींचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला.

# कोश्यारींनी अपमान केला तेव्हा गप्प का होतात? नाना पटोले



## शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात सक्तीचे कायदे का?

**मुंबई /प्रतिनिधी-**सरकार धर्मस्वातंत्र्य विधेयक हे ताकदीच्या जोरावर लागू करू इच्छित आहे. महाराष्ट्रात दमणकारी व्यवस्था निर्माण करण्याचे काम फडणवीस सरकारकडून सुरू आहे. काही जातींना, काही धर्मांना टार्गेट करण्याचे काम सुरू केले आहे. शाहू-फुले आणि आंबेडकरांच्या महाराष्ट्रात असे कायदे कशासाठी असा सवाल काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी फडणवीस सरकारला केला आहे.नाना पटोले म्हणाले की, भाजपच्या विचारसरणीच्या लोकांना काय वाशिंग मशिनमध्ये धुण्यात येते का? बाहेरील कोश्यारींसारखे लोक महाराष्ट्रात राज्यपाल बनून येतात तेव्हा ते महाराष्ट्राच्या आणि देशाच्या दैवतांचा अपमान करण्यासाठी येतात का? संविधानाने आम्हाला धर्मस्वातंत्र्य दिले आहे. शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात हे काम करण्याचा प्रयत्न भाजपकडून सुरू आहे. पण यापूर्वी ज्यावेळी असे बिल थोपवण्यात आले त्याला जनतेतून विरोध करण्यात आला आहे. या बिलमधील ४-५ क्लाजबद्दल या विधेयकाला विधिमंडळ समितीकडे पाठवावे अशी आमची मागणी होती. त्यातून चर्चा करत हे बिल एकमताने मंजूर करावे अशी आमची भूमिका होती. पण सरकारने दमणकारी व्यवस्था निर्माण करत काही जातींना, काही धर्मांना टार्गेट करण्याचे काम सुरू केले आहे. पाशवी बहुमताच्या आधारावर कायद्याच्या स्वरूपात हे जे सुरू आहे याचा आम्ही विरोध करतो. नाना पटोले म्हणाले की, जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या वक्तव्याचे आम्ही समर्थन केले असे काही नाही. आव्हाडांनी त्या प्रकरणी माफी सुद्धा मागितली. विधानसभा अध्यक्षांनी त्यावर भूमिका स्पष्ट करत त्यांना ताकीद सुद्धा दिली आहे. शिवसेना या बिलाच्या ना सोबत होते ना बिलाच्या विरोधात होते, अशी त्यांची भूमिका होती. त्यांच्या भूमिकेवर आम्ही काही बोलू शकत नाही. त्यांचा पक्ष वेगळा आहे, त्यांचे मत वेगळे असू शकत नाही.

# सुरक्षित शहरांसाठी सीसीटीव्हीचे प्रभावी सुरक्षा कवच निर्माण करण्यात यावे -मुख्यमंत्री

■ सीसीटीव्ही यंत्रणेच्या सनियंत्रणासाठी महामंडळाची निर्मिती करा
■ माहिती व तंत्रज्ञान विभागाची आढावा बैठक

**मुंबई/प्रतिनिधी :** नागरिकांसाठी भयमुक्त वातावरण राहता यावे यासाठी राज्यात सुरक्षित व गुन्हेमुक्त शहरे करण्यावर राज्य शासनाचा भर आहे. यासाठी राज्य शासन आवश्यक उपाययोजनांची अंमलबजावणी करीत असून सीसीटीव्ही यंत्रणेचे जाळे मजबूत करण्याचादेखील समावेश आहे. येत्या काळात सुरक्षित शहरांसाठी सीसीटीव्हीचे जाळे मजबूत करून प्रभावी सुरक्षा कवच निर्माण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. माहिती व तंत्रज्ञान विभागाने गृह, नगरविकास विभागाच्या समन्वयातून सीसीटीव्ही यंत्रणेच्या प्रभावी उपयोगासाठी, शहरांमधील खासगी सीसीटीव्ही डेटाचा गुन्हे तपासासाठी उपयोग करणे आणि शूटिंग बुद्धिमत्तेवर आधारित सीसीटीव्ही यंत्रणा निर्माण करण्यासाठी महामंडळाची निर्मिती करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. विधान भवन येथे माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी माहिती व तंत्रज्ञान मंत्री अड. आशिष शेलार उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, माहिती व तंत्रज्ञान विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण, सीसीटीव्ही यंत्रणेवर आधारित महानेत्रा धोरण आणि महाराष्ट्र अनमॅन्ड सिस्टीम धोरण अंतिम करावे. सूक्ष्म, मध्यम व लघु उद्योगांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अनुषंगाने सामान्यपणे लागणा-या सेवांसाठी यंत्रणा निर्मिती करावी. भविष्य हे मानवी हस्तक्षेपणाशिवाय कृतिशील असणारे आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने नवनवीन संशोधन यामध्ये होत आहेत. शासनातही मानवी हस्तक्षेपाशिवाय करता येणे शक्य असलेल्या कामांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. त्यासाठी ' म्युजिक' (महाराष्ट्र अनमँड सिस्टीम अँड इन्फ्रास्ट्रक्चर कार्पोरेशन) या नव्या महामंडळाची निर्मिती करावी. या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन तंत्रज्ञान तसेच मानवी हस्तक्षेपाशिवाय करण्यायोग्य कामांमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करणे शक्य होईल. सध्या कृषी विभागात ड्रोन तंत्रज्ञान उपयोगात येत आहे. या तंत्रज्ञानाचा मानवी आयुष्यासाठी सकारात्मक उपयोग आहे .या क्षेत्रात ड्रोन संशोधन महत्त्वाचे असून ड्रोनची निर्मिती, त्यामधील स?फ्टवेअर तसेच ड्रोनचा विघातक कार्यासाठी होणारा उपयोगही थांबवायला हवा. अशा सर्व बाबींचा समावेश नवीन धोरणामध्ये असावा. शहरांमध्ये निर्माण करण्यात येत असलेले सीसीटीव्ही यंत्रणेवर इंटिग्रेटेड कंट्रोल अँड कमांड सेंटर असावे. कमांड अँड कंट्रोल सेंटरमध्ये या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा सहभाग असावा. तसेच खासगी क्षेत्राच्या माध्यमातून नवीन तंत्रज्ञानाने युक्त ही केंद्र असावीत. या संपूर्ण परिसंस्थेच्या निर्मितीमधून या क्षेत्रात जागतिक स्पर्धेमध्ये महाराष्ट्र कुठेही कमी असणार नाही, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. राज्याकडे विविध योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी खूप मोठ्या प्रमाणावर डेटा आहे. हा डेटा महासारथी पोर्टलवर उपलब्ध आहे. या डेटाचा योजनांना अधिकाधिक लाभ देण्यासाठी कशा पद्धतीने उपयोग झाला पाहिजे, याबाबत मार्गदर्शन करणा-या महासारथी धोरणाची निर्मिती करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.



बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (कृषी) विकास रस्तोगी, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती आदी उपस्थित होते. माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग यांनी सादरीकरण केले.

# नांदेडमध्ये 500 खाटांचे रूग्णालय उभारणार

## शासकीय रु ग्णालयांची सेवा अधिक सक्षम करण्यावर भर

**मुंबई/प्रतिनिधी :** नांदेड जिल्हा रु ग्णालयाचे ५०० खाटांपर्यंत श्रेणीवर्धन करून ते उभारण्यासाठी निधीचा तरतूद करण्यात येईल, असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. राज्यात शासकीय रु ग्णालयांची सेवा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येत असून, विविध आरोग्य योजनांद्वारे नागरिकांना परवडणा-या व गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. सदस्य श्रीजया चव्हाण यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य तुषार राठोड, राजेश पवार, चंद्रदीप नरके यांनी सहभाग घेतला.

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, नांदेड जिल्हा रु ग्णालयाचे यापूर्वी १०० खाटांवरून ३०० खाटांपर्यंत श्रेणीवर्धन करण्यात आले होते आणि त्यासाठी १३८ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली होती. त्यानंतर ३०० वरून ५०० खाटांसाठी श्रेणीवर्धनासही मान्यता मिळाली. तथापि, प्रत्यक्ष काम सुरू झाले नाही. राज्यातील अपूर्ण कामांचा आढावा घेतल्यानंतर ज्या प्रकल्पांची कामे प्रत्यक्ष सुरू झाली नव्हती, अशा सुमारे १७०७ कोटी रुपयांच्या कामांच्या प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आल्या असून त्यामध्ये नांदेड रु ग्णालयाचाही समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. नांदेड शहराची वाढती लोकसंख्या आणि रु ग्णसंख्या लक्षात घेता नव्या आर्थिक प्रस्तावातून या रु ग्णालयासाठी निधी व प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासन सकारात्मक असून, लवकरच कामाला सुरु वात करण्यात येईल. लोकप्रतिनिधींच्या मागण्या, स्थानिक गरजा आणि उपलब्ध निधी यांचा समन्वय साधून आरोग्य सुविधा टप्प्याटप्प्याने उभारण्यात येणार असल्याचे मंत्री आबिटकर यांनी सांगितले. खासगी रु ग्णालयांमधील दर नियंत्रणाबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नावर उत्तर देताना याबाबत स्वतंत्र कायदा नसला तरी विद्यमान कायद्यानुसार रु ग्णालयांना त्यांच्या सेवांचे दर फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. या नियमांचे उल्लंघन करणा-या रु ग्णालयांना नोटिसा देण्यात आल्या असून काहींची परवानगीही रद्द करण्यात आली असल्याची माहिती मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

# नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेला इक्यूबेशन सेंटर म्हणून मान्यता

## विदर्भातील नवऊद्योग परिसंस्था अधिक मजबूत



**मुंबई/प्रतिनिधी :** विदर्भातील नवउद्योग (स्टार्टअप) परिसंस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाउल उचलत, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांनी त्यांच्या सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटरसाठी दोन दिवसीय धोरणात्मक कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेत राज्यभरातील इन्क्यूबेशन सेंटर प्रमुख, शैक्षणिक संस्था तसेच परिसंस्थेतील विविध घटक सहभागी झाले.या कार्यशाळेत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी आणि नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्था यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. यामुळे भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर यांना अधिकृतपणे महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटर म्हणून मान्यता देण्यात आली. या धोरणात्मक समावेशामुळे विदर्भातील नवोपक्रम, उद्योजकता आणि नवउद्योगांच्या वाढीस मोठी चालना मिळणार आहे.कौशल्य, रोजगार, उद्योजकता नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी राज्यात मजबूत व सर्वसमावेशक नवउद्योग परिसंस्था उभारण्याबाबत शासनाची कटिबद्धता अधोरेखित केली. अशा संस्थात्मक सहकार्यांमुळे नवउद्योगांना योग्य मार्गदर्शन, साहाय्य व संधी उपलब्ध होउन प्रादेशिक विकासास हातभार लागेल, असे त्यांनी नमूद केले.कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा यांनी प्रारंभिक टप्प्यातील नवोपक्रमकर्त्यांना साहाय्य देण्यासाठी संस्थात्मक क्षमता वाढ महत्त्वाची असल्याचे सांगितले. जिल्हा व स्थानिक पातळीवर नवोपक्रम विकसित करण्यासाठी सक्षम इन्क्यूबेशन प्रणाली आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डा. श्रीकांत पाटील यांनी सांगितले की, राज्यात २९ सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटरचे मजबूत जाळे उभे करण्यात आले असून ते नवउद्योगांना कल्पनांपासून विस्तारक्षम उपक्रमांपर्यंत पोहोचण्यास मदत करत आहेत. तसेच इन्क्यूबेशन सेंटरनी परस्पर ज्ञान, कौशल्य व संधींची देवाणघेवाण करत सहकार्यपूर्ण परिसंस्था निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यशाळेत इन्क्यूबेशन पद्धती अधिक सक्षम करण्याबरोबरच दीर्घकालीन शाश्वततेवरही भर देण्यात आला.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# निवडणुकांचे रणकंदन

देशाच्या निवडणूक आयोगाने पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी या राज्यातील विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. यातील पुद्दुचेरी हे केंद्रशासित प्रदेश आहे. आता निवडणुका जाहीर झाल्या आहेत आणि यातील मुख्य लक्ष वळले आहे ते मतदारांकडे. कारण या पाचही राज्यांत मतदार मोठ्या संख्येने महिला आहेत ज्यांचे वय ३५ ते ४० दरम्यान असते. त्यांचा कल हा अर्थातच भाजपकडे जास्त आहे. या मतदारांचा कल जाती-पाती अथवा धार्मिक विभाजन यावर नसतो. त्यामुळे भारतातील जे पक्ष एका समूहाला लक्ष्य करून राजकारण करत होते त्यात काँग्रेस आणि समाजवादी पार्टी किंवा डावे पक्ष आहेत, त्यांचे राजकारण मधल्या काळात सपशेल हरलेले पाहिले आहे. यंदाच्या निवडणुकीतही याचीच पुनरावृत्ती होणार आहे. काही महत्त्वाचे मुद्दे आहेत जे निवडणुकीचा कौल ठरवतील. त्यात पहिला आहे तो एस. आय. आर. म्हणजे विशेष गहन पुनरावृत्तीचा. एस. आय. आर.ला विशेषतः प. बंगालमध्ये प्रचंड विरोध होत आहे. पण निवडणूक आयोग आपल्या भूमिकेवर ठाम राहिला आणि त्यामुळे एस. आय. आर.ला सर्वांनाच मान्यता द्यावी लागली. ममता बॅनर्जी या अल्पसंख्याकांच्या नव्या मसीहा आहेत आणि त्यामुळे त्यांना वाटते, की त्या यंदाही मुस्लीम मतदारांच्या जीवावर निवडून येऊ शकतात. प. बंगालचे मतदान यंदा दोन टप्प्यांत आणि राजकीय समीकरणे आणि सुरक्षा व्यवस्थेचा विचार करून घेण्यात येणार आहे. बहुतेक पक्षांनी निवडणूक एकाच किंवा जास्तीत जास्त दोन टप्प्यांत घेण्याची मागणी केली होती आणि त्याचा निवडणूक आयोगाने आदर केला आहे. भारतीय जनता पक्ष, द्रमुक, काँग्रेस आणि अण्णाद्रमुक या पक्षांनी आयोगानेज्या तारखा जाहीर केल्या आहेत त्यांचे स्वागत केले आहे. प. बंगालमध्ये दोन टप्प्यांत एप्रिलमध्ये मतदान होईल, तर केरळ, आसाम, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी या राज्यांत ९ एप्रिलला मतदान होईल. यापैकी तामिळनाडू राज्यात २३ एप्रिलला मतदान होईल. प. बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचा भर प्रामुख्याने अल्पसंख्याक मतांवर आहे आणि त्यासाठीच त्या रोहिंग्यांना देशाबाहेर काढण्यास विरोध करत असतात. भाजपने म्हटले आहे, की ममता यांच्या महाजंगल राजचे अखेरचे क्षण सुरू झाले आहेत. टीएमसी सरकारच्या रोखाने त्यांची ही टीका आहे. सुर्वेंदू अधिकारी हे भाजपचे नेते. ते टीएमसीमध्ये होते, पण २०२१ च्या निवडणुकीनंतर ते भाजपमध्ये आले आणि त्यांनी भाजपला मुख्य विरोधी पक्ष बनवले. त्यांच्यासाठी ही निवडणूक आता आर या पारची आहे, जशी ती ममता बॅनर्जी यांच्यासाठी आहे. पण प. बंगालचा शेजारी असलेल्या आसाममध्ये भाजपचे हिंमत बिस्वसर्मा यांनी मदरशांविरुद्ध रान पेटवले आहे आणि आसामी ओळख पुन्हा हिंदूंना देण्यासाठी ते युद्धात उतरले आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी ही निवडणूक आसामला नवी ओळख देणारी ठरणार आहे. आसाममध्ये भाजपला पूर्वीच्या सर्वेक्षणांमध्ये पुन्हा सत्ता हस्तगत करता येईल असेच चित्र आहे, तर काँग्रेस दुसऱ्या स्थानावर राहील असे चित्र आहे. भाजप सलग तिसऱ्यांदा सत्ता पटकावण्यात यशस्वी होईल असे सर्व्हे सांगतात, आसाममध्ये भाजपच्या मतांनंतर ऑल इंडिया युनायटेड फ्रंट यांना काहीसा फायदा मिळण्याची शक्यता आहे. कोणता पक्ष किती जागा लढवणार हे येत्या चार-पाच दिवसांत ठरेल, असे पक्षाचे आमदार रफीक आलम यांनी सांगितले. पण आसाम हे राज्य घुसखोरांच्या समस्येने ग्रस्त आहे आणि तेथे भाजपच घुसखोरांना अटकाव करू शकतो अशी समजूत पसरली आहे. निवडणूक जाहीर होण्याच्या अगदी अलीकडे, तामिळनाडूत सरकारने २४ जिल्ह्यांत दुष्काळ जाहीर केला, पिण्याच्या पाण्याच्या समस्या राज्याच्या या भागात कायम तीव्र स्वरूपात राहिल्या होत्या. अशीच जर स्थिती राहिली, तर येत्या काही दिवसांत चेन्नईची परिस्थितीही चिंतनीय होऊ शकेल. अण्णाद्रमुक सरकारने १५८ कोटी रुपये महानगरात पाणी पुरवण्यासाठी दिले आहेत, पण तरीही प्रश्न तसाच आहे. शिवाय शेतकऱ्यांचे प्रश्नही आहेत. कावेरी नदीचा प्रश्न अद्याप तसाच अनुत्तरित आहे. यामुळे येथे स्टॅलिनला ही निवडणूक अत्यंत अवघड जाणार आहे. पुद्दुचेरीत निवडणूक एनडीए आणि द्रमुक काँग्रेस यांच्यात रंगतदार होणार आहे हे नक्की. यंदा कुणीही फेव्हरेट नेता नसल्याने एनडीए एन आर काँग्रेसप्रणीत आणि द्रमुक काँग्रेसप्रणीत द्रमुक आघाडी यांच्यातच ही निवडणूक रंगणार आहे. भाजप या केंद्रशासित प्रदेशात पाय रोवण्याचा प्रयत्न करत आहे आणि त्याने तमिळ भाषक पुद्दुचेरीत शेजारच्या तामिळनाडूत आपला संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. पुद्दुचेरी असो, आसाम असो, की प. बंगाल, डबल इंजिन सरकारचा मुद्दा येथे भाजपला यश देऊन गेला आहे. पुद्दुचेरीत मुख्यमंत्री एन. रंगास्वामी यांची लोकप्रियता आणि डबल इंजिनचे तत्त्वज्ञान जे लोकांना पटले आहे त्याचा फायदा भाजपला होईल असे वाटते. केरळमध्ये आर्थिक संघर्ष, उच्च प्रमाणात असलेली बेरोजगारी आणि तीव्र गतीने वृद्ध होत चाललेली लोकसंख्या हे प्रश्न तीव्र आहेत. केरळलाही गॉड्स ओन कंट्री म्हणतात, पण तेथे हत्ती आणि अन्य वन्य प्राणी सुरक्षित नाहीत आणि हे मुद्दे तापलेले आहेत, शबरीमाला महिलांना प्रवेशाचा प्रश्न असो, की भ्रष्टाचार आणि भाई-भतीजावाद असो, हे मुद्दे तेथे मतदारांवर प्रभाव टाकून जाणार आहेत हे निश्चित आहे. सर्वच राज्ये ही निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाची असतात. पण जास्त महत्त्वाचे आहे ते पश्चिम बंगाल. कारण येथे ममता यांच्या कुशासनाने कहर केला आहे. त्यामुळे या राज्याला यंदा परिवर्तनाची चांगली संधी आली आहे. पण त्या राज्यातील मतदारांनी ती घेतली पाहिजे. ममता बॅनर्जी यांचे अल्पसंख्याक मतदारांवर असलेले वजन त्यांना यंदा विजयी करू शकणार नाही असे वाटते. पण मतदार राजा अंतिम निर्णय ठरवत असतो. त्याच्या मनात काय आहे ते कुणीच सांगू शकत नाही.

# महाराष्ट्राची आर्थिक प्रगती आणि विषमता

*महाराष्ट्राची सरासरी प्रगती समाधानकारक दिसत असली, तरी वास्तवात आर्थिक लाभ केवळ काही प्रमुख औद्योगिक शहरांच्याच वाट्याला आले आहेत. या लखलखाटामागे प्रादेशिक विषमतेचा एक मोठा विरोधाभास दडलेला आहे. महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन आहे, परंतु याचा लाभ सर्व जिल्ह्यांना मिळणे गरजेचे आहे. केवळ जीडीपी वाढवणे पुरेसे नाही. उद्योगांचे विकेंद्रीकरण, ग्रामीण कौशल्य विकास आणि शेतीचे हवामान-अनुकूल आधुनिकीकरण करणे, हीच प्रादेशिक विषमता दूर करण्याची गुरुकिल्ली ठरेल.*

महाराष्ट्र सरकारने मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात 'महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६' सादर केला. राज्याच्या आर्थिक स्थितीचा हा अधिकृत आरसा आहे. हा अहवाल धोरणकर्त्यांसाठी आणि जनतेसाठी राज्याचे 'प्रगती पुस्तक' मानला जातो. यातील निष्कर्षांनुसार, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे, परंतु या प्रगतीसोबतच प्रादेशिक विषमताही तितकीच मोठी आहे.

अहवालानुसार, राज्याचे अपेक्षित दरडोई उत्पन्न ३,४७,९०३ आहे, जे देशाच्या सरासरीपेक्षा २,१९,५७५ उल्लेखनीयरीत्या जास्त आहे. हे आकडे राज्याच्या आर्थिक ताकदीबद्दल अनेक रंजक गोष्टी सांगतात. पण आकडेवारीबद्दल एक प्रसिद्ध इंग्रजी सुविचार आहे - आकडेवारीच्या साह्याने तुम्ही काहीही सिद्ध करू शकता. अगदी सत्य सुद्धा! (Statistics? You can prove anything with statistics. Even the truth.) महाराष्ट्राच्या बाबतीत हेच घडत आहे. सांख्यिकीय सरासरी अनेकदा जमिनीवरील वास्तव लपवते. राज्याची सरासरी प्रगती समाधानकारक दिसत असली, तरी वास्तवात आर्थिक लाभ केवळ काही प्रमुख औद्योगिक शहरांच्याच वाट्याला आले आहेत. या लखलखाटामागे प्रादेशिक विषमतेचा एक मोठा विरोधाभास दडलेला आहे.

**दरडोई उत्पन्न आणि मानव विकास**

राज्यातील ३६ जिल्ह्यांचा विचार केल्यास विकासाचा समतोल बिघडल्याचे दिसते. राज्याच्या उत्पन्नात मुंबई महानगर क्षेत्र (MMR)- ठाणे, पुणे आणि नाशिक या सुवर्ण त्रिकोणाचे वर्चस्व आहे. या विकसित भागात पायाभूत सुविधा उत्तम असून तिथेच मोठी गुंतवणूक आकर्षित होते. याउलट, राज्याचा मोठा भूभाग आजही प्रगतीच्या प्रवाहापासून दूर आहे. राज्यात आरोग्य सेवा, शैक्षणिक गुणवत्ता आणि जीवनमानाचा स्तर यामध्ये कमालीची विषमता आढळते. प्रगत जिल्ह्यांमध्ये सुपर स्पेशालिटी रुग्णालये आणि प्रगत शिक्षण प्रणालीचे जाळे विस्तारलेले आहे. याउलट, नंदुरबार आणि गडचिरोली सारख्या आदिवासीबहुल जिल्ह्यां मध्ये आजही प्राथमिक सोई सुविधांची मोठी वानवा आहे. विकासाच्या संधींचे हे विषम वाटप राज्याच्या प्रगतीमध्ये सामाजिक अडथळे निर्माण करते.




| जिल्हा श्रेणी | दरडोई उत्पन्न | प्रमुख जिल्हे |
|---|---|---|
| उच्च उत्पन्न | ३ लाखांच्या वर | मुंबई, पुणे, ठाणे, रायगड, कोल्हापूर आणि नागपूर. |
| मध्यम उत्पन्न | २ लाख ते ३ लाख | नाशिक, सांगली, सातारा, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर. |
| निम्न उत्पन्न | २ लाखांच्या पेक्षा कमी | बीड, जालना, यवतमाळ, गडचिरोली, नंदूरबार, गोंदिया आणि इतर ११ जिल्हे. |

**कृषी क्षेत्राची पीछेहाट**

'आर्थिक पाहणी २०२५-२६' च्या पूर्वअंदाजानुसार (Advance Estimates), राज्याचा वास्तविक विकास दर ९.४ टक्के अपेक्षित आहे. मात्र क्षेत्रनिहाय वाढीमध्ये मोठी तफावत आहे,

**सेवा क्षेत्र :** ९ टक्के वाढ (अपेक्षित)

**उद्योग क्षेत्र :** ५.७ टक्के वाढ (अपेक्षित)

**कृषी आणि संलग्न क्षेत्र :** केवळ ३.४ टक्के वाढ (अपेक्षित)

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे स्थान महत्त्वाचे आहे, कारण आजही निम्मी लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे यावर अवलंबून आहे. अहवालात कृषी क्षेत्राबाबत एक विचित्र विरोधाभास दिसतो: या वर्षी राज्यात सरासरीच्या १०९.१ टक्के पाऊस झाला असूनही, कृषी विकासदर गेल्या वर्षीच्या ९.१ टक्क्यांवरून थेट ३.४ टक्क्यांवर खाली आला आहे.

### पावसाचे विषम वितरण

पाऊस पुरेसा असूनही विकासदर घटण्याचे मुख्य कारण 'पावसाचे विषम वितरण' हे आहे. सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२५ मधील अतिवृष्टी आणि गारपिटीने खरिपाचे गणित बिघडवले. यामुळे राज्यातील ६० टक्क्यांपेक्षा जास्त खरीप पिकांचे नुकसान झाले असून, त्याचा फटका सुमारे ३५ लाख शेतकऱ्यांना बसला आहे.

अहवालानुसार, विविध पिकांच्या उत्पादनातील कल खालीलप्रमाणे आहे.

| पीक प्रकार | उत्पादन बदल (अंदाजे) | मुख्य कारण |
|---|---|---|
| अन्नधान्य (Foodgrains) | +१०.६ टक्के | रब्बी हंगामातील पिकांची चांगली कामगिरी. |
| कडधान्ये (Pulses) | - २८.२ टक्के | खरिपातील तूर आणि मुगाचे पावसाने झालेले नुकसान. |
| तेलबिया (Oilseeds) | -४७.४ टक्के | सोयाबीन उत्पादनात झालेली मोठी घट. |
| ऊस (Sugarcane) | + २२.० टक्के | मुबलक पाण्यामुळे उसाच्या क्षेत्रात झालेली वाढ. |
| कापूस (Cotton) | +७.० टक्के | उत्पादकता वाढली तरी दराचा प्रश्न गंभीर. |

शेतीवरील अतिरिक्त अवलंबित्व आणि हवामान बदलामुळे ग्रामीण भागातील क्रयशक्ती मर्यादित राहिली आहे.

**गुंतवणूक : महाराष्ट्र आणि गुजरात मधील तफावत**

महाराष्ट्र आजही थेट परकीय गुंतवणुकीत देशात आघाडीवर (३१ टक्के वाटा) असला, तरी गुंतवणुकीचे 'प्रस्ताव' आणि त्यांची प्रत्यक्ष 'अंमलबजावणी' यात मोठी तफावत आहे. महाराष्ट्रात प्रस्तावित गुंतवणुकीपैकी केवळ ५३ टक्के गुंतवणूक प्रत्यक्षात आली आहे, तर गुजरातमध्ये हे प्रमाण ११८ टक्के आहे. या आघाडीवर महाराष्ट्राला गंभीरपणे आत्मचिंतन करण्याची गरज आहे, कारण केवळ गुंतवणुकीचे प्रस्ताव आकर्षित करणे पुरेसे नसून त्यांचे प्रत्यक्ष प्रकल्पामध्ये रूपांतर होणे राज्याच्या औद्योगिक भविष्यासाठी महत्त्वाचे आहे.

| गुंतवणूक प्रकार (२०२२-२०२४) | महाराष्ट्र | गुजरात |
|---|---|---|
| प्रस्तावित गुंतवणूक (Intended) | २,१४,७५४ कोटी | २,२६,५६५ कोटी |
| प्रत्यक्ष गुंतवणूक (Actual | १,१५,२३३ कोटी | २,६८,९१० कोटी |

**वित्तीय ताकद आणि महसूल केंद्रीकरण**

देशातील बँक ठेवींच्या बाबतीत महाराष्ट्राचा वाटा तब्बल २२.७ टक्के असून मुंबई हे उत्तम वित्तीय केंद्र असल्याने ही स्थिती भक्कम आहे. मे २०२५ मध्ये राज्याने ३१,५३० कोटींचा विक्रमी जीएसटी जमा केला. मात्र या महसुलापैकी ७५ ते ८० टक्के हिस्सा केवळ मुंबई, पुणे आणि ठाणे या तीन जिल्ह्यांतून आतापर्यंत येत होता. उर्वरित महाराष्ट्र अनुदानावर अवलंबून आहे.

**नागरीकरण आणि स्थलांतराचा दबाव**

आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ नुसार, महाराष्ट्रातील नागरीकरणाचा दर देशात सर्वाधिक असून सुमारे ४५.२ टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव्यास आहे. आर्थिक विषमता आणि शेतीतील संकटामुळे 'गावाकडून शहराकडे' होणाऱ्या स्थलांतराचा वेग आता वाढला आहे. हे स्थलांतर केवळ पोटापाण्यासाठी नसून, ते मुलांचे शिक्षण आणि चांगल्या सुखसोईंच्या शोधासा ठीही आहे.

**गावे सोडून जाण्याची ओढ-** अहवालातील कृषी क्षेत्रातील ३.४ टक्के अल्प वाढ आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत अनिश्चितता निर्माण झाली आहे. शेतीतील नफा घटल्यामुळे आणि कर्जाच्या बोजामुळे तरुण पिढीला शेती नकोशी वाटू लागली आहे. गावात शेतीव्यतिरिक्त रोजगाराची दुसरी साधने उपलब्ध नसल्यामुळे, ६० टक्क्यांपेक्षा जास्त पुरुष स्थलांतरित केवळ कामाच्या शोधात शहराकडे धाव घेत आहेत.

याचा परिणाम म्हणून विशेषतः राज्याच्या अनेक दुष्काळी आणि दुर्गम ग्रामीण भागांत आता मुख्यत्वे वृद्ध माणसे आणि मुलेच उरल्याचे चित्र समोर येत असून, यामुळे तिथल्या सामाजिक आणि कौटुंबिक रचनेत मोठे बदल होत आहेत.

**शहरांचे आकर्षण-** मुंबई, पुणे आणि ठाणे यांसारख्या शहरांमध्ये सेवा क्षेत्रात (उदा. आयटी, बँकिंग, डिलिव्हरी) होणारी ९ टक्क्यांची मोठी वाढ तरुणांना आकर्षित करते. तिथे काम मिळेल या आशेने तरुण शहराकडे आकर्षित होत आहेत. मात्र महानगरांमध्ये माणसांची गर्दी इतकी वाढली आहे की रस्ते, वीज आणि पाणी यांसारख्या सुविधा अपुऱ्या पडू लागल्या आहेत. घरांची वाढती भाडी आणि महागड्या राहणीमानामुळे, गावातून आलेल्या तरुणांना अनेकदा सुविधांचा अभाव असलेल्या वस्त्यांमध्ये दिवस काढावे लागत आहेत.

**सामाजिक आणि आर्थिक परिणाम-** या अनियंत्रित स्थलांतरामुळे शहरांमध्ये प्रदूषण, वाहतूक कोंडी आणि झोपडपट्ट्यांचे प्रश्न गंभीर होत आहेत. दुसरीकडे, ग्रामीण भागात शेतमजुरांची कमतरता निर्माण झाल्याने शेतीचा मजुरी खर्च वाढत आहे. हा असमतोल राज्याच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांसमोर अडथळा निर्माण करत आहे.

महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन आहे, परंतु याचा लाभ सर्व जिल्ह्यांना मिळणे गरजेचे आहे. केवळ जीडीपी वाढवणे पुरेसे नाही. उद्योगांचे विकेंद्रीकरण, ग्रामीण कौशल्य विकास आणि शेतीचे हवामान-अनुकूल आधुनिकीकरण करणे, हीच प्रादेशिक विषमता दूर करण्याची गुरुकिल्ली ठरेल.

हा लेख केवळ समस्यांची एकतर्फी यादी वाटू शकतो, परंतु धोरणकर्त्यांना या त्रुटी वेळीच लक्षात याव्यात आणि त्यांनी त्यावर प्रभावी उपाययोजना कराव्यात, यासाठी या मुद्द्यांवर प्रकाश टाकणे अत्यंत आवश्यक आहे. राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी या आव्हानाचा स्वीकार करून धोरणात्मक बदल करणे काळाची गरज आहे.

(संदर्भ-महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ आणि महाराष्ट्र मानव विकास अहवाल.)

**अमोल साळे**
मो.७०८३५८१२८१
(लेखक आर्थिक विषयांचे अभ्यासक आहेत.)

# तामिळनाडूत द्रमुक विजयाची हॅटट्रिक साधणार ?

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची तारीख आयोगाने नुकतीच जाहीर केली आहे.२३ एप्रिल रोजी तामिळनाडू विधानसभेसाठी मतदान होणार आहे.विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी,अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी आणि सिनेस्टार विजय याच्या नेतृत्वाखालील टीव्हीके (तमिलगा वेत्री कळघम) हे प्रमुख पक्ष असणार आहेत.द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीत, काँग्रेस, वायको यांच्या नेतृत्वाखालील एमडीएमके, प्रेमलता(दिवंगत सिनेस्टार विजयकांत यांची पत्नी) यांच्या नेतृत्वाखालील डीएमडीके,सीपीएम,सीपीआय ,व्हीसीके, इत्यादी पक्ष आहेत.या आघाडीचे जागा वाटपही पूर्ण झाले आहे.त्यामध्ये थोडेफार बदल होऊ शकतील.जागा वाटपात द्रमुकला(विधानसभेच्या २३४ जागांपैकी ) १५६ जागा सोडण्यात आल्या आहेत.कॉंग्रेसला ३० जागा, व्हीसीके ६ जागा,एमडीएमके ४ जागा, सीपीएम ६ जागा, सीपीआय ६ जागा आणि डीएमडीके या पक्षाला ६ जागा सोडण्यात आल्या आहेत.यातील डीएमडीके हा पक्ष अण्णा द्रमुकची साथ सोडून या खेपेस द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीतून निवडणूक लढवणार आहे.

२०१६ पासून द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी तामिळनाडूमध्ये सत्तेवर आहे. त्यामुळे अँटी इन्क्युंबन्सी फॅक्टरचा सामना आघाडीला करावा लागणार आहे.२०२१ मध्ये झालेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत द्रमुकला १३३ जागांवर विजय मिळाला होता.अण्णा द्रमुकला ६६ जागांवर विजय मिळाला होता.कॉंग्रेसने १८ जागा जिंकल्या होत्या.डॉक्टर रामदास यांच्या नेतृत्वाखालील पीएमकेने ५ जागा जिंकल्या होत्या.व्हीसीके आणि भाजपा यांनी प्रत्येकी ४ जागा जिंकल्या होत्या तर सीपीएम आणि सीपीआय यांनी प्रत्येकी दोन जागा जिंकल्या होत्या.आघाडीच्या भाषेत सांगायचे झाले तर, द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीला १५९ जागांवर विजय मिळाला होता,तर अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीला ७५ जागांवर विजय मिळाला होता.



या खेपेच्या निवडणुकीची ठळक वैशिष्ठ्ये म्हणजे, सिनेस्टार विजय याच्या नेतृत्वाखालील टीव्हीके हा पक्ष प्रथमच निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे.विजय याच्या फॅन्सची संख्या प्रचंड आहे.दिवंगत सुपर स्टार विजयकांत यांचा पक्ष डीएमडीके हा या खेपेला द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी बरोबर लढणार आहे.त्याचे नेतृत्व, विजयकांत यांची पत्नी प्रेमलता या करत आहेत.तामिळनाडूत विजयकांत यांच्या पाठिराख्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.२०११ मध्ये झालेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत विजयकांत यांच्या नेतृत्वाखालील डीएमडीके या पक्षाला २९ जागांवर विजय मिळाला होता.त्यामुळे द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीची स्थिती आणखी मजबूत होणार आहे.तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री ओ.पन्निरसेल्वम यांनी मध्यंतरी रालोआची साथ सोडून द्रमुक बरोबर जाण्याचा निर्णय घेतल्याने, द्रमुकचा फायदा होणार आहे.तामिळनाडूमध्ये मोठ्या संख्येने असणाऱ्या थेवर समाजावर,ओ.पन्निरसेल्वम यांचा चांगला प्रभाव आहे.

द्रमुकने आपल्या कार्यकाळात काही कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत.त्यांमध्ये महिलांना आर्थिक मदत, शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत जेवण, राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस मधून मोफत प्रवास इत्यादी सुविधांचा समावेश आहे.तसेच रोजगार निर्मितीसाठी अनेक प्रकल्प द्रमुकच्या नेतृत्वाखालील सरकारने हाती घेतले आहेत.हिंदी भाषेच्या तथाकथित सक्ती विरोधात द्रमुकने नेहमीच आवाज उठवला आहे.अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी निवडणुकीत जिंकल्यास, तामिळनाडूची सारी सूत्रे भाजपाच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या ताब्यात जातील,असा प्रचार द्रमुकने अगोदर पासूनच सुरु केला आहे.या उलट अण्णा द्रमुकने राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था परिस्थिती, महिलांमधील असुरक्षितता आणि भ्रष्टाचार या बाबींवर विशेष जोर दिला आहे.त्याशिवाय राज्यात डबल इंजिन सरकार सत्तेवर आल्यास केंद्र सरकारच्या निरनिराळ्या कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवता येतील असा दावा अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीने केला आहे.

अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीत भाजपा,पीएमके,माजी मुख्यमंत्री जयललिता यांच्या सहकारी, शशिकला यांचे भाचे टी.टी.व्ही. दिनकरन यांच्या नेतृत्वाखालील एएमएमके हा पक्ष आणि इतर छोटे पक्ष आहेत.यापैकी भाजपाने २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत बऱ्यापैकी कामगिरी केली होती.तामिळनाडूतील वन्नियार या समाजाचा पीएमके या पक्षाला नेहमीच मजबूत पाठिंबा राहीला आहे.हा समाज तामिळनाडूमध्ये मोठ्या प्रमाणात आहे.मात्र मध्यंतरी पीएमके या पक्षात फूट पडल्याने वन्नियार समाज मोठ्या प्रमाणात विभागला गेला आहे.पीएमके या पक्षाचे संस्थापक डॉ.एस.रामदास आणि त्यांचे सुपुत्र अंबुमणी रामदास यांच्यामध्ये मध्यंतरी वितुष्ट आल्याने पक्षात फूट पडली आहे,त्याचा फटका विधानसभा निवडणुकीत पीएमके या पक्षाला, म्हणजेच पर्यायाने अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीला बसू शकेल.

सिनेस्टार विजय याच्या नेतृत्वाखालील पक्षाला तामिळनाडूची जनता कसा प्रतिसाद देते, हे पहावे लागेल.विजयच्या फॅन्सची संख्या मोठ्या प्रमाणात असली तरी,त्याच्याकडे मजबूत अशी संघटना नाही.त्याच्या पक्षाला निवडणुकीत कितपत यश मिळेल हे आताच सांगता येणार नाही, मात्र त्याचा पक्ष , द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी आणि अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी यांना मिळणाऱ्या पारंपरिक मतांमध्ये विभाजन घडवून आणू शकेल.या पार्श्वभूमीवर द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीची स्थिती सध्या तरी मजबूत दिसत आहे.

**अभय गोखले**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज यांच्या

# अद्वितीय साहित्याच्या जतनासाठी विदर्भामध्ये 'बुक म्युझियम' उभारण्याची मागणी


**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील महान संत, तत्त्वज्ञ व साहित्यिक प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज यांच्या अद्वितीय वाङ्मयाचे जतन, संवर्धन व व्यापक प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विशेष पुढाकार घ्यावा, अशी मागणी प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज साहित्य प्रचार मोहीम, महाराष्ट्र राज्य चे प्रमुख माधुर्य विस्मय ठाकरे यांनी केली आहे.या उपक्रमांतर्गत विदर्भातील 'अमरावती' तसेच 'नागपूर' या दोन्ही शहरांमध्ये आधुनिक सुविधांनी सुसज्ज असे 'बुक म्युझियम' उभारण्यात यावे, अशी नम्र विनंती करण्यात आली आहे. या म्युझियमच्या



माध्यमातून संतांच्या जीवनकार्याचा अभ्यास, त्यांच्या विचारपरंपरेचे सुसंगत सादरीकरण तसेच त्यांच्या समृद्ध साहित्यसंपदेचे जतन, संशोधन व प्रभावी प्रदर्शन करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे संत गुलाबराव महाराजांच्या कार्याचा वारसा भावी पिढ्यांपर्यंत अधिक व्यापक आणि प्रभावी पद्धतीने पोहोचविणे शक्य होईल.

प्रस्तावित बुक म्युझियममध्ये आधुनिक तंत्रज्ञान, दृक्-श्रव्य साधने आणि डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून संत गुलाबराव महाराज यांच्या एकूण सहा हजार पृष्ठांच्या सामावलेल्या १३४ ग्रंथांच्या ग्रंथसंपदेचे आकर्षक व अभ्यासपूर्ण सादरीकरण करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. विवेकानंद हाउस चेन्नई प्रमाणे अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग



करून त्यांच्या साहित्याचे संग्रहीकरण, जतन व सादरीकरण केल्यास देशभरातील अभ्यासक, विद्यार्थी, संशोधक आणि भाविकांना संतांच्या विचारांचा अधिक प्रभावीपणे परिचय होऊ शकतो. तसेच या केंद्रामध्ये संतांच्या ग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी विशेष वाचन व्यवस्था, दृकश्राव्य साधने, संशोधनासाठी आवश्यक साधने तसेच त्यांच्या विचारांवर आधारित माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्याची सुविधाही निर्माण होऊ शकते. त्यामुळे हे केंद्र केवळ संग्रहालय न राहता अभ्यासकांसाठी एक प्रेरणादायी ज्ञानकेंद्र ठरू शकते.

संत गुलाबराव महाराज हे विदर्भातील महान संत, तत्त्वज्ञ आणि साहित्यिक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात आदराने ओळखले जातात. अंधत्व असतानाही त्यांनी विलक्षण बुद्धिमत्ता, गहन आध्यात्मिक चिंतन आणि अभ्यासपूर्ण दृष्टिकोन यांच्या बळावर विपुल व अमूल्य साहित्यनिर्मिती केली आहे. तथापि, त्यांच्या कार्याची व विचारसंपदेची माहिती अद्याप समाजातील अनेक घटकांपर्यंत, विशेषतः सर्वसामान्य वाचक, विद्यार्थी आणि संशोधकांपर्यंत पुरेशा प्रमाणात पोहोचलेली नाही. त्यामुळे त्यांच्या साहित्याचे जतन, संवर्धन व व्यापक प्रसार करण्यासाठी शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करून हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घ्यावा, अशी विनंती करण्यात आली आहे. या अनुषंगाने संस्थेतर्फे सविस्तर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून, या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज साहित्य प्रचार मोहीम तसेच वारकरी शिक्षण संस्था, तीर्थक्षेत्र बेलोरा ता चांदुरबाजार, जि. अमरावती यांच्याकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याची तयारी दर्शविण्यात आली आहे.

## अमरावतीत कैरीसह बैंगनपल्ली आंब्याची आवक

**अमरावती/का.प्र.**

तापमानात वाढ होताच स्थानिक फळ आणि भाजीपाला बाजार समितीमध्ये कैरीची आवक सुरू झाली आहे. सध्या सरासरी ७४ क्विंटल कैरीची आवक होत असून ती मुख्यत्वे हैदराबाद, तेलंगणा भागातील असल्याचे व्यापारी सूत्रांनी सांगितले. सध्या कैरीचे व्यवहार ४००० ते ५००० रुपये क्विंटलने होत आहे.

तापमानात वाढीसोबतच हंगामी फळांची आवक बाजार समितीमध्ये वाढीस लागते. कैरी सोबतच बाजारात कलिंगड आणि खरबूज आवक देखील मोठ्या प्रमाणावर होत आहे. व्यापारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार कलिंगड आवक १००० क्विंटल च्या आसपास असून त्याचे व्यवहार ७४० ते १००० रुपये क्विंटल ने होत आहेत. खरबूज आवक ८०० क्विंटलच्या आसपास असून त्याचे दर १२०० ते १५०० रुपयांवर आहेत. रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर बाजारात तायवान पपईची आवक नियमित



होत असून ती गेल्या आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात कमी असल्याचे सांगितले जाते. पपई आवक १०७ क्विंटल असून १७०० ते १८०० असा दर याला होता. सध्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर लिंबाला देखील मागणी वाढली आहे. परिणामी लिंबाचे दर चांगले तेजीत आले आहेत. सध्या लिंबाचे व्यवहार सात हजार ते नऊ हजार रुपये क्विंटल होत असून आवक ४३ क्विंटल इतकी होती. बैंगनपल्ली आंबा देखील बाजारात येत असून याचे दर ८००० ते ९००० रुपये क्विंटल याप्रमाणे होते. याची आवक ११७ क्विंटल इतकी झाली. डाळिंब आवक ७४ क्विंटल असून याचे दर १२ हजार ते १४ हजार रुपये क्विंटल याप्रमाणे होतील. मोसंबीला २४०० ते २६०० असा दर मिळत याची आवक ७१ क्विंटल झाली. लहान आकाराच्या संत्रा फळांची देखील बाजारात आवक होत असून ही आवक १५८ क्विंटल इतकी होती. लहान आकाराच्या या संत्रा फळांना सरासरी २००० ते २२०० याप्रमाणे दर मिळत आहे. भाजी बाजाराचा विचार करता उत्तर प्रदेश भागातील पांढऱ्या बटाट्याची ५७२ क्विंटल इतकी आवक होत आहे. याचे दर ४०० ते १४०० रुपये क्विंटल याप्रमाणे आहेत. कांदा आवक ४७५ क्विंटल असून याचे दर ७०० ते २४०० याप्रमाणे होते. कोथिंबीर आवक १५० क्विंटल वर पोहोचली असून ७०० ते १००० रुपये असा याचा दर होता. हिरव्या मिरचीला ५००० ते ५५०० असा दर मिळत ६४ क्विंटलची आवक झाली.

खरेदी केंद्र सुरू होऊनही

## तूर, हरभऱ्याचे दर हमीभावाच्या खालीच

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात हमीभावाने हरभरा आणि तुरीची खरेदी करण्यासाठी केंद्र उघडण्यात आले असले, तरी खुल्या बाजारात अजूनही दोन्ही कडधान्याचे दर वाढलेले नाही. बाजार समितीत गेल्या आठवडाभरापासून सरासरी ७हजार ६९९ रुपयांवर स्थिर आहेत. तर हरभऱ्याच्या दरात किंचित वाढ होऊन सरासरी ५ हजार ५० रुपयांपर्यंत पोहचले आहेत.

समितीत ५ हजार ९८२ क्विटल शनिवारी अमरावती बाजार तुरीची आवक झाली. ७ हजार ४०० ते ७ हजार ९९९ रुपये प्रतिक्विटल दर मिळाला. तर ६ हजार २६७क्विटल हरभऱ्याची आवक झाली आणि ४ हजार ८०० ते ५ हजार ५०० रुपये इतका दर मिळाला. हरभऱ्याचा हमीभाव ५ हजार ८७५ तूरीचा हमीभाव ८ हजार रुपये तर प्रतिक्विटल आहे. शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी किमतीत आपला शेतमाल विकावा लागत आहे.

**सरकारी खरेदी सुरू**

दुसरीकडे, हरभरा आणि तुरीच्या सरकारी खरेदीला वेग आला असून प्रशासनाने जिल्ह्यात १५ सरकारी खरेदी केंद्र सुरू केली आहे. या शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून केंद्रांवर आतापर्यंत ९ हजार १४५ एकूण १६ हजार ९७७.५ क्विटल धान्याची खरेदी करण्यात आली. या केंद्रांद्वारे शेतकऱ्यांकडून आधारभूत किमतीवर खरेदी केली जात आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही, त्यांनी तातडीने नोंदणी करून सरकारी खरेदी केंद्रांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रशासनाने केले आहे. शेतकऱ्यांना आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी उत्पादन आणण्यापूर्वी टोकन घेणे आवश्यक असून नियोजित तारखेनुसार धान्याचे वजन करून खरेदी केली आवाहन जाते. प्रशासनाने शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीप्रमाणे ठरलेल्या दिवशीच उत्पादन केंद्रावर प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

विदर्भ सहकारी मार्केटिंग सोसायटी अंतर्गत जिल्ह्यातील ८ सरकारी खरेदी केंद्रांवर हरभरा आणि तूर खरेदी सुरू आहे. या केंद्रांमध्ये अमरावती कृषी बाजार, चांदूर बाजार, धामणगाव रेल्वे, वरुड, मोर्शी, शिंगणापूर (दर्यापूर) आणि मंगरुळ दस्तगीर (धामणगाव रेल्वे) यांचा समावेश आहे. या केंद्रांवर आतापर्यंत २ हजार ८०८ शेतकऱ्यांनी हरभरा आणि ३ हजार ६२८ शेतकऱ्यांनी तूर विक्रीसाठी नोंदणी केली. आजपर्यंत १ हजार ५०० क्विंटल हरभरा आणि १४ हजार ३११ क्विटल तूर खरेदी करण्यात आली. विदर्भसहकारी मार्केटिंग सोसायटी अंतर्गत ८ सरकारी खरेदी केंद्रांवर शेतकरी भोंदणी आणि खरेदी सुरळीतपणे सुरू आहे. येत्या काळात खरेदीचे प्रमाण आणखी वाढण्याची अपेक्षा आहे.

करारनाम्यातील अटींचे उल्लंघन केल्याबद्दल

## मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्यावर ९.६५ लाखांचा दंड

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिकेमार्फत शहरातील घनकचरा संकलन व वाहतूकतसेच शहरातील दैनंदिन साफसफाईची कामे करण्यासाठी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्यासोबत करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनाम्यानुसार कंत्राटदारामार्फत Part-A अंतर्गत कामे डिसेबर २०२५ पासून सुरू करण्यात आलेली आहेत.करारनाम्यात नमूद अटी व शर्तीचे पालन करणे कंत्राटदारावर बंधनकारक असून स्वच्छता विभागामार्फत वेळोवेळी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान १ ते १३मार्च या कालावधीत काही त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

पाहणीदरम्यान कंत्राटदारामार्फत वापरात असलेल्या काही वाहनांकडे Driving License, Registration Certificate, Insurance व Road Fitness Certificate यांसारखी आवश्यक कागदपत्रे तपासणीवेळी उपलब्ध आढळून आली नाहीत. तसेच सदर कागदपत्रे स्वच्छता विभाग कार्यालयात सादर करण्यात आलेली नसल्याचेही आढळून आले आहे. करारनाम्यानुसार ही बाब बंधनकारक असून सदर त्रुटी ही करारनाम्यातील अटींचे उल्लंघन असल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच करारनाम्यानुसार कंत्राटदाराने आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या सर्व कामगारांना Uniform, Shoes, Cap, Hand Gloves, PPE Kit तसेच ओळखपत्र (ID Card) उपलब्ध करून देणे बंधनकारक असताना प्रत्यक्ष पाहणीदरम्यान अनेक कामगारांकडे वरील सुरक्षा साहित्य उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे. घनकचरा व्यवस्थापनासारख्या आरोग्यदृष्ट्या संवेदनशील कामामध्ये कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक असून यामध्ये झालेली त्रुटी गंभीर स्वरूपाची आहे.सदर बाबींची वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) तसेच मा. अतिरिक्त आयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर केलेला असून त्यानुसार कंत्राटदाराकडून करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाले आहे.त्रुटीसाठी एकूण ९,६५,०००/- (रुपये नऊ लाख पासष्ट हजार फक्त) इतका दंड मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्यावर करण्यात आलेला आहे.अमरावती महानगरपालिकेमार्फत शहरातील स्वच्छता व्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही. करारनाम्यानुसार कामे न करणाऱ्या किंवा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदारांवर नियमांनुसार कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे महानगरपालिकेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

## आरटीई प्रवेशाच्या जाचक अटीला न्यायालयाची स्थगिती

राज्य सरकारला मोठा धक्का; उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय
हक्काच्या शिक्षणासाठी पालकांना मिळाला मोठा दिलासा

**अमरावती/का.प्र.**

खाजगी शाळांमध्ये वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांच्या प्रवेशासाठी असलेल्या आरटीई (शिक्षण हक्क) कायद्यांतर्गत महाराष्ट्र सरकारने लागू केलेल्या १ किलोमीटर अंतराच्या अटीला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारच्या या निर्णयावर कडक शब्दांत ताशेरे ओढले असून, आरटीई कायद्यात अशा प्रकारच्या अंतराच्या अटीचा कोणताही उल्लेख नसल्याचे स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र सरकारने आरटीई प्रवेश प्रक्रियेत बदल करून




नवीन नियम लागू केला होता. यानुसार, आरटीई अंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या निवासापासून केवळ १ किलो-मीटरच्या परिघातील शाळांमध्येच प्रवेश दिला जाणार होता. मुलांच्या प्रवासाचा त्रास कमी होईल, असा तर्क सरकारने दिला होता. मात्र, पालकांनी आणि सामाजिक संघटनांनी याला तीव्र विरोध दर्शवला. या नियमामुळे पालकांचे शाळा निवडण्याचे स्वातंत्र्य मर्यादित होत असून विशेषतः शहरी भागात चांगल्या शाळा निवडीवर गदा येत असल्याचे गारहाणे मांडण्यात आले होते. सामाजिक कार्यकर्ते आशिष फुलपजले आणि अनिकेत कुत्तरमारे यांच्यासह अधिवक्ता बोधी रामटेके आणि दीपक चॅटर्जी यांनी या नियमाविरुद्ध नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. हा नियम मनमानी, बेकायदेशीर आणि संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांच्या विरोधात असल्याची बाजू त्यांनी मांडली. सुनावणी दरम्यान न्यायालयाने नमूद केले की, केंद्र सरकारने बनवलेल्या कायद्यातील अधिकारांना राज्य सरकार अशा प्रकारे मर्यादित करू शकत नाही. एका हाताने अधिकार देणे आणि दुसऱ्या हाताने ते काढून घेणे असा हा प्रकार असल्याची टिप्पणीही न्यायालयाने केली. या निर्णयामुळे आता पालकांना १ किलो-मीटरच्या मयदित न अडकता आपल्या पाल्यांसाठी योग्य शाळेची निवड करता येणार आहे.

## जनगणनेचे काम गांभीर्यपूर्वक करावे-जिल्हाधिकारी

जनगणनेसाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षणाला प्रारंभ

**अमरावती/का.प्र.**

संपूर्ण देशात जनगणनेला सुरवात करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक मनुष्यबळाला प्रशिक्षण देण्यात येत आहे. देशाचे खरे चित्र या जनगणनेतून समोर येणार असल्याने यात सहभागी सर्वांनी जनगणनेचे काम गांभीर्यपूर्वक करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.


जनगणना २०२७च्या अनुषंगाने आजपासून नियोजन भवनात तीन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात येत आहे. या प्रशिक्षण वर्गाचे आज उद्घाटन करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त सौम्या शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, महापालिका उपायुक्त योगेश पिठे, सहआयुक्त विकास खंडारे, जिल्हा सूचना अधिकारी मनिषकुमार, तसेच मार्गदर्शक म्हणून जनगणना संचालनालाचो सहायक व्यवस्थापक प्रविण भगत, ऋषीकेश पाथरे उपस्थित होते.यावेळी पहिल्यांदाच ॲपवर ही जनगणना होणार आहे. त्यामुळे बदलांची नोंद घेऊन कार्य करावे लागणार आहे. ही जनगणना कायद्याच्या आधारे होत असल्याने काम करणे बंधनकारक असून नागरिकांना माहिती द्यावी लागणार आहे. यावेळी जातनिहाय जनगणना होणार असून यात काळजीपूर्वक नोंदी घ्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले.श्रीमती शर्मा यांनी यावर्षीची जनगणना ही १६ वर्षानंतर होत आहे. यातून निर्माण होणारा डाटा हा देशाच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. जनगणनेच्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रातील घरभेटीचे नियोजन करण्यात आले आहे, त्यामुळे जनगणनेच्या कामात अडचण निर्माण होणार नसल्याचे सांगितले.कार्यक्रमासाठी जणगणना कक्षाच्या राधिका देशमुख आणि भावना जिचकार यांनी सहकार्य केले. निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांनी सूत्रसंचालन केले. महापालिकेचे सहायक आयुक्त भूषण पुसदकर यांनी आभार मानले.



## डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय लोक अदालतीत सहभाग

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावती व जिल्हा न्यायालय अमरावती यांच्यातर्फे आयोजित राष्ट्रीय लोक अदालत पार पडली. या राष्ट्रीय लोक अदालत च्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रभारी प्रमुख न्यायाधीश आर. जी.वाघमारे , जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावतीचे सचिव डी. एस. वामणे , तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वर्षा एन. देशमुख, अमरावती जिल्हा बार असोसिएशन चे अध्यक्ष अँड.सुनील देशमुख, मुख्य सरकारी वकील अँड. परीक्षेत गणोरकर, अमरावतीचे पोलीस उपायुक्त गणेश शिंदे उपस्थित होते.



या राष्ट्रीय लोक अदालतमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लोक अदालत वर पथनाट्य सादर करून लोक अदालतचे महत्त्व पटवून दिले.या राष्ट्रीय लोक अदालत मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे एलएलबी तीन वर्षीय चौथे व सहावे सेमिस्टर तसेच एलएलबी पाच वर्षीय आठवे व दहावे सेमिस्टरचे मिळून ४९५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या राष्ट्रीय लोक अदालत मध्ये महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. नंदकिशोर के. रामटेके विभाग प्रमुख, एलएलबी तीन वर्षीय अभ्यासक्रम, प्रा. कीर्तीराज सावळे, प्रा.डॉ. कीर्ती मालपाणी, डॉ. प्रा. लक्ष्मी परिहार, प्रा. संदीप वानखेडे, प्रा. उज्वल मानकर, प्रा. वैशाली तिडके, प्रा. अन्युक्ती कीर्तिकर मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय लोक अदालत ला भेट डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

## संक्षिप्त

### राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेत विद्यापीठाला १३ पारितोषिके



**अमरावती**-सत्यभामा इन्स्टिटयुट ऑफ सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी, जेपीअर नगर एसएच चेन्नई, तामिळनाडू येथे १० ते १४ मार्च दरम्यान झालेल्या ३९ व्या अखिल भारतीय राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या चमूंनी रांगोळी, हिंदी वक्तृत्व स्पर्धा, मिमिक्री, वेस्टर्न व्होकल सोलो या कलाप्रकारात प्रथम पारितोषिक, भारतीय समूहगान, शास्त्रीय नृत्य, वेस्टर्न इन्स्टुमेंट्रल सोलो या कलाप्रकारात व्दितीय व माईम, कल्चरल प्रोसेशन या कलाप्रकारात तृतीय तसेच लोक नृत्य, फोक ऑर्केस्ट्रा, गृप साँग वेस्टर्न या कलाप्रकारात चवथे आणि क्ले मॉडेलिंग या कलाप्रकारात पाचवे, असे १३ पारितोषिके प्राप्त केले आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मध्य विभाग स्पर्धेत चॅम्पीयनशिप प्राप्त केल्यानंतर संत गाडगे बाबा विद्यापीठाच्या विद्यार्थी कलावंत, साथीदार यांनी राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेत अमरावती विद्यापीठाचा राष्ट्रीय स्तरावर नावलौकीक केला आहे. चमू व्यवस्थापक म्हणून डॉ. शितलबाबू तायडे व डॉ. जयश्री कुळकर्णी यांनी, साथीदार म्हणून डॉ. निखिलेश नलोडे, प्रशांत ठाकरे,अमोल अढाऊ,प्रकाश मेश्राम,अभिजित भावे,अवधुत पाटील यांनी महत्वाची भूमिका पार पाडली. या घवघवीत यशाबद्दल कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी संपूर्ण चमूचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### दाशरथी श्रीराम मंदिरात नारदिय कीर्तन

**दर्यापूर**-दाशरथी श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सवात नारदिय कीर्तन परंपरेला यंदा १५० वर्ष पूर्ण होत आहेत. अखंडपणे ही



किर्तन परंपरा जपणारा हा उत्सव १९ मार्च गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सुरु होणार असून महाराष्ट्रतील पुणे येथील प्रसिद्ध असलेले कीर्तनकार रामनाथ अय्यर यंदा ही सेवा देणार आहेत.१९ ते दि २७ मार्चपर्यंत आयोजीत करण्यात येत आहे. उत्सवामधे किर्तन, भजन आदी चे आयोजन असून कीर्तनची वेळ सायंकाळी ६.३० ते ८.३० पर्यंत आहे. हार्मोनियम वर बाळासाहेब विधळे तर तबल्यावर शैलेश ढोक अमरावती हे साथ देणार आहेत. दुपाच्या सत्रात २० मार्च रोजी जेष्ठ गायक घननीळ पाटील व संच यांचा भक्ती संगीताचा कार्यक्रम आयोजीत केला आहे. तसेच शहरातील गायकांचा भजनाचा कार्यक्रम आयोजीत केला आहे, यांसह महिलांचे भजन,, हरिपाठ , अभंग गायन आदी कार्यक्रम होणार आहेत.

### कौशल्य विकास केंद्राचा रोजगार मेळावा शुक्रवारी

**अमरावती**-जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'चे शुक्रवार,२० मार्च २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. व्हिजन एज्युकेशन अकादमी, जयस्तंभ चौक, रंगभवन, मातोश्री इंदिरा महाविद्यालय, धारणी येथे हा मेळावा होणार आहे.मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी mahaswayam.gov.in या वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी. यात ऑनलाईन सहभाग नोंदवून आपली रजिट्रेशनची प्रत काढून मेळाव्याच्या दिनांकास उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६/८९८३२८८९८२/८६०५६५४०२५ किंवा amravatirojgar@gmail.com या मेलवर संपर्क साधावा. मेळाव्यासाठी बायोडाटा, पासपोर्ट साईज फोटो आणि आवश्यक कागदपत्रांसह धारणी येथे सकाळी १० वाजता उपस्थित रहावे. या मेळाव्यात ३५५ रिक्त पदांची भरती करण्यात येणार असल्याचे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी कळविले आहे.

### अत्याचारातून अल्पवयीन मुलीला गर्भधारणा

**अचलपूर**- परतवाडा पो.ठाणा हद्दीत येणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून वारंवार लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणी १९ वर्षीय तरुणाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे पिडीता ६ महिन्याची गर्भवती झाल्याचे समोर आले आहे. पिडीतेच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी आरोपीविरुध्द अत्याचार व पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे.

**भारत जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असली, तरी इंधनाच्या बाबतीत तो अजूनही मोठ्या प्रमाणात परावलंबी आहे. देशाच्या कच्च्या तेलाच्या गरजांपैकी सुमारे ८५ टक्के तेल आयातीवर अवलंबून असल्यामुळे जागतिक राजकारणातील प्रत्येक बदलाचा थेट परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर आणि ऊर्जा सुरक्षेवर होतो.**



# इंधन परावलंबित्वाचे कठोर वास्तव

आखाती देशांतील वाढत्या संघर्षामुळे जागतिक तेलबाजार पुन्हा एकदा अस्थिर झाला असून, या पार्श्वभूमीवर भारताच्या इंधन व्यवस्थेतील एक कठोर वास्तव पुन्हा समोर आले आहे आणि ते म्हणजे भारत आजही इंधन पुरवठ्यासाठी मोठ्या प्रमाणात परावलंबी आहे. म्हणजेच तो इंधनासाठी बाहेरील देशांवर अवलंबून आहे. देशाच्या कच्च्या तेलाच्या गरजांपैकी सुमारे ८५ टक्के तेल आयातीवर अवलंबून आहे. त्यामुळे जगातील कोणत्याही भूराजकीय संघर्षाचा थेट परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होतो. ऊर्जा सुरक्षितता हा त्यामुळे निव्वळ इंधनपुरवठ्याचा विषय राहात नाही, तर तो आर्थिक स्थैर्य, परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षेचा मूलभूत प्रश्न बनतो.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी नुकताच दिलेला इशारा जागतिक ऊर्जा व्यवस्थेतील वाढत्या अस्थिरतेचेच संकेत देणारा आहे. पुढील ३० दिवसांत जगाचा ऊर्जापुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता असून, संकट अधिक तीव्र होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. रशिया हा जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा निर्यातदारांपैकी एक देश आहे आणि युरोप, आशिया तसेच जागतिक बाजाराला मोठ्या प्रमाणात तेल व नैसर्गिक वायू तो पुरवतो. त्यामुळे रशिया-पश्चिम संघर्ष, निर्बंध आणि बदलती ऊर्जा रणनीती यांचा परिणाम जागतिक पुरवठा साखळीवर होणे अत्यंत स्वाभाविक आहे. विशेषतः तेल आणि वायूच्या वाहतुकीतील अडथळे निर्माण झाले, तर जागतिक किमती झपाट्याने वाढू शकतात आणि ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशांसाठी ही स्थिती अधिकच आव्हानात्मक ठरू शकते.

जागतिक ऊर्जा व्यवस्थेचा नकाशा पाहिला, तर त्यात मध्यपूर्वेचे स्थान हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सौदी अरेबिया, इराक, कुवेत, संयुक्त अरब अमिराती आणि इराण हे देश मिळून जगाच्या एकूण कच्च्या तेलाच्या उत्पादनातील जवळपास एकतृतीयांश हिस्सा नियंत्रित करतात. याहूनही महत्त्वाची बाब म्हणजे, जगातील सुमारे २० ते ३० टक्के समुद्री तेल वाहतूक होर्मुझ सामुद्रधुनीतून होते. या सामुद्रधुनीतून दररोज सुमारे २० दशलक्ष बॅरल तेल जगभरात पोहोचते. त्यामुळे या प्रदेशात संघर्ष वाढला की, जागतिक ऊर्जा बाजारात तत्काळ प्रतिक्रिया उमटते. तेलाचे दर भडकतात, पुरवठ्याबाबत अनिश्चितता निर्माण होते आणि ऊर्जा आयात करणाऱ्या देशांच्या अर्थव्यवस्थांना त्याचे परिणाम भोगावे लागतात.

तेलाच्या किमतीतील वाढ ही केवळ ऊर्जा क्षेत्रापुरती मर्यादित राहत नाही. उद्योग, वाहतूक, शेती आणि उत्पादन या सर्व क्षेत्रांवर तिचा परिणाम होतो. अलीकडेच आखाती प्रदेशातील तणाव वाढताच कच्च्या तेलाचे दर वाढले आणि त्याचा परिणाम जगभरातील शेअर बाजारांवर दिसून आला. आशिया, युरोप आणि अमेरिकेतील प्रमुख निर्देशांकांमध्ये घसरण झाली. कारण, तेल महागले की, उद्योगांचा उत्पादन खर्च वाढतो, वाहतूक महाग होते आणि महागाई वाढण्याची शक्यता निर्माण होते. ऊर्जा ही आधुनिक अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी असल्यामुळे तिच्या किमतीतील चढउतार संपूर्ण आर्थिक व्यवस्थेला हादरे देऊ शकतात. या पार्श्वभूमीवर भारताचे ऊर्जा वास्तव अधिक स्पष्टपणे समोर येते.

भारत हा जगातील सर्वात मोठा तिसरा तेल आयातदार देश आहे. भारताचा दररोजचा कच्च्या तेलाचा वापर सुमारे ५ दशलक्ष बॅरल इतका आहे. तथापि, या गरजेपैकी जवळपास ८५ टक्के तेल हे भारताला आयात करावे लागते. याचा अर्थ असा की, भारताच्या ऊर्जा सुरक्षेचे धागेदोरे मोठ्या प्रमाणात इतर देशांच्या राजकारणाशी जोडलेले आहेत. तेलाचे दर वाढले की, भारताचे आयात बिल वाढते आणि त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. भारतातील ऊर्जा वापराचे चित्र पाहिले, तर वाहतूक क्षेत्रात पेट्रोल आणि डिझेलचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. देशातील मालवाहतुकीपैकी सुमारे ६५ टक्के वाहतूक रस्त्यांमार्गे होते आणि ती प्रामुख्याने डिझेलवर आधारित आहे. त्यामुळे तेलाच्या किमतीतील वाढ थेट वाहतूक खर्च वाढवते. त्याचा परिणाम अन्नधान्यापासून औद्योगिक उत्पादनापर्यंत सर्व क्षेत्रांवर होतो. महागाई वाढते आणि आर्थिक वाढीचा वेग कमी होण्याचा धोका निर्माण होतो.

भारत आणि ऊर्जा आयातीवरील खर्च

भारताचे एक महत्त्वाचे वास्तव म्हणजे ऊर्जा आयातीवर होणारा खच. 'भारत दरवर्षी शेकडो अब्ज डॉलर किमतीचे कच्चे तेल आयात करतो. तेलाच्या किमती वाढल्या की, भारताचे आयात बिल प्रचंड प्रमाणात वाढते आणि विदेशी चलन साठ्यावर म्हणजेच गंगाजळीवर दबाव निर्माण होतो. उदाहरणार्थ, २०२२ मध्ये तेलाच्या किमती वाढल्यामुळे भारताचे तेल आयात बिल १५० अब्ज डॉलरच्या आसपास पोहोचले होते. यामुळे व्यापार तूट वाढली आणि चलनविषयक स्थैर्यावर परिणाम झाला. दीर्घकाळ भारताचा तेलपुरवठा मुख्यतः मध्यपूर्वेवर अवलंबून राहिला होता. काही वर्षांपूर्वीपर्यंत भारताच्या तेल आयातीपैकी जवळपास ६० टक्के हिस्सा मध्यपूर्वेतील देशांकडून येत होता. इराक, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती हे भारताचे प्रमुख पुरवठादार होते; परंतु या प्रदेशातील अस्थिरतेमुळे भारतासाठी ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण आवश्यक बनले.

रशिया-युक्रेन युद्धानंतर भारताने सवलतीच्या दरात मिळणारे रशियन तेल मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यास सुरुवात केली. २०२१ पर्यंत भारताच्या तेल आयातीमध्ये रशियाचा हिस्सा केवळ २ टक्क्यांच्या आसपास होता; परंतु काही वर्षांत तो २५ ते ३० टक्क्यांपर्यंत वाढला. काही महिन्यांत तर रशिया हा भारताचा सर्वात मोठा तेलपुरवठादार बनला. रशियन कच्चे तेल आंतरराष्ट्रीय ब्रेंट दरापेक्षा प्रतिबॅरल १० ते १५ डॉलरने स्वस्त मिळत असल्यामुळे भारताला आर्थिक फायदा झाला. तथापि, रशियन तेलामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी भारताची ऊर्जा परावलंबित्वाची समस्या संपलेली नाही. कारण, तेलाच्या एकूण गरजांपैकी बहुतांश गरज ही आजही आयातीवर अवलंबून आहे. त्यामुळे दीर्घकालीन उपाय म्हणून ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे.

ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण म्हणजे फक्त विविध देशांकडून तेल खरेदी करणे असा नव्हे. त्यामध्ये ऊर्जा उत्पादनाचे विविध पर्याय विकसित करणे आवश्यक आहे. भारताने सौरऊर्जा, पवन ऊर्जा, जैवइंधन आणि हरित हायड्रोजन यांसारख्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वाढवली आहे. भारत आज जगातील सर्वात मोठ्या सौरऊर्जा कार्यक्रमांपैकी एक राबवत आहे. आंतरराष्ट्रीय सौर आघाडीच्या माध्यमातून भारताने सौरऊर्जेला जागतिक स्तरावर प्रोत्साहन दिले आहे. तसेच भारताने अक्षय ऊर्जा उत्पादनाचे मोठे लक्ष्य ठेवले आहे. २०३० पर्यंत ५०० गिगावॅट अक्षय ऊर्जा क्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या प्रयत्नांमुळे भविष्यात तेलावरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी होऊ शकते.

ऊर्जा परावलंबित्व कमी करण्यासाठी आणखी एक महत्त्वाचा उपाय म्हणजे देशांतर्गत ऊर्जा उत्पादन वाढवणे. भारतात अजूनही अनेक क्षेत्रांमध्ये तेल आणि नैसर्गिक वायूचे संभाव्य साठे आहेत. शोधमोहीम वाढवून या साठ्यांचा उपयोग करण्याची गरज आहे. तसेच सामरिक पेट्रोलियम साठे उभारणे हेही ऊर्जा सुरक्षेचे महत्त्वाचे साधन आहे. भारताने विशाखापट्टणम, मंगळुरू आणि पदूर येथे सामरिक तेल साठे उभारले आहेत. हे साठे संकटाच्या काळात काही दिवसांचा ऊर्जा पुरवठा सुरक्षित ठेवू शकतात. भविष्यात हे साठे आणखी वाढवण्याची आवश्यकता आहे.ऊर्जा व्यापाराचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे डॉलरचे वर्चस्व. जागतिक तेल व्यापार प्रामुख्याने डॉलरवर आधारित आहे. त्यामुळे तेल आयात करताना डॉलरच्या चढउताराचा परिणाम भारताच्या परकीय चलन साठ्यावर होतो. रशियावरील निर्बंधांनंतर रुपया-रुबल पद्धतीत व्यवहार करण्याबाबत चर्चा झाली. दीर्घकालीन दृष्टीने ऊर्जा व्यापारात चलनविविधीकरण महत्त्वाचे ठरू शकते.

आजच्या जगात ऊर्जा हा आर्थिक विषय राहिलेला नाही, तर तो राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न बनला आहे. ऊर्जापुरवठा खंडित झाला, तर उद्योग, वाहतूक आणि अर्थव्यवस्था ठप्प होऊ शकते. त्यामुळे इंधन सुरक्षितता ही देशाच्या दीर्घकालीन धोरणाचा महत्त्वाचा भाग बनली आहे. भारत आज वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून जगभरात नावाजली जात आहे; मात्र या वाढीचा पाया मजबूत ठेवायचा असेल, तर ऊर्जा सुरक्षिततेकडे अधिक गांभीर्याने पाहावे लागेल. ८५ टक्के आयातीवर अवलंबून असलेली ऊर्जा व्यवस्था दीर्घकालीन दृष्टीने धोकादायक ठरू शकते. त्यामुळे ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण, अक्षय ऊर्जा वाढवणे, देशांतर्गत उत्पादन वाढवणे आणि सामरिक साठे मजबूत करणे ही भारतासाठी अपरिहार्य पावले ठरतात. ऊर्जा सार्वभौमत्व ही फक्त घोषवाक्याची बाब नाही, तर ती दीर्घकालीन राष्ट्रीय रणनीती आहे. भारताने आज दूरदृष्टीने पावले उचलली, तर भविष्यातील ऊर्जा संकटांपासून देशाला सुरक्षित ठेवणे शक्य होईल, अन्यथा जागतिक इंधन बाजारातील प्रत्येक धक्क्याचे परिणाम भारताला अपरिहार्यपणे सातत्याने सहन करावेच लागतील, हे कठोर वास्तव आहे.

पर्यायी इंधनासाठीही परावलंबित्वच

भारताची ऊर्जा व्यवस्था केवळ तेलापुरती परावलंबी नाही. इतर ऊर्जा स्रोतांसाठीही आयातीवर मोठे अवलंबित्व आहे. सौरऊर्जा प्रकल्पांसाठी लागणाऱ्या सोलर पॅनेलपैकी मोठा हिस्सा चीनकडून आयात केला जातो. लिथियम-आयन बॅटरींसाठी लिथियम, कोबाल्ट आणि निकेलसारख्या खनिजांचा पुरवठा ऑस्ट्रेलिया, चिली, अर्जेंटिना आणि आफ्रिकेतील देशांवर अवलंबून आहे. अणुऊर्जेसाठी लागणारे युरेनियम कझाकस्तान, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियातून आयात केले जाते. पवनऊर्जेसाठी आवश्यक असलेले काही दुर्मीळ धातूही प्रामुख्याने चीनकडून येतात. भारताकडे कोळशाचे मोठे साठे असले, तरी उच्च दर्जाचा कोळसा ऑस्ट्रेलिया आणि इंडोनेशियातून आयात करावा लागतो. त्यामुळे ऊर्जा संक्रमणाच्या नव्या युगातही भारताचे बाह्य अवलंबित्व कायम आहे.भारताच्या ऊर्जा संरचनेत विविध स्रोतांसाठी आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबित्व आहे.

कच्चे तेल : भारताच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात केले जाते. देशांतर्गत उत्पादन फक्त १५ टक्क्यांच्या आसपास आहे.

नैसर्गिक वायू : एकूण वापरातील जवळपास ४५ ते ५० टक्के वायू आयात केला जातो (मुख्यतः एलएनजी स्वरूपात).

कोळसा : भारताकडे मोठे कोळसा साठे असले, तरी उच्च दर्जाच्या औद्योगिक कोळशासाठी २० ते २५

# अमरावतीमध्ये विज्ञान उद्यान व्हावे

रानटी अवस्थेतून आधुनिक सभ्यतेपर्यंत मानवाची जी हजारो वर्षांची वाटचाल झाली, त्या वाटचालीत धर्माची भूमिका मोठी राहिली आहे. मानवांनी एकमेकांशी संघर्ष न करता शांततेने सहजीवन व्यतीत करावे, या उद्देशाने प्रत्येक धर्माने सदाचाराच्या काही मुल्यांची पेरणी करून ठेवली व त्या मूल्यांच्या प्रकाशात आम्ही सभ्य होत गेलो. सर्व सामान्य मानवांच्या दैनंदिन जीवनातील कष्ट व हालअपेष्टा जरी कोणत्याही धर्माला कमी करता आल्या नाहीत, तरी सामान्य मानवात सोशिकपणा निर्माण करण्यात देखील धर्माने मोठी भूमिका निभावली.

परंतु मागील दोन-तीनशे वर्षांपासून युरोप मध्ये जे विज्ञान संशोधन झाले त्यामुळे जगभरच्या मानवांचे कष्ट व हालअपेष्टा फार मोठ्या प्रमाणात नाहीसे होण्यास मोलाची मदत झाली आहे. विशेषतः स्वयंपाक घरातच अडकलेल्या स्त्रियांना बाहेर पडण्यासाठी वीज, गॅस, मिक्सर, ग्राइंडर, फ्रीज, मोबाईल इ. वैज्ञानिक उपकरणांचा फार मोठा आधार मिळाला व त्या बाहेरच्या जगात आपले कर्तृत्व सिद्ध करू शकत आहेत.


धर्मांने जसे फार मोठ्या मानव समुदायांना एकत्र जोडले तसेच वेगवेगळ्या धर्मांना मानणाऱ्या मानव समुदायांमध्ये प्रचंड प्रमाणात हिंसक युद्ध देखील झालेत. विज्ञानाने मात्र हिंसेची व्याप्ती कमी करण्यात सहाय्य केले आहे. वैज्ञानिक संशोधनासाठी आवश्यक असलेली चिकित्सक वृत्ती भारतात कमी प्रमाणात आढळूनयेते. जर आपल्याला 'आत्मनिर्भर' व्हायचे असेल तर अश्या चिकित्सक वैज्ञानिक वृत्तीचा परिपोष समाजात होणे आवश्यक आहे. त्यासाठी आमच्या दैनंदिन जीवनातील शारीरिक कष्ट गेल्या शंभर एक वर्षात ज्या वैज्ञानिकांच्या संशोधनामुळे कमी झाले आहेत, त्यांचा परिचय सर्वसामान्य लोकांना करून देण्याच्या कामी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका), विद्यापीठांनी व शिक्षण संस्थांनी पुढाकार घेणे अत्यावश्यक आहे. म्हणून अमरावती महानगर पालिका, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, श्री शिवाजी शिक्षण संस्था, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ इत्यादी संस्थांनी एकत्र येऊन अमरावती शहरात एक विज्ञान-उद्यान (Science Park) निर्माण करावे.

**किशोर देशपांडे**

# महायुद्धाकडे जग

पहिले महायुद्ध आणि दुसरे महायुद्ध पाहणारी पिढी कदाचित ह्यात नसेल पण तिसऱ्या महायुध्द पाहण्याकरिता आजची पिढी आहे. दुसऱ्या महायुद्धाचे काय परिणाम झाला हे आम्ही इतिहासातून अवलोकन केले आहे.१ सप्टेंबर १९३९ ते २ सप्टेंबर १९४५ म्हणजे ६ वर्ष १ दिवस चालले. अमेरिका,रशिया,ब्रिटन,फ्रान्स ही दोस्त राष्ट्रे तर जपान,जर्मनी,इटली हि शत्रू राष्ट्रे आपसात लढली.त्याचे उदाहरण द्यायचे झाल्यास हिरोशिमा आणि नागासाकी. अमेरिकेने या दोन शहरावर अणुबॉमचा वर्षाव केला आणि क्षणात होत्याचे नव्हते झाले.प्राणहानी आणि वित्त हानी फार मोठ्या प्रमाणात झाली.आज परिस्थिती निर्माण झाली आहे. युक्रेन आणि रशिया कित्येक दिवसांपासून लढत आहे. युक्रेनच्या बाजूने अमेरिका सहकार्य करीत आहे.अमेरिकेचा इतिहास आहे की जगावर आपले वर्चस्व स्थापित करणे. ते दुसऱ्या महायुद्धात दाखवून दिले आहे.

दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम-जवळ जवळ आठ कोटी लोकांना प्राणास मुकावे लागले,युरोप,फ्रान्स शतीग्रस्त झाले आणि जगातील युरोपचे वर्चस्व लयास गेले.,परमाणू युगाची सुरुवात झाली. नाझीवादाचा अंत झाला. शीत युद्धास सुरुवात झाली.अमेरिकेचा भांडवलवाद व सोविएत संघाचा साम्यवाद उभाळून येऊन अमेरिका आणि रशिया दोन महाशक्ती उदयास आल्या. संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली.



सिनिअर जॉर्ज बुश ने १९८९ मध्ये इराक कुवेत युद्धात कुवेतची बाजू घेतली होती पण सद्दाम हुसेनने जुमानले नाही आणि त्याचा बदला ज्युनिअर बुशने घेतला आणि सद्दामला फाशीवर लटकवले. इराक बेचिराख झाला. केवळ रासायनिक,जैविक,परमाणु शस्त्रे आहे .त्याचा धोका अन्य देशांना होऊ शकतो आणि त्यामुळे आतंकवाद वाढू शकतो म्हणून. प्रत्यक्षात ते सापडले नाही तर मग सद्दामने १९८२ मध्ये १४० पेक्षा अधिक लोकांना मारले म्हणून. त्याचा परिणाम सद्दामला अमेरिकन सैन्याने पकडून इराकच्या न्यायालयाने फाशी ठोठावून २०००६ फाशीवर लटकवले.केवढी दादागिरी दुसऱ्या देशात जाऊन दादागिरी करणे. कशा करिता? तेलाचे भंडार मिळावे म्हणून!

इराण जुमानत नाही मग इस्त्रायलला हाताशी घेऊन इराणशी पंगा घेणे. इराण बेचिराख करणे. आता चीन आणि रशिया इराणच्या बाजूने आहे. हे युद्ध जर अधिक चालले तर जागतिक मंदी, महामारी आल्याशिवाय राहणार नाही. आणि तिसरे महायुद्ध झाल्या शिवाय राहणार नाही.अनेक देश आपापसात लढतील. यावर कोणाचेही नियंत्रण राहणार नाही आणि त्याचे दुष्परिणाम सर्वसामान्य जनता भोगल्या शिवाय राहणार नाही.अफगाणिस्थान, युक्रेन, इराक, लिबिया इ.राष्ट्रे अमेरिके मुळे युध्दाच्या खाईत लोटला गेली आणि लयास गेली.

युद्धाचे दुष्परिणाम-प्राण हानी मोठ्या प्रमाणात होईल, निरपराध लोकांचे बळी जातील. इराक, इस्त्रायल या देशातील निरपराध नागरिक बळी गेले आहे.वित्त हानी मोठ्या प्रमाणात होईल.युध्दजन्य देशातील तेल साठे उध्वस्त होईल.त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होईल.उद्योगधंदे मोडकळीस येईल.बेरोजगारी वाढेल.यातून सावरणे अशक्य होईल.मानवी प्रगती शेकडो वर्ष मागे जाईल.देश एकमेकांना सहकार्य करणार नाही. पृथ्वीवरील जीवसृष्टी नष्ट होऊ शकते.

**प्राचार्य डॉ. संजय साळीवकर**
अमरावती
मो.९४२३४२४८५१

# गोधनाचे महत्व

देशीगाईच्या दुधात प्रथिने,कॅल्शीयम, सुवर्ण लोह हे घटक विपूल प्रमाणात असतात. लहान मुलांना देशी गायीचे दूध दिल्याने त्यांची प्रतिकार क्षमता आणि बुद्धिमत्ता आणि बल वाढते. याउलट जर्सी विदेशी गाईंच्या दूधामुळे मानवी शरीर सहजतेने रोगजंतूंना बळी पडू शकते.ताज्या गोमूत्राच्या सेवनाने पोटाचे विकार बरे होतात. पंचगव्य म्हणजे गोमूत्र,गाईचे शेण,दही,दूध आणि तूप यांच्या मिश्रणाने देहाची अंतर्गत शरीर शुद्धी होते म्हणून धार्मिक विधींच्यावेळी पंचगव्य घेण्याची पद्धत आहे. देशीगाईंच्या पाठीवर वशींड(मासल उंचवटा)असतो. त्यापासून निघून शेपटीपर्यंत जाणारा एक रज्जु असतो त्याला सूर्यकेतु नाडी असे म्हणतात. या नाडीमुळे अवकाशातील 'कॉस्मिक 'किरण गाईकडून शोषले जातात.याचा लाभ आपण गाईच्या पाठीवरून हात फिरवला किंवा गाईची शेपटी अंगावरुन फिरवली की आपल्याला होतो. डोळ्यावरुन गाईची शेपटी फिरवल्याने दृष्टी चांगली होते. गोमूत्रापासून तयार केलेल्या गोळ्यांमुळे अनेक दुर्धर रोगांवर नियंत्रण मिळवता येते असे प्रयोगांती सिद्ध झाले आहे.



गाईच्या शेणाने सारवलेल्या घरामुळे आपले घातक अशा अणुकिरणोत्सारामुळे निर्माण होणाऱ्या दूषित वातावरणापासून रक्षण होते. देशीगाईच्या शेणाच्या गोवरीच्या धुरामुळे वातावरणाची शुद्धी होते.म्हणूनच अग्नीहोत्रासाठी तिचा वापर केला जातो. म्हणूनच गाईला पवित्र मानले जाते. गाईची सेवा केल्याने मानसिक आणि शारीरिक संतुलन राखले जाते. आपल्यातील नकारात्मक उर्जा नाहीशी होते. म्हणून मंगल प्रसंगी किंवा धार्मिक अनुष्ठानापूर्वी गाईला घास देणे तिची पूजा करणे अशी प्रथा आहे.दुर्दैवाने स्वातंत्र्योत्तर भारतातही गोहत्या रोखण्यासाठी काही ठोस प्रयत्न झाले नाहीत.'इंदिरा ईज ईंडीया अँड ईंडीया इज इंदिरा' असा जयघोष करणा-या इंदीरा गांधींनी आपल्या राजवटीत 'गोहत्याबंदी'साठी उपोषण करणा-या साधूसंतांवर (ज्यामधे करपात्रीकर महाराजांसारखे थोर संत होते)गोरक्षणासाठी आग्रही असणाऱ्या गोरक्षकांवर अमानुष गोळीबार केला. गोसंवर्धनाकडे लक्ष देण्याऐवजी शेतक-यांची दिशाभूल करून त्यांच्या माथी जर्सी गाई मारल्या गेल्या. ज्यामुळे जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे.हे सर्व बदलण्यासाठी एका मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.२७एप्रिल २०२६हा दिवस 'गो सम्मान अभियान' दिवस म्हणून पाळण्यात येणार आहे. तत्पूर्वी या अभियानांतर्गत ठिकठिकाणी शासनाला निवेदने देण्यात येणार आहेत. देशीगोधनाचे रक्षण होण्यासाठी कटिबद्ध होऊया.

**संध्या काटदरे**

# वसंत ऋतू: सृष्टीचा बहर आणि नवचैतन्याचा उत्सव

भारतीय ऋतूचक्रात वसंत ऋतूला 'ऋतूंचा राजा' असे गौरवपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. हिवाळ्याच्या गारठ्यानंतर निसर्गाला नवजीवन देणारा हा ऋतू आनंद, सौंदर्य आणि नवचैतन्याचे प्रतीक मानला जातो. म्हणूनच भारतीय साहित्य, संगीत आणि संस्कृतीमध्ये वसंत ऋतूचे महत्त्व विशेष मानले गेले आहे.यंदा १८ फेब्रुवारी ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत वसंत ऋतूचा मधुर बहर अनुभवायला मिळत आहे.

संस्कृत साहित्यातील महान कवी कालिदास यांनी ऋतुसंहार आणि कुमारसंभव या काव्यांमध्ये वसंत ऋतूचे अत्यंत रमणीय वर्णन केले आहे. फुलांनी बहरलेले वृक्ष, मंद सुगंधी वारा, आणि कोकिळेचे मधुर गाणे या सर्वांचे काव्यमय चित्रण त्यांच्या काव्यात दिसते. हिंदी साहित्यात जयशंकर प्रसाद, सूरदास आणि तुलसीदास यांनीही वसंत ऋतूच्या सौंदर्याचे आणि त्याच्या आनंददायी प्रभावाचे स्तवन केले आहे. मराठी साहित्यसृष्टीतही वसंत ऋतूचे आकर्षण अनेक कवींनी आपल्या कवितांमधून व्यक्त केले आहे. कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर आणि मंगेश पाडगावकर यांच्या कवितांमध्ये निसर्गातील बहर, फुलांचा सुगंध आणि जीवनातील नवचैतन्य यांचे अत्यंत सुंदर चित्रण दिसते. त्यांच्या काव्यातील निसर्गचित्रे वाचताना वसंत ऋतूचा सजीव अनुभव येतो.

वसंत ऋतूचे आगमन म्हणजे निसर्गाच्या नव्या जीवनाचा आरंभ. झाडांवर नवीन पालवी फुटते, विविध रंगांची फुले उमलतात आणि आंब्याच्या झाडांना मोहोर येतो. कोकिळेचा मधुर किलबिलाट वातावरण अधिकच प्रसन्न बनवतो. जाई, जुई, गुलाब आणि झेंडू यांच्या सुगंधाने आसमंत भारून जातो. निसर्गातील ही रंगत आणि सजावट मनाला अपार आनंद देते.हा ऋतू ना फार थंड असतो ना फार गरम. त्यामुळे वातावरण अत्यंत आल्हाददायक आणि प्रसन्न असते. सकाळचे कोवळे



ऊन आणि संध्याकाळचा मंद वारा मनाला शांतता आणि ताजेपणा देतो. म्हणूनच वसंत ऋतू हा निसर्गभ्रमंतीसाठी, सहलींसाठी आणि बाहेर वेळ घालवण्यासाठी अत्यंत योग्य मानला जातो.

भारतीय संस्कृतीत वसंत पंचमी या सणालाही विशेष महत्त्व आहे. या दिवशी विद्या आणि कलेची अधिष्ठात्री देवी सरस्वतीचे पूजन केले जाते. अनेक ठिकाणी संगीत, साहित्य आणि कला यांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. शास्त्रीय संगीतातील बसंत आणि बसंत बहार हे रागही या ऋतूच्या आनंदाचे सुरेल रूप मानले जाते.वसंत ऋतूचा प्रभाव केवळ निसर्गावरच नाही तर मानवी मनावरही खोलवर पडतो. हा ऋतू माणसाच्या मनात नवीन उमेद, नवीन स्वप्ने आणि सकारात्मक विचार निर्माण करतो. जशी हिवाळ्याच्या थंडीनंतर निसर्गात नवचैतन्य निर्माण होते, तशीच जीवनातील अडचणींनंतर आनंदाचे दिवस येतात, हा आशावादी संदेश वसंत ऋतू आपल्याला देतो.

खरे पाहता, वसंत ऋतू हा केवळ ऋतू नसून तो जीवनातील नवसृजनाचा संदेश आहे. जशी झाडांना नवीन पालवी फुटते, तसेच आपल्या जीवनातही नव्या संधी आणि नव्या शक्यता निर्माण होत असतात. म्हणूनच वसंत ऋतू आपल्याला आशावादी राहण्याची आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची प्रेरणा देतो.निसर्गाच्या या सुंदर ऋतूचे आपण सर्वांनी स्वागत करावे, त्याच्या सौंदर्याचा आनंद घ्यावा आणि निसर्गाशी सुसंवाद राखत जीवन अधिक आनंदी व समृद्ध बनवावे, हाच वसंत ऋतूचा खरा संदेश आहे.

**प्रा. विजय कोष्टी**

# वाघाच्या हल्ल्यात गुलजार जागीच ठार

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या अतिसंरक्षित गाभा क्षेत्रात अवैधरित्या गोवंश हाकत नेत असताना वाघाच्या हल्ल्यात एका ६० वर्षीय मजुराचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. गुलजार फत्तू महल्ले (रा. दिवाणझरी, ता. तेल्हारा) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बारूखेडा ते सोमठाणा दरम्यान दोन मजूर अवैधरित्या गोवंश हाकत नेत होते. यावेळी अचानक वाघाने गुलजार महल्ले यांच्यावर झडप घालून त्यांना ठार केले. हा प्रकार पाहून घाबरलेल्या त्याच्या सोबत्याने स्वतःचा जीव वाचवण्यासाठी जंगलालाच आग लावल्याची कबुली वनविभागास दिली आहे.

## सोबत्याने जीव वाचवण्यासाठी जंगलाला लावली आग



दरम्यान, दि. १६ मार्च रोजी वनखंड क्र. ११०४ व ११०५ मध्ये लागलेली आग विझवण्यासाठी गेलेल्या वनकर्मचाऱ्यांना परत येताना जळालेल्या अवस्थेत एक मृतदेह आढळून आला. तसेच घटनास्थळी सहा बैल जप्त करण्यात आले. यानंतर चौकशीत संपूर्ण प्रकार उघड झाला. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच हिवरखेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पुढील तपास सुरू असून संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**नागरिकांना आवाहन**

*मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वन्यजीवांची संख्या वाढत असून नागरिकांनी संरक्षित क्षेत्रात अनधिकृत प्रवेश, वनचराई व गोवंश वाहतूक टाळावी, असे आवाहन वनविभागाने केले आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास सात वर्षांपर्यंत शिक्षा व दंडाची तरतूद असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.*

या प्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ तसेच वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वनसंरक्षक आदर्श रेड्डी, उपवनसंरक्षक राहुल टोलिया व सहाय्यक वनसंरक्षक जी. पी. टेकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

## ट्रॅक्टर, पॉवर टिलरची नोंदणी करून घेण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

ट्रॅक्टर इंजिनबाबत लागू असलेले प्रदूषण मानक (ट्रॅक्टर इमिशन नॉर्म) स्टेज थ्री असलेल्या कृषी वापराचे ट्रॅक्टर, पॉवर टिलर व कंबाईन हार्वेस्टरची नवीन नोंदणी करण्याची दि. ३१ मार्चला संपुष्टात येत आहे. त्यामुळे संबंधितांनी नवीन नोंदणी मुदतीत करून घेण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार यांनी केले आहे.

ट्रॅक्टर, पॉवर टिलर, कंबाईन हार्वेस्टर या शेतकी वाहनांची नवीन नोंदणी दि. ३१ मार्चनंतर राज्यातील कोणत्याही प्रादेशिक परिवहन कार्यालयात करता येणार नाही.

## अकोल्यात मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघड; वाहन जप्त



■ प्रतिनिधी | अकोला ■

खदान पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या मोटारसायकल चोरीच्या प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले असून आरोपीला अटक करून चोरीस गेलेली सुमारे ४० हजार रुपये किंमतीची मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी विजय शालीकराम जानोकार (वय ६१, रा. देशमुख फैल, अकोला) यांनी १६ मार्च रोजी खदान पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. १५ मार्च रोजी दुपारी त्यांच्या कुटुंबातील सदस्य नगर परिषद कॉलनी येथे नातेवाईकांकडे गेले असताना त्यांनी त्यांची एमएच ३० एएम ९१०४ क्रमांकाची ॲक्टिवा घरासमोर उभी केली होती. भेटून परत आल्यानंतर वाहन जागेवर आढळून न आल्याने अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी संशयिताचा शोध घेतला. तुकाराम चौक परिसरात सापडलेल्या आदित्य अनिल हनवते (वय २०, रा. नित्यानंद नगर, अकोला) यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपीकडून चोरीस गेलेली मोटारसायकल जप्त केली असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांच्या नेतृत्वात सपोउपनि संजय वानखडे तसेच डीबी पथकातील कर्मचाऱ्यांनी केली.

# धाडसी कामगिरीला दाद : चान्नी ठाण्यातील अनिल सोळंके यांची जमादारपदी पदोन्नती



■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष व धाडसी पोलिस अंमलदार अनिल सोळंके यांना त्यांच्या उल्लेखनीय सेवेमुळे नुकतीच जमादारपदी पदोन्नती देण्यात आली आहे. सन २०२३ पासून चान्नी पोलीस ठाण्यात कार्यरत असताना त्यांनी विविध गंभीर गुन्ह्यांच्या तपासात मोलाची कामगिरी बजावली आहे.

दिग्रस बु. येथे घडलेल्या खून प्रकरणात आरोपीने १९ वार करून खून केल्यानंतर पळून जाण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी आरोपीच्या हातात हत्यार असतानाही अनिल सोळंके यांनी प्रसंगावधान राखत त्याच्या छातीवर झडप घालत त्याला जेरबंद केले. त्यांच्या या धाडसी कृतीची सर्वत्र प्रशंसा झाली होती.

### हत्या, अपहरण प्रकरणांच्या तपासात उल्लेखनीय कामगिरी

तसेच आणखी एका खून प्रकरणातील आरोपीला शिताफीने पकडण्यातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विविध अपहरण प्रकरणांमध्ये त्यांनी वेगवेगळ्या राज्यांत जाऊन तपास करत आरोपी व पीडितांचा शोध घेत चार गुन्ह्यांतील आरोपींना अटक केली. हनी ट्रॅपसारख्या गुन्ह्यांच्या तपासातही त्यांनी कौशल्यपूर्ण कामगिरी करत आरोपींना जेरबंद केले.

त्यांच्या धाडस, तत्परता आणि तपास कौशल्याची दखल घेत त्यांना ही पदोन्नती देण्यात आली असून पोलीस दलातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## स्वाधार योजनेच्या अर्जातील त्रुटींची पूर्तता करून घ्यावी

■ प्रतिनिधी | अकोला ■

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेत होस्टेल मॅनेजमेंट संकेतस्थळावर अर्ज सादर केलेल्या अर्जांची पडताळणी सुरु आहे. तथापि, अर्जात त्रुटी आढळून येत असून, विद्यार्थ्यांनी २५ मार्चपूर्वी पूर्तता करून घ्यावी, असे आवाहन समाजकल्याण कार्यालयाने केले आहे.

आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे, गुणपत्रिका न जोडणे किंवा अनुत्तीर्ण असणे, जुनी कागदत्रे जोडणे अशा त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी लॉगिनवर अर्जाची स्थिती पाहुन जर अर्ज सेंड बॅक त्रुटीत असेल तर तत्काळ दुरुस्ती करुन अर्ज सादर करावा. कार्यालयाशी दि. २५ मार्च रोजी १२ ते ५ या वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## त्रिमुती प्रतिष्ठानतर्फे भीम जयंती उत्सव समिती जाहीर

### अध्यक्षपदी स्वप्नील सरकटे



■ प्रतिनिधी | अकोट ■

ग्राम मुंडगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भीम जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर दि. ११ मार्च रोजी झालेल्या बैठकीत त्रिमुती प्रतिष्ठानतर्फे उत्सव समितीची कार्यकारिणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली.

या कार्यकारिणीत अध्यक्षपदी स्वप्नील सरकटे यांची निवड करण्यात आली असून कार्याध्यक्षपदी भास्कर पोहरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सचिवपदी विलास सरकटे, सहसचिवपदी शुभम सरकटे, तर कोषाध्यक्षपदी सुधीर पळसपगार यांची निवड करण्यात आली. तसेच सदस्य म्हणून संदीप सरकटे, सतीश भरक्षे, राजकुमार सरकटे आणि बोधानंद आरख यांची निवड करण्यात आली आहे.

बैठकीला त्रिमूर्ती प्रतिष्ठानचे मार्गदर्शक तुळशीराम वानखडे, अध्यक्ष शेषराव सरकटे, उपाध्यक्ष मनीष सरकटे, सचिव सचिन सरकटे यांच्यासह रंजीत सरकटे, बबन सरकटे, केशव सरकटे, रामदास सरकटे, हिरा सरकटे, अंकुश सरकटे, संदीप सरकटे, अविनाश सरकटे आणि गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

## जिल्ह्यात एलपीजी गॅसची आवक नियमित

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात एलपीजी गॅसची नियमित आवक होत आहे. एलपीजी सिलेंडरची जिल्ह्यात रोज आवक असल्याने पुरवठा सुरळीत होत आहे. आजही आवक झाल्याने साठा वाढला आहे.

मंगळवारीही आवक झाल्याने उपलब्ध साठ्यात सुधारणा झाली आहे. आजमितीला १५ हजार ५०३ सिलेंडर साठा उपलब्धता आहे. त्याचप्रमाणे, आवक नियमित सुरू आहे.

पुरवठा सुरळीत राहण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न होत आहेत. गैरप्रकार रोखण्यासाठी नऊ पथके गठित करण्यात आली असून, आवश्यक कार्यवाहीला गती देण्यात आली आहे, अशी माहिती पुरवठा कार्यालयातर्फे देण्यात आली.

## अकोटमध्ये 'जागतिक ग्राहक हक्क दिना'निमित्त जनजागृती रॅली



■ प्रतिनिधी | अकोट ■

'जागतिक ग्राहक हक्क दिना'निमित्त आस्की किड्स पब्लिक स्कूल, आस्की ज्युनिअर कॉलेज फॉर एक्सेलन्स व ग्राहक मंच, अकोट यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. ग्राहक हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याची सजगता देशाच्या बळकटीसाठी महत्त्वाची असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

रॅलीची सुरुवात जुने तहसील कार्यालय येथून करण्यात आली. या कार्यक्रमाला जिल्हा दिवाणी न्यायालयाचे वरिष्ठ न्यायाधीश महेश काळे यांच्या अध्यक्षतेत तर न्यायाधीश ए. ए. माळी, संस्थेचे सचिव नितीन झाडे, ग्राहक मंचाचे मिलिंद असरकर, दीपक देव, संजय लोखंडे, ॲड. संजय पाठक, संदीप पाटील, वामन जकाते, मुख्याध्यापिका नेहा झाडे, विजय जितकर, संगीता बाळापुरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. रॅलीत इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. 'जागो ग्राहक जागो', 'सजग ग्राहक – सुरक्षित समाज', 'मानवी हक्क – ग्राहक हक्क' अशा घोषणांनी शहर दणाणून गेले. यावेळी विद्यार्थ्यांनी ग्राहक जनजागृतीवर आधारित पथनाट्य, नृत्य आणि 'ग्राहक राजा' मनोगत सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले.

ग्राहकांनी उत्पादनाची गुणवत्ता, किंमत, बिल, वॉरंटी-गॅरंटी, परतावा, तसेच फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक कायद्यांची माहिती ठेवणे गरजेचे असल्याचे यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सुरक्षितता, माहिती, निवड, तक्रार नोंदविणे व नुकसानभरपाई मिळविणे हे ग्राहकांचे मूलभूत हक्क असल्याची जाणीव करून देण्यात आली.

या उपक्रमाची संकल्पना सचिव नितीन झाडे यांनी मांडली असून प्राचार्या नेहा झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक पवन चितोडे व शिक्षकवृंदांनी परिश्रम घेतले. तर ग्राहकांनी व्यवहार करताना पावती, कर, एक्सपायरी व वस्तूंची शहानिशा करावी. कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण करून कायद्यांचे पालन करावे, असे आवाहन महेश काळे यांनी केले.

# सावरगावात संरक्षण भिंतीत कॉलम खड्ड्यांचा बनाव ?

- सीईओंना पत्र, चौकशीची मागणी
- अभियंता-ठेकेदार संगनमताचा आरोप
- निकृष्ट कामामुळे भिंत कोसळण्याची भीती

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील सावरगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप समोर आला आहे. कॉलमच्या खड्ड्यांचे नियमानुसार खोदकाम न करता थेट गज उभे करून कामाचा बनाव करण्यात आल्याची तक्रार महादेव पायघन यांनी केली आहे. याबाबत त्यांनी २५ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

दरम्यान, या प्रकरणाचे वृत्त प्रसिद्ध होताच प्रशासन हलले असून जिल्हाधिकारी कार्यालयातून ४ मार्च रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना चौकशीचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, दोन आठवड्यांहून अधिक कालावधी उलटूनही अद्याप ठोस कारवाई किंवा चौकशी न झाल्याने संशय अधिक गडद होत आहे.

तक्रारीनुसार, संरक्षण भिंतीच्या कामात आवश्यक खोलीऐवजी केवळ २ ते ३ फूट खोदकाम करून निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात आहे. अभियंता व ठेकेदार यांनी कामावर देखरेख न ठेवता सर्व जबाबदारी सुपरवायझरवर सोपविल्याचा धक्कादायक प्रकारही उघड झाला आहे. त्यामुळे ही भिंत कधीही कोसळण्याची भीती व्यक्त केली जात असून शासनाच्या लाखो रुपयांचा अपव्यय होण्याची शक्यता आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मात्र, संबंधितांना वरिष्ठांकडून अभय मिळत असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

**काम अंतिम टप्प्यात; चौकशी मात्र थंडबस्त्यात!**

सावरगावातील संरक्षण भिंतीचे काम अंतिम टप्प्यात आले असताना कॉलम खड्ड्यांचा बनाव करून देयक लाटण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप आहे. असे असताना अद्याप चौकशी का होत नाही? असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

## रंभापूर येथे गुढीपाडव्याला झोटींग बाबा यात्रा महोत्सव

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील रंभापूर येथे लहान बालकांचे कुलदैवत असलेल्या बालयोगी संत झोटींग बाबा यांचा भव्य यात्रा महोत्सव गुढीपाडवा निमित्त गुरुवार, दि. १९ मार्च रोजी उत्साहात पार पडणार आहे.

यात्रेनिमित्त पहाटे ५ वाजता अध्यक्षांच्या हस्ते महापूजेचे आयोजन करण्यात आले असून, सकाळी ९ वाजता गावातून पालखी काढण्यात येणार आहे. ही पालखी मंदिरात नेऊन विसर्जित करण्यात येईल. त्यानंतर सकाळी ११ वाजता महाप्रसादाचा नैवेद्य दाखवून महाप्रसाद वितरणास सुरुवात होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही संपूर्ण गावकऱ्यांच्या सहभागातून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेला मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेता वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था गावाजवळील शेतामध्ये करण्यात आली आहे. तसेच भंडाऱ्याच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची सोय करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीने दिली. यात्रा शांततेत व सुव्यवस्थेत पार पाडण्यासाठी अकोट ग्रामीण पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात राहणार असून, मंदिर समिती व महाप्रसाद समितीला भाविकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रंभापूर येथील झोटींग बाबा यात्रा दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. लहान बालकांचे कुलदैवत म्हणून ओळख असल्याने पुणे, मुंबई, नागपूर तसेच मध्यप्रदेशातूनही भाविक मोठ्या संख्येने येथे दाखल होतात.



### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी मनिष सुधाकर भालेराव, व मयत प्रविण सुधाकर भालेराव तर्फे वारस आरती प्रविण भालेराव, डिप्पल प्रविण भालेराव, कृष्णाली प्रविण भालेराव, व युवराज प्रविण भालेराव या तिघांतर्फे अ.पा. कर्ता आई आरती भालेराव सर्व रा. अकोला ता. जि. अकोला यांच्याशी त्यांच्या ताब्यातील व मालकीची नमुना ड मध्ये त्यांचे नावाची नोंद असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :-** कसबे अकोला प्र.ता.जि.र.डी. र. स.डी.म.न.पा. अकोला येथील माळीपुरा भागातील अकोला शहर नझुल शिट क्र.२६ सी नझुल प्लॉट क्र. २४४ व नझुल प्लॉट क्र. २४६ असे दोन प्लॉट असुन प्लॉट क्र. २४४ चे क्षेत्रफळ ४२.६ चौ. मिटर असुन प्लॉट क्र. २४६ चे क्षेत्रफळ ३१.६ चौ. मिटर असुन असे दोन्ही प्लॉट मिळुन एकुण क्षेत्रफळ ७४.०२ चौ. मिटर असुन त्यास एकत्र चर्तु:सिमा पुर्वेस - पाईप टेडर्स यांचे दुकान पश्चिमेस -सर्व्हिस लाईन व मुनाफ बेहलीम यांची दुकान उत्तरेस - सरकारी रोड दक्षिणेस - साबळे यांचे घर.

त्याअर्थी वरील वर्णीत मालमत्तेबाबत कोणाचाही गहाण, बोजा, तारण, सावकारी व्यवहार, वारस हक्क व इतर अधिकार जे कायदेशीररित्या अडथळा करतील असे व्यवहार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळविण्याचे करावे. अन्यथा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत / तक्रार नाही असे समजून आमचे पक्षकार खरेदीखत करून घेतील व त्यानंतर वरील सर्व प्रकारचे व्यवहार आमच्यावर बंधनकारक राहणार नाही तसेच त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कसलाही उजर, अधिकार, हक्क इत्यादी चालणार नाही याची नोंद घ्यावी. करीता जाहीर नोटीस.

दिनांक :- १७.०१.२०२६
अकोला.

ADVOCATE & NOTARY
Adv. Mayur Y. Agrawal
Opp. Homegard Off.
Vasant Tailkies Road Akola
CELL NO - 9822682227, 9226211830

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३५६/२०२६ — प्रोसेस नं. ३११४/२०२६
चौ.ता. ०२/०५/२०२६ — दिनांक : ०९/०३/२०२६

**अर्जदार :** १. ज्योती अनंत नरवाडे २. विक्रांत अनंत नरवाडे ३. जयंत अनंत नरवाडे सर्व रा. रिंग रोड, खेतान नगर, चांदूर, गांधीनगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अनंत श्रीराम नरवाडे
**पत्ता :-** रा. रिंग रोड, खेतान नगर, चांदूर, गांधीनगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अनंत श्रीराम नरवाडे यांचे दि. १६/०९/२०२५ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे. कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४०१/२०२६ — प्रोसेस नं. ३३७४/२०२६
चौ.ता. १५/०४/२०२६ — दिनांक : ११/०३/२०२६

**अर्जदार :** १. राजु निरंजन गोपनारायण २. पंचफुला निरंजन गोपनारायण दोघेही रा. वार्ड नं. ४, घुसर, ता. जि. अकोला. ३. पद्मा भगवानराव भगत रा. महानगर पालिका शाळेजवळ, राजेंद्र नगर, रूख्मिनी नगर, अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : निरंजन मोतीराम गोपनारायण
**पत्ता :-** रा. घुसर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत निरंजन मोतीराम गोपनारायण यांचे दि. २५/१२/२०१० रोजी घुसर ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी.अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३६७/२०२६ — प्रोसेस नं. ३११६/२०२६
चौ.ता. ०२/०५/२०२६ — दिनांक : ०९/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती भानु भारत वाघेला रा. गुरूश्रीचंद अपार्टमेंट, मोहीते हॉस्पिटल समोर, मानव हिरो शोरूमच्या मागे, गीता नगर, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. भावना सुनिल चावडा रा. चामुडा निवास, शांतीवन पार्क स्ट्रीट नंबर - १, स्वामीनारायण मंदिराच्या मागे, राजकोट, गुजरात ३६०००

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भारत शामजी वाघेला
**पत्ता :-** रा. गुरूश्रीचंद अपार्टमेंट, मोहीते हॉस्पिटल समोर, मानव हिरो शोरूमच्या मागे, गीता नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भारत शामजी वाघेला यांचे दि. २७/०३/२०२४ रोजी समर्पण हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### तहसिलदार तथा अध्यक्ष शेतजमीन न्यायाधिकरण, तेल्हारा यांचे न्यायालय

रामाक्र: टिएनसी-१००/खंडाळा//२०२५-२६

**जाहीरनामा**

याव्दारा तमाम नागरीकांना कळविण्यात येते की, अर्जदार सुखदेव विठ्ठल कोल्हे रा.खंडाळा ता. तेल्हारा यांचा अर्ज यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार अर्जदार यांचे नावाने मौजे खंडाळा ता. तेल्हारा येथील गट क्र.६५ क्षेत्र २.२० हे.आर (पो.ख.०.११ हे. आर ) ही खरेदीखताने आलेली शेती असुन सदर शेतीचे इतर अधिकार सदरी गंगाराम किसन मराठा ५५-५६ साधे कुळ, महादेव तुकाराम यांचा ६३-६४ चा कुळाचा बोजा अशी नोंद नमुद असल्याने सदर नोंद/ बोजा कमी करणेबाबत अर्जदार यांनी विनंती केली आहे.

सदर प्रकरणात या न्यायाधिकरणासमोर सुणावणी सुरू असुन, सुनावणीची पुढील तारीख २७ मार्च, २०२६ ठरविण्यात आली आहे. सदर सुनावणी तहसिलदार, तहसिल कार्यालय, तेल्हारा यांचे दालनामध्ये होणार असुन ज्यांचे सदर जमीनीमध्ये हितसंबंध असतील त्यांनी आपले म्हणणे लेखी स्वरूपात मांडावे.

नमुद वेळी आपण सुणावणीस हजर होवून म्हणणे न मांडल्यास सदर प्रकरणात नंतर कोणतेही म्हणणे ऐकुण घेतले जाणार नाही व नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: तेल्हारा
दिनांक: १२/०३/२२६

शिक्का
**तहसिलदार तथा अध्यक्ष**
शेतजमीन न्यायाधिकरण, तेल्हारा

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १०४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# संक्षिप्त

## शेळ्या शेताच्या रस्त्याने आल्याच्या कारणावरून मारहाण

**वर्धा-** शेताच्या रस्त्याने शेळ्या आल्याच्या कारणावरून दोन सालगड्यांनी शेतकऱ्याला काठ्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना तिगाव शेतशिवारात घडली. मनीष महेशगौरी (५१, रा. गौरक्षण वॉर्ड) हे जखमी झाले. 'तुमच्या शेळ्या आमच्या शेताच्या रस्त्याने येऊ नयेत,' असे सांगत लक्ष्मण पंदरे व अजय पंदरे यांनी वाद घालत हल्ला केल्याचे तक्रारीत नमूद आहे. अचानक झालेल्या या मारहाणीमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. जखमी शेतकऱ्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. ग्रामीण भागात शेतरस्त्यांवरून जनावरे नेण्यावरून वाद होण्याच्या घटना वाढत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. तक्रारीवरून पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## हिस्सेवाटणीच्या वादातून काका-काकूंना धमकी, तोडफोड

**वर्धा-** शेतीच्या हिस्सेवाटणीच्या वादातून पुतण्याने काका-काकूंना शिवीगाळ करून घरातील साहित्याची तोडफोड केल्याची घटना रामनगर परिसरात घडली. अमोल खुनकर याने वादाच्या भरात घरातील वस्तू फेकाफेक करून नुकसान केले. तसेच शौचालय व बाथरूमचा दरवाजा तोडल्याने सुमारे चार हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. कौटुंबिक वादातून अशा घटना घडत असल्याने समाजात चिंता व्यक्त होत आहे. काका अशोक खुनकर यांनी पोलिसात तक्रार दिल्यानंतर अमोल खुनकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास रामनगर पोलीस करीत आहेत.

## दगड बाजूला केल्याच्या कारणावरून मारहाण

**सेलू-** शेतातून गहू ट्रॅक्टरने घरी नेत असताना रस्त्यातील दगड बाजूला केल्याच्या कारणावरून वाद होऊन विटेने मारहाण करण्यात आल्याची घटना शिरसमुद्र येथे घडली. विजय मलोंडे (४२) हे जखमी झाले. वळणाच्या रस्त्यावरून ट्रॅक्टर जात नसल्याने त्यांनी बाजूच्या घराजवळचे दोन दगड हटवले. यावरून ज्ञानेश्वर भुजाडे यांनी संतापून त्यांच्यावर विटेने हल्ला केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप आहे. किरकोळ कारणावरून झालेल्या या हिंसाचारामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले. जखमी शेतकऱ्याने पोलिसात तक्रार दिल्यानंतर आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

## चोरीच्या संशयावरून इसम ताब्यात

**वर्धा-** अंधाराचा फायदा घेऊन चोरीच्या उद्देशाने लपून बसलेल्या एका संशयितास पोलिसांनी ताब्यात घेतल्याची घटना आलोडी परिसरातील पद्मावतीनगर येथे घडली. गस्तीवर असलेल्या पोलिसांना संशयास्पद हालचाल दिसल्याने त्यांनी त्या इसमाला पकडून चौकशी केली. तोंडाला दुपट्टा गुंडाळून बसलेल्या या व्यक्तीकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. त्यामुळे त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. परिसरात अलीकडे चोरीच्या घटना वाढल्याने नागरिक सतर्क झाले आहेत. पोलिसांनी पुढील कारवाई करून त्याला सुचनापत्रावर सोडण्यात आले. रात्रीच्या वेळी अनोळखी व्यक्ती दिसल्यास तत्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तलवार घेऊन दहशत माजवणारा अटकेत

**वर्धा -** सार्वजनिक रस्त्यावर हातात तलवार घेऊन गोंधळ घालत नागरिकांमध्ये भीती निर्माण करणाऱ्या इसमाला पोलिसांनी अटक केली. शेख शानु शेख जब्बार (३६, रा. इतवारा) असे आरोपीचे नाव आहे. तो रामनगर येथील स्वावलंबी मैदान परिसरात तलवार फिरवत आरडाओरडा करीत होता. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन त्याला शस्त्रासह ताब्यात घेतले. सार्वजनिक ठिकाणी शस्त्र घेऊन फिरण्याच्या घटनांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याची चर्चा नागरिकांत आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## विभागीय हातमाग कापड स्पर्धा; विणकरांना सहभागाचे आवाहन

**वर्धा-** हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातर्फे विभागीय हातमाग कापड स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. उत्कृष्ट नमुने सादर करणाऱ्या विणकरांना गौरविण्यात येणार आहे. स्पर्धा नागपूर येथे होणार असून जिल्ह्यातील विणकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुकांनी आपले तयार नमुने प्रादेशिक वस्त्रोद्योग कार्यालयात निश्चित वेळेत सादर करावेत. ग्रामीण भागातील पारंपरिक हातमाग उद्योगाला चालना देण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वाच्या ठरत असल्याचे जाणकारांचे मत आहे. अधिक माहितीसाठी संबंधित कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.


# 'शेतात विहीर असतानाही पाणीपट्टी कराची वसूली

## दहेगाव पाटबंधारे विभागाचा मनमानी कारभार; शेतकऱ्यांनमध्ये संतापाची लाट

**सेलु/ अभय बेदमोहता**

तालुक्यांतर्गत येणाऱ्या सुकळी (स्टेशन) परिसरात पाटबंधारे विभाग दहेगाव यांच्या कारभाराबाबत शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.अचानकपणे मागील तब्बल दहा वर्षांची पाणीपट्टीकर वसुलीचा सपाटा सुरू करण्यात आल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.

शेतकरी प्रमोद तडस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्टपणे सांगितले की, 'माझ्या शेतात स्वतःची विहीर आहे. मी नदीचे पाणी वापरत नाही, मग मला पाणीपट्टीकर वसुलीची पावती कशी व कोणत्या नियमाने दिली, यावर अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर अधिकच धक्कादायक आहे. यावर त्यांनी सांगितले की, तुमच्या शेतात विहीर आहे हे आम्हाला आधी कळवायला हवे होते.शेतकऱ्यांच्या हाती आलेल्या पावतीनुसार, पाणी आकारणी, स्थानिक निधी (२०%) आणि दंड (१०%) अशा विविध शुल्कांचा समावेश करून मोठी रक्कम आकारण्यात आली आहे. विशेष म्हणजे, अनेक शेतकऱ्यांकडून आरोप होत आहे की, गेल्या दहा वर्षांत विभागाचा कोणताही कर्मचारी तपासणीसाठी



कधीच फिरकला नाही. आता मात्र अचानक मोठ्या प्रमाणावर थकबाकी दाखवून वसुली करण्याचा सपाटा सूरू केला आहे. सुकळी (स्टे.), दहेगाव (गोसावी) आणि परिसरातील शेतकरी सांगतात की, नदीवर मोटार लावून पाणी घेणाऱ्यांनाही कोणतीही पूर्वसूचना न देता थेट दंडासह वसुली केली जात आहे. यामुळे ही वसुली नियमांनुसार आहे का की केवळ महसूल वाढवण्यासाठीचा शेतकऱ्यांवर दबाव निर्माण करण्यात येत आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.शेतकऱ्यांनी या कारवाईला मनमानी व अन्यायकारक ठरवत तीव्र रोष व्यक्त केला आहे. त्यांनी मागणी केली आहे की,प्रत्यक्ष पाहणी करूनच पुढील आकारणी करावी. विहीरधारक शेतकऱ्यांना पाणीपट्टी करातून वगळावे व दहा वर्षांची एकत्रित वसुली तात्काळ स्थगित करावी अन्यथा, येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा ईशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे पाटबंधारे विभाग दहेगाव यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा मागणी आहे.



# शेतकऱ्याचा शत्रू गजाआड

## चण्याच्या ढिगाला आग लावणाऱ्या दोघांना सेलू पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**सेलु/ जनमाध्यम**

शेतात कष्टाने पिकवलेल्या पिकाला आग लावून शेतकऱ्याचे स्वप्न क्षणात राखरांगोळी करणाऱ्या समाजकंटकांना सेलू पोलिसांनी अवघ्या काही दिवसांतच बेड्या ठोकल्या आहेत. मुकिंदापूर शिवारातील चण्याच्या ढिगाला आग लावून २.५० लाखांचे नुकसान करणाऱ्या दोन आरोपींना शोधून काढण्यात पोलिसांना यश आले असून, त्यांच्या या कामगिरीमुळे परिसरातून पोलिसांचे कौतुक होत आहे.

वघाळा येथील शेतकरी गजानन कांबळे यांनी आपल्या पाच एकर शेतात चन्याचे पीक घेतले होते. २८ फेब्रुवारीच्या रात्री अज्ञात इसमांनी त्यांच्या शेतातील चण्याच्या ढिगाला आग लावली होती. वर्षभराची मेहनत डोळ्यादेखत जळून खाक झाल्याने कांबळे यांचे सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले होते. याप्रकरणी सेलू पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.या गंभीर गुन्ह्याचा तपास पोलीस अंमलदार विक्रम काळमेघ आणि रामकिसन इप्पर हे करत होते. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी राहुल रमेशराव श्रीखंडे (वय ३४) आणि मंगेश रामदासजी भुजाडे (वय ३४) दोन्ही राहणार कोपरा, ता. सेलू यांना ताब्यात घेतले.कर्तव्यदक्ष ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनात विचारपूस केली असता, दोन्ही आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली.सदर यशस्वी कारवाई वर्धा जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे,उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये देवेंद्र ठाकूर (पोलीस निरीक्षक, सेलू) प्रितम निमगडे (पोलीस उपनिरीक्षक)विक्रम काळमेघ व रामकिसन इप्पर (पोलीस अंमलदार) यांचा मोलाचा वाटा होता. शेतकऱ्याचे नुकसान करणाऱ्या आरोपींना हुडकून तात्काळ अटक केल्यामुळे सेलू पोलिसांच्या कार्यतत्परतेची चर्चा आता सर्वत्र होत आहे.अशा प्रकारच्या कारवायांमुळे गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पीडित शेतकऱ्याला न्याय मिळण्याची आशा पल्लवित झाली आहे.

## गॅसटंचाई विरोधात एनएसयूआयचे अनोखे आंदोलन

# नालीतील वायूवर चहा बनवून निषेध

**वर्धा/ जनमाध्यम**

शहरात निर्माण झालेल्या घरगुती एलपीजी गॅस टंचाईच्या निषेधार्थ एनएसयूआयच्या वतीने शिवाजी चौकात अनोखे आंदोलन करण्यात आले. नालीतील वायूवर चहा बनविण्याचे प्रात्यक्षिक करून गॅस सिलेंडरच्या तुटवड्याविरोधात संताप व्यक्त करण्यात आला.

शनिवार (ता. १४) रोजी शिवाजी चौकातील नालीवर भांडे उलटे ठेवून त्याला छिद्र करून नळी जोडण्यात आली. नालीतून बाहेर पडणाऱ्या वायूवर चहा बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकारामुळे परिसरात उत्सुकता निर्माण झाली असून बघ्यांची मोठी गर्दी जमली




होती.कार्यकर्त्यांनी नागरिकांना वेळेवर गॅस सिलेंडर मिळत नसल्याने दैनंदिन स्वयंपाक करणे कठीण झाले असल्याचे सांगत टंचाई तात्काळ दूर करण्याची मागणी केली. गॅस पुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला. या आंदोलनात एनएसयूआयचे प्रदेश महासचिव उत्कर्ष पांडे, उपाध्यक्ष होमराज खंदळे, महासचिव रोशन लोहकरे, शहराध्यक्ष झुंबर खान, मोहम्मद अनवारूल खान, निहाल आलम, क्रिश वैरागडे, सचिव गौरव पहाडे (सेलू तालुका अध्यक्ष), चेतन तमगिरे, आर्थिक मस्के, जिल्हाध्यक्ष विश्वभूषण पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## खा.अमर काळे यांनी सिंदी रेल्वे थांबे पुन्हा सुरु करण्याची मागणी

**सिंदी रेल्वे/ जनमाध्यम**

कोविड-१९ काळात बंद झालेल्या सिंदी रेल्वे येथील गाड्यांचे थांबे पुन्हा सुरु करण्यासाठी खा.अमर काळे यांनी सोमवारी लोकसभेत रेल्वे मंत्र्यांकडे ठोस मागणी केली. खासदारांनी संसदेत स्पष्टपणे सांगितले की, सिंदी रेल्वेच्या थांब्यांमुळे हजारो नागरिकांचे दैनंदिन प्रवास सोपे होतो. कोविडमुळे थांबे बंद झाल्यामुळे प्रवाशांना गंभीर अडचणींना सामोरे जावे लागले. आता थांबे पुन्हा सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे. खासदाराच्या या पुढाकारामुळे सिंदीकरांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे. स्थानिक नागरिकांनी सोशल मीडियावर आणि सार्वजनिक ठिकाणी खासदारांचे कौतुक केले आहे. व्यापारी, विद्यार्थी आणि प्रवासी वर्ग यांना या निर्णयामुळे मोठा फायदा होणार असल्याचे सांगितले जात आहे.स्थानिकांच्या मते, रेल्वे थांबे पुन्हा सुरु झाल्यास शहरातील लोकांची वाहतूक सोपी होईल तसेच अर्थकारणालाही चालना मिळेल. याशिवाय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयांपर्यंत जाण्यास



आणि व्यापाऱ्यांना वस्तूंची वाहतूक सुलभ करण्यास मोठा फायदा होईल.सिंदी रेल्वेचे थांबे पुन्हा सुरु होणे स्थानिक जनजीवन सुधारण्यासाठी आणि शहराच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. खासदार अमर काळे यांनी घेतलेले हे पाऊल सिंदीकरांसाठी ऐतिहासिक मानले जात आहे.

# ऑस्ट्रेलियातील संस्थेकडून कुलगुरू प्रो.कुमुद शर्मा यांचा सन्मान

**वर्धा/ जनमाध्यम**

हिंदी भाषा, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय योगदानाबद्दल वर्धेतील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा यांना ऑस्ट्रेलियातील भारतीय साहित्य आणि कला सोसायटी या प्रतिष्ठित संस्थेकडून सन्मानित करण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त त्यांना लँग्वेज अँड लिटरेचर एक्सलन्स अवॉर्ड प्रदान करण्यात आला. साहित्य, कला, पत्रकारिता आणि सामाजिक कार्य या क्षेत्रांतील दीर्घकालीन व प्रभावी योगदानाबद्दल हा सन्मान देण्यात आल्याचे संस्थेने स्पष्ट केले.प्रा. शर्मा यांनी हिंदी भाषेच्या प्रसार-प्रचारासोबतच जागतिक स्तरावर भारतीय भाषिक अस्मिता बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने संशोधन, प्रकाशन आणि



आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली असून हिंदीला जागतिक संदर्भात स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी संदेशात नमूद केले की, प्रा. शर्मा यांचे कार्य जगभरातील हिंदीप्रेमींसाठी प्रेरणादायी असून त्यांनी भाषा व साहित्य समाजाशी जोडण्याचे कार्य केले आहे.

महिला सशक्तीकरण क्षेत्रातील त्यांचे योगदानही उल्लेखनीय असल्याचे त्यांनी म्हटले.आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त दिला जाणारा हा सन्मान विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांना समर्पित असून प्रा. कुमुद शर्मा यांचा गौरव हिंदी भाषेच्या जागतिक प्रतिष्ठेचे प्रतीक मानला जात आहे.

## वाघाच्या हल्ल्यात दोन गायी ठार

**समुद्रपूर-** तालुक्यातील साखरा व जोगीनगुंफा परिसरात वाघाच्या हल्ल्यात दोन गायी ठार झाल्याने शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रामकृष्ण गौर यांच्या शेतातील बांधलेल्या गायीवर पहाटे हल्ला करून वाघाने तिला ठार केले. यापूर्वी जोगीनगुंफा येथे अंबाडरे यांच्या गायीवरही हल्ला झाला होता. सलग घटनांमुळे जनावरांचे रक्षण करणे कठीण झाले असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. वाघ जवळच्या जंगल परिसरात असल्याची माहिती असून वन विभागाने पंचनामा केला आहे. शेतकऱ्यांनी तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. वन विभागाने नागरिकांनी सावध राहावे.

# व्हीजिंग समस्येवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**वर्धा/ जनमाध्यम**

सावंगी (मेघे) येथील जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालयाच्या बालरोग विभागाच्या वतीने मुलांमध्ये आढळणाऱ्या श्वास घेताना सीटीसारखा आवाज येणे (व्हीजिंग) या समस्येवर विशेष अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाला डॉक्टर व पदव्युत्तर विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती लाभली.

या व्याख्यानासाठी चंदीगड येथील पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्थेतील बाल श्वसनरोग तज्ज्ञ प्रा. डॉ. पंकज सी. वैद्य यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. त्यांनी मुलांमध्ये श्वास घेताना सीटीसारखा आवाज येण्याची समस्या कशी ओळखावी, त्याची वैद्यकीय तपासणी कशी करावी आणि योग्य उपचार पद्धती कोणत्या आहेत, याबाबत सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाची सुरुवात बालरोग विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. अमर ताकसांडे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी मुलांमधील श्वसनविकारांचे



अचूक निदान आणि वैज्ञानिक उपचाराचे महत्त्व अधोरेखित केले. सुमारे ६० प्राध्यापक व पदव्युत्तर विद्यार्थी या सत्राला उपस्थित होते. यानंतर झालेल्या परस्पर संवादात्मक चर्चेत डॉ. शाम लोहिया, डॉ. अजिंक्य वझुरकर, डॉ. स्वाती खापेकर, डॉ. सागर करोटकर, डॉ. अमोल लोहाकर, डॉ. प्रशांत खरटडे, डॉ. दिनेश हिंगे यांच्यासह अनेक प्राध्यापकांनी सहभाग घेत आपले वैद्यकीय अनुभव मांडले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. चंदना, डॉ. मीत, डॉ. समृद्धी आणि डॉ. वनन यांचे विशेष योगदान राहिले. समारोप प्रसंगी डॉ. रेवत मेश्राम यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# मराठी नववर्षाचे सुरेल स्वागत : सोशालिस्ट चौकात 'पाडवा पहाट'

## प्रा.संजीव लाभे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**वर्धा/ जनमाध्यम**

मराठी नववर्षाच्या स्वागतासाठी शहरात भक्ती, संस्कृती आणि संगीताचा मनोहारी संगम अनुभवायला मिळणार आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी पहाटे ५ ते ७.३० या वेळेत सोशालिस्ट चौकात 'पाडवा पहाट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये मुंबई येथील गायक आनंदी जोशी व पुणे येथील चैतन्य कुलकर्णी यांचे सादरीकरण होणार असल्याची माहिती श्रीराम मंदिर देवस्थान व श्रीराम शोभायात्रा समितीच्या वतीने प्रा. संजीव लाभे यांनी पत्रकार परिषदेत दिली. टिळक मार्केट परिसरातील श्रीराम मंदिर सभागृहात सोमवारी (ता. १६) झालेल्या पत्रकार परिषदेत मराठी नववर्ष व श्रीराम नवरात्रानिमित्त आयोजित कार्यक्रमांची सविस्तर रूपरेषा जाहीर करण्यात आली.श्रीराम नवरात्राच्या पार्श्वभूमीवर ४ मार्चपासून शहर व परिसरात 'श्रीराम प्रभात फेरी' काढण्यात येत असून सकाळी ६.३० ते ८.३० या वेळेत या फेऱ्या होत आहेत. आतापर्यंत शहरातील



१३ भागांतून प्रभात फेऱ्या पार पडल्या असून १८ मार्च रोजी बोरगाव (मेघे) भागातून अंतिम फेरी काढण्यात येणार आहे.गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला नागरिकांना कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी स्कूटी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच १८ ते २८ मार्च या कालावधीत विविध सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यक्रमांची मालिका आयोजित करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.स्थानिक श्रीराम मंदिरात १९ ते २४ मार्चदरम्यान श्रीरामांना पवमान अभिषेक करण्यात येणार आहे. दुपारी भजनी मंडळांचे भजन, सायंकाळी सामूहिक श्रीविष्णूसहस्त्रनाम पठण व उपासना, तसेच आरतीनंतर कथाकार श्रुती भंडारे यांची रामकथा होणार आहे.२६ मार्च रोजी श्रीरामनवमीच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत श्रुती भंडारे यांचे कीर्तन होईल. सायंकाळी ५.३० वाजता प्रभू श्रीरामांच्या पालखीचे पूजन करून भव्य शोभायात्रेला प्रारंभ होणार आहे.

पत्रकार परिषदेला श्रीराम शोभायात्रा समितीचे अध्यक्ष अरुण काशीकर, राजेंद्र उमाटे, श्रीराम मंदिर देवस्थानाचे विजय धाबे, प्रमोद कुलधरिया, शिरीष जवदंड आदी उपस्थित होते.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष- १४ अंक ११०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**
**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## E-Tender Notice

MAHAVITARAN

Separate digitally sealed and signed Two Bid System e-tenders are invited from Eligible/Registered and Reputed Firms/Contractors/ Agencies for the works detailed as under. **T-28-** Work Contract for loading, and unloading and stacking of Dist. T/F, meters & line material at T.M.U. and M.T.U. Amravati under Amravati Division **(5.00 Lakhs)**. **T-29-**Annual Transport contract for MSEDCL's material PSC poles 8 Mtr. / 9 Mtr. Long, RSJ Pole of various sizes, Transformers , line material , Conductor Drum, Cable Drum etc. from various Store Centers / Pole Factories to work site under Rural Division, Amravati - **(10.00 Lakhs)**. The tender documents are available at our website **https://etender.mahadiscom.in/eatApp/** and is downloaded from our website from **Dt. 18.03.2026**. No hard copy of tender will be provided. Any change in e-tender schedule, corrigendum etc shall also be put up on website. Prospective bidders are therefore requested to regularly check the website for updates. Submit the Tender through e-tendering process only latest by **dt. 24.03.2026 up to 18.00 hrs**. While submitting the Tender, please attach the Tender fee stated above and EMD in the form of Cash / demand draft in favour of Executive Engineer, MSEDCL, Rural Division, Amravati. Technical Bid will be opened on **Dt 25.03.2026** Contact Person: - Add. Executive Engineer (M), Amravati. **Tel. No. 7875763742.**

**Executive Engineer**
**PRO No. 72** **O&M Division MSEDCL, Amravati Rural**

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.११.०३.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड**, यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मोहम्मद अकिल शेर मोहम्मद** अर्जात नमूद जन्म दिनांक **३०.०४.१९७३** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेड** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ............हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) प्रल्हाद पारणुजी सिरसाट (सरपंच) | १) प्रल्हाद पारणुजी सिरसाट (सरपंच) |
| २) पंकज नानासाहेब राऊत (पो.पा.) | २) पंकज नानासाहेब राऊत (पो.पा.) |
| ३) कु.जे.व्ही.यावले | ३) कु.जे.व्ही.यावले |
| ४) जी.डी.फुटाणे (ग्रा.पं.अधि.) | ४) जी.डी.फुटाणे (ग्रा.पं.अधि.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत निमखेड**

## तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

**क्र. रामाक्र/५४/एमआरसी-८१/अंबाडा/२०२५-२०२६**

### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **सरफराजुद्दीन सैफुद्दीन** यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत ............ ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.अंबाडा येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय अंबाडा येथे स्वतःचे जन्म दिनांक १३.१२.१९९९ रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

**मा.सहदिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.)क्र.७८/२०२६ ने.ता.१८.०४.२०२६
**सिंधुबाई अधिक पाच - विरुध्द - निरंक**

**अर्जदार :** १. सिंधुबाई शेषराव झिमटे, रा.एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. रजीन उत्तम चंदनशे, रा.फुबगांव खरबी, ता.दारव्हा
३. सुनिता प्रकाश बंड, रा.एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. अनिता नरेश मारोडकर, रा.आरमोरी बडी, ता.आरमोरी, जि.गडचिरोली
५. प्रशांत शेषराव झिमटे, रा.आरमोरी बडी, ता.आरमोरी, जि.गडचिरोली

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत शेषराव चंपत झिमटे** यांचा मृत्यू दि.**३१.०१.२०२६** रोजी एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयत यांचे अर्जदार नं.१ ही पत्नी आहे व अर्जदार नं.२ ते ४ ह्या विवाहित मुली आहेत.तसेच अर्जदार नं.५ हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०७ मार्च २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३३९/२०२६
**श्रीमती मंजू अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.०८.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Manju Gopichand Gupta, Age 61 Yrs. Occu.: Household
2. Nikhil Gopichand Gupta, Age 34 Yrs. Occu.: Business
Both R/o Near Marimata Mandir, Hamalpura, Tq.Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक गोपीचंद गंगाधर गुप्ता** हे दिनांक 22.08.2018 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मंजू अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मंजू अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १८९**
**आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025**

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# तहसीलदार पथकावर हल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथे अवैध घरगुती गॅस सिलेंडर वापराविरोधात कारवाई करण्यासाठी गेलेल्या प्रशासनाच्या पथकावर हल्ला करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी पोलिसांनी पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना १५ मार्च रोजी दुपारी अंजनगाव सुर्जी टी-पॉइंटजवळील बाभळी येथील 'जम जम हॉटेल'मध्ये घडली. नायब तहसीलदार प्रमोद नारायण काळे (वय ५६) हे आपल्या सहकाऱ्यांसह हॉटेलमध्ये अवैध गॅस सिलेंडरविरोधात कारवाई करण्यासाठी गेले होते. कारवाईदरम्यान तेथे उपस्थित असलेल्या काही व्यक्तींनी बेकायदेशीररीत्या गर्दी जमवून शासकीय कर्मचाऱ्यांशी धक्काबुक्की केली. तसेच अधिकाऱ्यांनी तयार केलेले कारवाईचे शासकीय कागदपत्रे फाडून टाकत कामात अडथळा निर्माण केला.

या प्रकरणी नायब तहसीलदार प्रमोद काळे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी शुभम दादाराव पारवे, मोहम्मद जुनेद अब्दुल रऊफ, मोहम्मद इमरान अब्दुल अमीन, दादाराव पारवे आणि अब्दुल अमीन अब्दुल मोबीन (सर्व रा. दर्यापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. दर्यापूर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.

शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)

**संपर्क - ९६०७५८२०९४**

## E-Tender Notice

MAHAVITARAN

Separate sealed Bids in prescribed forms are invited for execution of e-tender for hiring of vehicle for Amravati Testing Division under Amravati Circle for the year 2026-27 of Tender No. **SE/AMT/OM/HOV/MVP2020/TESTING DIV/2025-26/T-35**. The estimated cost of tender is **Rs. 4.92 Lakhs,** for hiring of vehicle for Amravati Batch under Testing Division under Amravati Circle for the year 2026-27 of Tender No. **SE/AMT/OM/HOV/MVP2020/AMT_UNIT /2025-26/T-36.** The estimated cost of tender is **Rs. 4.92 Lakhs,** and hiring of vehicle for Yavatmal Batch under Testing Division under Amravati Circle for the year 2026-27 of Tender No. **SE/AMT/OM/HOV/MVP2020/YTL_UNIT /2025-26/T-37**. The estimated cost of tender is **Rs. 4.92 Lakhs** respectively. Online sale of Tender Documents on MSEDCL's website **www.mahadiscom.in** or **https://etender.mahadiscom.in** from **Dt. 13.03.2026 to Dt. 22.03.2026 upto 23.55 hrs.** Last date for EMD payment is **Dt. 22.03.2026 upto 17.00 hrs.** Email ID. **seamravati2011@gmail.com. Contact person** Executive Engineer (Adm) Tel. No **0721-2663640**

**Superintending Engineer**
**PRO No.69** **M.S.E.D.C.Ltd. O&M Circle Office, Amravati**

---

Appendix - A

**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI.**

No. SGBAU/8/C-477/2026. Date 13/03/2026.

**WANTED**

Name of the Society - **Late. Babasaheb Varhade Education Society, Amravati.**
Name of the College - **Nanibai College Of Education, Amravati.**

Applications are invited for Full Time Regular Posts as per following details in the faculty of Science & Technology/Humanities/ Commerce & Management/ Interdisciplinary Studies.

Vacancies for Non-Grant Courses/Programmes

| Sr. No. | Name of the Post | Subject/ Course | Category wise No.of Post | | | | | | Total No. of Post |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Open | SC | ST | EWS | OBC | SEBC | |
| 01 | Principal | -- | 01 | -- | -- | -- | -- | -- | 01 |

For qualifications/Experience/Pay Scale and other details/conditions visit university website www.sgbau.ac.in and College website www.nanibaibed.com.

The candidate should send their application Address to the President, Late Babasaheb Varhade Shikshan Sanstha, Rathi Nagar, Amravati. within 15 days from the date of publication of the advertisement along with necessary testimonials duly attested.

**PRESIDENT**
**Late Babasaheb Varhade Shikshan Sanstha, Rathi Nagar, Amravati.**

Application are invited for the post of Assistant Professors in various subject mentioned below. The posts are purely temporary besis for academic session . 2025-26 & 2026-27 at Nanibai college of Education, Samta Colony, Kathora Road, Amravati.

| Sr. No. | Name of the Post | Subject/Course | Qualifications | No.of Posts |
|---|---|---|---|---|
| 1. | Assistant Professor | Prospective Education /Pedagogy Subject | M.A., M.Sc., M.Ed. SET/NET/Ph.D. | 05 |
| 2. | Assistant Professor | (Physical Education Fine Arts & Music) | M.P.Ed., M.A./M.Com./ M.Sc., M.A.(Music) M.F.A/SET/NET/Ph.D. | 02 |

The candidate should send their application Address to the President, Late Babasaheb Varhade Shikshan Sanstha, Rathi Nagar, Amravati. within 15 days from the date of publication of the advertisement along with necessary testimonials duly attested.

**PRESIDENT**
**Late Babasaheb Varhade Shikshan Sanstha, Rathi Nagar, Amravati.**

# क्रिप्टो नफ्याच्या जाळ्यात अडकली महिला

**अमरावती/प्रतिनिधीः-** 'क्रिप्टोमध्ये गुंतवा आणि मोठा नफा कमवा' या आमिषाला बळी पडत परतवाडा येथील एका महिलेची लाखोंची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. तब्बल ३ लाख ७० हजार रुपयांना गंडा घालणाऱ्या नाशिकच्या आरोपीविरुद्ध परतवाडा पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपासाची चक्रे फिरवली आहेत.पेन्शनपुरा परिसरातील ४५ वर्षीय पीडित महिलेची आरोपी दिलीप जगदेवराव काळे (रा. नाशिक) याच्याशी ओळख झाली होती. ऑगस्ट २०२२ पासून त्याने 'क्रिप्टोकरन्सी गुंतवणूक' या नावाखाली आकर्षक योजना सांगत तिचा विश्वास जिंकला. सुरुवातीला केवळ ३० हजार रुपयांची गुंतवणूक करून देत त्याने पुढील व्यवहारांसाठी मार्ग मोकळा केला. यानंतर जास्त परताव्याचे आमिष दाखवत आरोपीने टप्प्याटप्प्याने रक्कम उकळण्यास सुरुवात केली. एनईएफटीद्वारे १ लाख ५० हजार रुपये घेतले, तर विश्वास बसावा म्हणून १० हजार रुपये परतही दिले. पुढे आरोपी आपल्या पत्नीसह महिलेच्या घरी येत नव्या योजनेचे आमिष दाखवून ७० हजार रुपये रोख आणि ३० हजार रुपये 'प्रोसेसिंग फी' म्हणून घेतले. अशा प्रकारे एकूण ३ लाख ८० हजार रुपये आरोपीने घेतले; मात्र त्यापैकी केवळ १० हजार रुपये परत केल्याने महिलेची ३ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले.

## सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, तिवसा यांचे कार्यालय
## नविन प्रशासकीय ईमारत, सुरवाडी खुर्द, तिवसा, जि.अमरावती

### जाहीर नोटीस

खालील प्रमाणे संबंधित सहकारी संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ नुसार अंतिमरित्या अवसायनात घेवून अवसायनातील संस्थेवर खालील नमुद अवसायकाची नियुक्ती करण्यात आली आहे. खालील अ.क्र.१ व २ वरील संस्था १० वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून अवसायनात आहे. खालील अवसायनातील संस्थेचे कामकाज बंद स्थितीत आढळून आल्याने/संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याचे निदर्शनास आल्याने अवसायनाची कार्यवाही पूर्ण करुन संस्थेची नोंदणी रद्द करणे क्रमप्राप्त आहे. तरी सदर संस्थेशी कोणीही घेणी/देणी अगर हितसंबंध/दावा/बोजा असल्यास दिनांक २४.०३.२०२६ पर्यंत वरील पत्त्यावर लेखी स्वरुपात पुराव्यासह सादर करावी. वरील मुदतीत कोणताही दावा प्राप्त न झाल्यास संस्थेशी कोणाचाही कोणताही घेणी/देणी अगर हितसंबंध/दावा/बोजा असल्यास त्यांनी तो जाणीपूर्वक सोडून दिला आहे असे गृहित धरुन अवसायनाची पुढील कार्यवाही पुर्ण केली जाईल. खालील संस्थांची अंतिम सर्वसाधारण सभा दिनांक २७.०४.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता सहायक निबंधक सहकारी संस्था, तिवसा यांचे कार्यालय, नविन प्रशासकीय ईमारत, तहसील कार्यालय परिसर, सुरवाडी खुर्द, तिवसा, ता.तिवसा या पत्त्यावर घेण्यात येईल. खालील अवसायनातील संस्थांचे सर्व सभासदांनी याची नोंद घेऊन सदर सभेला उपस्थित रहावे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व र.नं. | अवसायकाचे नांव | | मुख्यालय |
|---|---|---|---|---|
| | | नांव | पदनाम | |
| १. | श्रीकृष्ण गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., भिवापूर र.नं.३१३, ता.तिवसा | श्री.लक्ष्मीकांत श्रीराम देशमुख | निरिक्षक अंतर्गत दि.महाराष्ट्र स्टेट को-ऑप.हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशन लि., मुंबई, जिल्हा कार्यालय अमरावती | सहायक निबंधक सहकारी संस्था तिवसा |
| २. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., तळेगांव ठाकूर र.नं.६५६, ता.तिवसा | श्रीमती दुर्गा वडुरकर | उपलेखा परिक्षक, सहकारी संस्था तिवसा | सहायक निबंधक सहकारी संस्था तिवसा |
| ३. | राणा प्रताप ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., मोझरी, र.नं.५५८, ता.तिवसा | श्री.एम.एस.चक्रे | मुख्य लिपिक अंतर्गत सहायक निबंधक सहकारी संस्था, तिवसा | सहायक निबंधक सहकारी संस्था तिवसा |
| ४. | गुरुवर्य सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., तिवसा,र.नं.५५७, ता.तिवसा | श्री.एम.एस.चक्रे | मुख्य लिपिक अंतर्गत सहायक निबंधक सहकारी संस्था, तिवसा | सहायक निबंधक सहकारी संस्था तिवसा |
| ५. | कोळवण पाणी वापर व व्यवस्थापन सहकारी संस्था मर्या., शिरजगांव, र.नं.५६६ ता.तिवसा | श्री.मनोज सुधाकर रोहणकर | सहकार अधिकारी श्रेणी-१, अंतर्गत सहायक निबंधक सहकारी संस्था, तिवसा | सहायक निबंधक सहकारी संस्था, तिवसा |

दिनांक ११.०३.२०२६

**स्वा/-**
**(प्रिती धामणे)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था, तिवसा**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.२०६/२०२६ ने.ता.२१.०४.२०२६

**अर्जदार -** १. शंकर देवमन पाचारे, वय ७५ वर्षे, धंदा - मजुरी
२. रंगराव देवमन पाचारे, वय ६६५८ वर्षे, धंदा - मजुरी
३. मोहन देवमन पाचारे, वय ५६ वर्षे, धंदा - मजुरी
४. ओंकार देवमन पाचारे, वय ५४ वर्षे, धंदा - मजुरी
५. पुरुषोत्तम देवमन पाचारे, वय ४६ वर्षे, धंदा - मजुरी
सर्व रा.हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ ते ५ चे वडील **देवमन चिंतामण पाचारे** हे दि.**१२.०४.२०१७** रोजी हिवरखेड ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ५ यांची आई नामे **कौसल्याबाई देवमनराव पाचारे** हिचा दिनांक ०८.०८.२०२३ रोजी हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १३.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**मा.सहदिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.)क्र.७४/२०२६ ने.ता.२.०५.२०२६

**कमल - विरुध्द - निरंक**

**अर्जदार :** १. कमल महेंद्रराव चौधरी
२. विक्रांत महेंद्रराव चौधरी
३. शशिकांत महेंद्रराव चौधरी
सर्व रा.वार्ड नं.१, गवारी पुरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत महेंद्र नारायण चौधरी** यांचा मृत्यू दि.**२६.०१.२०२२** रोजी ग्रामीण रुग्णालय, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयत **महेंद्र नारायण चौधरी** यांची आई नामे **सरस्वता नारायण चौधरी** यांचे दिनांक ११.०८.२०२१ रोजी निधन झाले. अर्जदार नं.१ ही पत्नी आहे व अर्जदार नं.२ व ३ ही मुले आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०७ मार्च २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.काळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४४०/२०२६
**आबेदा बी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२९.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Abeda Bi Amir Beg (Baig), Age 76 Yrs. Occu.: Household
2. Naim Baig Amir Baig, Age 60 Yrs. Occu.: Labour
Both R/o Near Masjid Aqsa, Chhaya Nagar, Tq.Dist.Amravati.
3. Shaheen Anjum Amir Baig, Age 44 Yrs. Occu.: Household
R/o Habib Nagar No.2, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** 1. Shabana Parvin Azmat Khan, Age 47 Yrs. Occu.: Housewife
R/o C/o Azmat Kha, Sharbat Pura, Near Kirana Shop
Nandgaon Peth, Dist.Amravati.
2. Sultana Begum Mohammad Sadik,
Age 41 Yrs. Occu.: Housewife
R/o Near Afsar Kirana Alim Nagar, Dist.Amravati.

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक अमीर बेग गफुर बेग** हे दिनांक 14.07.1998 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अबेदा बी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अबेदा बी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४४६/२०२६
**सुंदर व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१५.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Sundar Manohar Benival Age 48 Yrs. Occu.: Household
2. Arti Manohar Beniwal @ Arti Bholu Sunere,Age 31 Yrs. Occu.: Household
3. Kiran Manohar Beniwal @ Kiran Nitesh Sunere
Age 27 Yrs. Occu.: Household
4. Golu Manohar Beniwal, Age 22 Yrs. Occu.: Labour
All R/o Forest Coter Road, Near Hanuman Mandir, Wadali, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक श्री.मनोहर पुनाजी बेनिवाल** हे दिनांक 03.10.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुंदर व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुंदर व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस
## जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती

क्र. न.भू.१/अपील अर्ज क्र. २६२४/२०२४ अमरावती दिनांक ११.०२.२०२६

श्री.दिलीप शेषराव कळसकर,
रा.कळाशी, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**१.** उपअधीक्षक, भूमि अभिलेख दर्यापूर, जि.अमरावती
२. श्री.रामेश्वर दिगांबर राणे
सौ.लता रामेश्वर राणे
रा.कळाशी, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. सौ.लता रामेश्श्वर राणे,
रा.कळाशी, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. सौ.उषा रामेश्वर खबळकार
रा.कळाशी, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**विषय - मौजे कळाशी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील गट नं.११३ चे बाबत अपिल अर्ज**
**संदर्भ - अपिलार्थी यांचा अर्ज दिनांक ०६.११.२०२४**

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजा कळाशी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील गट नं.११३ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरार्थी नं.२ ते ४ हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसल्यामुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक १८.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक ११.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का

**(महेशकुमार शिंदे)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.काळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४८७/२०२६
**अल्का व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२२.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Alka Ashokrao Jiwarkar Age 61 Yrs. Occu.: Nil
2. Rohit Ashokrao Jiwarkar Age 39 Yrs. Occu.: Business
3. Kunal Ashokrao Jiwarkar Age 36 Yrs. Occu.: Business
4. Mayuri Ashokrao Jiwarkar, Age 30 Yrs. Occu.:
All R/o Tirupati Nagar, Shankar Nagar Road, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक अशोक रामभाऊ जिवरकर** हे दिनांक 21.01.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अल्का व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अल्की व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३३३/२०२६
**श्रीमती रजनी अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.३०.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Rajni Vinodrao Ugale, Age 64 Yrs. Occu.: Household
R/o Kathora Road, Shiromani Apartment, Konark Colony, VMV Amravati
2. Deepak Vinod Ugale, Age 44 Yrs. Occu.: Labour
R/o 402, Kuani Kiran Avenue, Vishal Nagar, Pimple Nilakh, Pune City, Pune Aundh Camp, Maharashtra-411027
3. Sonali Pravin Thakare, Age 43 Yrs. Occu.: Household
R/o Konark Colony, Behind Rangoli Lawn, Near Shromani Apartment, Amravati VMV. Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक विनोद महादेवराव उगले** हे दिनांक 04.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रजनी अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रजनी अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर सुचना

सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **श्री.सुरेंद्र नथ्थुजी हिरुळकर,** रा.चंदन न गर, अकोली रोड, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सुचित करण्यात येते की, माझे पक्षकारांनी सदर प्लॉटचा सौदा दिनांक ०५.०५.२०२५ रोजी **श्री.प्रफुल रामदास ढोके** रा.बडनेरा, ता.जि.अमरावती यांचेसोबत केलेला आहे. सदरहू प्लॉट मौजे चांदूरी प्रगणे बडनेरा, जि.अमरावती येथील शेत भूमापन नं.५३ लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेला प्लॉट, खुला प्लॉट नं.२४८ याची साईज क्षेत्रफळ ८२८.८३ चौ.फुट, याची चतुःसिमा--

पुर्वेस - प्लॉट नं.२१७
पश्चिमेस - लेआऊट मधल रोड
उत्तरेस - प्लॉट नं.२४९
दक्षिणेस - प्लॉट नं.२४७

याप्रमाणे चतुःसिमेतील प्लॉट माझे पक्षकारास विकण्याचा सौदा केला आहे. परंतु सदर प्लॉट प्रकरण विद्यमान न्यायालय, अमरावती येथे न्यायप्रविष्ठ आहे. तरी सदर प्लॉटचा व्यवहार हा लिहून घेणार व लिहून देणार यांचे संमतीने झाला. सदर प्लॉटवर अन्य कोणत्याही व्यक्तिने व्यवहार करु नये असे माझ्या पक्षकाराचे म्हणणे आहे.

(ॲड.प्रकाश के.खंडारे)
साईनगर, अमरावती
ता.जि.अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४८८/२०२६
**कमल व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२१.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Kamal Keshavrao AmbalkarAge 77 Yrs. Occu.: Nil
R/o Camp Road, Near Holycross School, Lokmanya Colony, Amravati
2. Amol Keshavrao Ambalkar Age 47 Yrs. Occu.: Service
R/o 26/14 Vijay Nagari Annex Ghodbunder Road, Suraj Water Park, Thane West Thane
3. Yogesh Keshavrao Ambalkar] Age 45 Yrs. Occu.: Service
R/o C-10/302, Raunak City, Adharwadi Jail Road, Near Do Bosco School, Kalyan West Kalyan Dist.Thane
4. Amit Keshavrao Ambalkar, Age 43 Yrs. Occu.: Service
R/o Camp Road, Near Holycross School, Lokmanya Colony, Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक केशवराव लक्ष्मणराव अंबाळकर** हे दिनांक 13.10.2014 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कमल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कमल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कडधान्य आयातीवरून 'सर्वोच्च' कानपिचक्या

## धोरणाचा पुनर्विचार करण्याचे केंद्राला निर्देश

**नवी दिल्ली**
कडधान्य आयातीच्या मुद्यावरून सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला चांगल्याच कानपिचक्या दिल्या असून सध्याच्या धोरणात्मक चौकटीचा पुनर्विचार करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच शेतकऱ्यांना पारंपरिक पिकांऐवजी कडधान्य पिकांकडे वळवण्यासाठी प्रोत्साहनपर पर्याय शोधावा, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

पिवळा वाटाण्याच्या मुक्त आयातीमुळे देशात तूर आणि हरभऱ्यासह इतर कडधान्यांचे भाव पडल्यानंतर किसान महापंचायतीने आयातीवर निर्बंध घालण्याच्या मागणीसाठी मे २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर नुकतीच सुनावणी झाली आहे. किसान महापंचायतीच्या बाजूने वरिष्ठ वकील प्रशांत किशोर यांनी बाजू मांडली. तर केंद्र सरकारच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल वेंकटरामन यांनी युक्तिवाद केला.केंद्र सरकारने डिसेंबर २०२३ मध्ये पिवळ्या वाटाण्याच्या आयातीवरील ५० टक्के आयात शुल्क आणि प्रति किलो २०० रुपये किमान आयात मूल्य काढून टाकले होते.

तसेच या धोरणाला ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली. 'मुक्त आयातीमुळे देशात पिवळ्या वाटाण्याची आयात ३५०० रुपयाने होत आहे. देशातील सर्वच कडधान्याच्या तुलनेत खूपच कमी भावात पिवळा वाटाणा आयात केला जात आहे आणि यामुळे देशात भाव पडले आहेत,' असे किसान महापंचायतीने आपल्या वारी



याचिकेत म्हटले आहे.

किसान महापंचायतीने मे महिन्यात याचिका दाखल झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला सप्टेंबर २०२५ मध्ये नोटीस पाठवली होती. त्यानंतर सरकारने ऑक्टोबर २०२५ पासून पिवळा वाटाणा आयातीवर ३० न टक्के शुल्क लागू केले. केंद्र सरकारने देशात - कडधान्य उत्पादन वाढविण्यासाठी ६ वर्षांचे 'राष्ट्रीय कडधान्य आत्मानिर्भरता अभियान' सुरू केले आहे. या योजनेसाठी सुमारे ११ हजार ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात खरेदीची व्यवस्था मजबूत करण्याचा आहे. आली आहे. या योजनेचा उद्देश हमीभावाने परंतु कडधान्य आयातीसंबंधी असलेली धोरणे या उद्दिष्टाशी सुसंगत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे महापंचायतीने न्यायालयात केंद्रीय कृषिमंत्र्यांनी नुकसान होत आहे, असा दावा याचिकेतून किसान महापंचायतीने केला आहे. किसान कडधान्य आयातीबाबत केलेल्या वक्तव्याची आठवण करून दिली. केंद्रीय कृषिमंत्र्यांनीही हा विषय गंभीर असल्याचे मान्य करत अन्न लिहून पिवळ्या वाटाण्यावरील आयात शुल्क पुरवठा व ग्राहक व्यवहार मंत्रालयाला पत्र वाढवण्याचा सल्ला दिला होता. पिवळ्या वाटाण्याच्या आयातीचे दर देशातील प्रमुख आहेत. त्यामुळे देशांतर्गत शेतकऱ्यांचे संरक्षण कडधान्याच्या हमीभावापेक्षा खूपच कमी करण्यासाठी सुमारे ५० टक्के आयात शुल्क लावणे आवश्यक असल्याचे कृषिमंत्र्यांनी सुचवल्याचे किसान महापंचायतीने याचिकेत नमूद केले आहे. दरम्यान, २०२४ नंतर पोहोचली असून देशातील कडधान्य उत्पादक भारतात कडधान्य आयात विक्रमी पातळीवर शेतकऱ्यांवर आर्थिक दबाव वाढल्याचे याचिकेत म्हटले आहे.


### 'विविध मंत्रालयांनी एकत्र काम करावे'

शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी वेगवेगळ्या मंत्रालयांनी सोबत काम करणे आवश्यक आहे. विशेषतः शेतकरी आणि ग्राहकविषयक काम पाहणाऱ्या मंत्रालयांनी एकत्र येऊन काम करावे. तसेच शेतकऱ्यांना केल्या आहेत. ही व्यवस्था हमीभावाशी आपला माल विक्री करण्यासाठी विश्वासार्ह व्यवस्था उभारावी, अशा सूचना न्यायालयाने संलग्न असावी जेणेकरून शेतकऱ्यांज रास्त यांनी केली. परतावा मिळावा, अशी सूचना प्रशांश भूषण यांनी केली.

### व्यवस्था उभारण्याचे आदेश

'हमीभाव खरेदीची अंमलबजावणी, शेतीमालाची वेळेवर खरेदी आणि आयात होणाऱ्या पिवळ्या वाटाण्याच्या किमतीचे नियमन केल्यास शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारातील चढउताराचा फटका बसणार नाही. यासाठी सध्याच्या धोरणात्मक चौकटीचा पुनर्विचार करण्यासाठी आणि कडधान्य आयातीचे नियमन करण्यासाठी कडधान्य मूल्यसाखळीतील सर्व घटकांची बैठक बोलवावी,' अशी सूचना न्यायालयाने केली आहे. पारंपरिक पिकांपासून कडधान्यांकडे वळण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल आणि त्याचबरोबर हमीभावाचा आधारही मिळेल, अशी धोरणात्मक व्यवस्था या चर्चामधून निर्माण करावी. आम्हाला आशा आहे की मंत्रालय नवीन धोरणात्मक व्यवस्थेद्वारे हा प्रश्न सोडवू शकेल, असेही निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. तसेच चर्चेचे तपशील आणि झालेल्या सल्लामसलतीचा निष्कर्ष न्यायालयासमोर सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## संक्षिप्त



### जिल्हा परिषद माध्यमिक शाळा येथे माजी विद्यार्थी मेळावा

**लेहेगाव**-जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा सावरखेड पिंगळाई येथे माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता.या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सावरखेड च्या प्रथम नागरिक ललिता जोमदे,निलेश टारप,कैलाससिंह ठाकुर आणि सावरखेड केंद्राचे केंद्रप्रमुख सुनील बोकाडे यांनी उपस्थितीत होते.कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलनाने करण्यात आली. आपण आपला अधिकार म्हणून याच शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले आणि आज आपण विविध पदावर कार्यरत आहोत. तीच शाळा,तेच पवित्र मंदिर त्याप्रती आपले कर्तव्य म्हणून शाळेचे विकासाच्या कार्यात आपले सहकार्य अत्यंत महत्त्वाचे ठरते त्यासाठी कोणत्याही प्रकारे श्रमदान,आर्थिक दान, वस्तू दान,शालेय रंगरंगोटीसाठी आपले योगदान यापैकी कोणतीही बाब जे आपणास शक्य असेल ते करणे आजची गरज आहे हे ओळखून सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन निलेश टारपे,कैलाससिंह ठाकूर,ललिता जोमदे,सुनील बोकाडे, राजीव चव्हाण,जयंत पोहरे यांनी आपले विचार मांडताना केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक राजू चव्हाण, संचालन जयंत पोहरे, तर आभार प्रदर्शन विजयसिंह ठाकूर यांनी केले. यशस्वीतेसाठी सविता महल्ले,संगीता पोहरे, सुषमा ईसळ, वंदना पुसदेकर यांनी सहकार्य केले.



### संवेदना आरोग्य केंद्राचा उपक्रम

**अमरावती** - जनकल्याण सेवा संस्था संचालित संवेदना आरोग्य केंद्राच्या वतीने सेवा प्रसार उपक्रमांतर्गत माया नगर, गोपाल नगर जवळ येथे श्री हनुमान मंदिरात निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी झाले. डॉ.हेडगेवार हॉस्पीटलचे डॉ.स्वप्नील चव्हाण (एम. डी.)यांच्या प्रमुख मार्गदर्शनात सुमारे ९० पेक्षा अधिक नागरिकांनी या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला.या शिबिरात सहायक डॉ.चव्हाण यांना डॉ.भूषण सांगळे, परिचारिका मोनिका कंगाले, आरती करवले,विजया चिखलकर,कोमल कुकडे, अनिकेत कराळे, विकी भुरभुरे, वैभव गवई, शुभम शेटे यांचे सहकार्य लाभले. कर्मचारी वर्गाच्या सहकार्य शिबिर शिस्तबद्ध व व्यवस्थित झाले. शिबिराच्या सुरुवातीला डॉक्टरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. निलेश डवले यांनी सहकार्य केले.

### कृत्रिम टंचाई आणि साठेबाजी रोखण्यासाठी तहसीलदारांचा धडाका

## घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर आढळल्यास कठोर कारवाईचे आदेश

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**
इंधन तसेच गॅस पुरवठ्याबाबत सध्या नागरिकांमध्ये निर्माण होणारा संभ्रम दूर करण्यासाठी आणि घरगुती गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी अंजनगाव सुर्जी तालुका प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. घरगुती गॅसचा अवैध वापर, साठेबाजी किंवा काळाबाजार करताना कोणी आढळल्यास संबंधितांवर थेट गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी दिला आहे.

दरम्यान, तालुका प्रशासनाने विशेष भरारी पथक स्थापन केले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिस्थितीमुळे इंधन आणि गॅस पुरवठ्याबाबत नागरिकांमध्ये विविध अफवा पसरत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये अनावश्यक भीती किंवा संभ्रम निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाकडून विशेष खबरदारी



घेतली जात आहे.जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली घरगुती गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी तालुका प्रशासनाने धडक मोहीम हाती घेतली आहे. यामध्ये गॅस एजन्सींना पारदर्शक पद्धतीने वितरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.कोणत्याही प्रकारे कृत्रिम टंचाई निर्माण होणार नाही, ग्राहकांकडून जास्त दर आकारले जाणार नाहीत आणि घरगुती गॅसचा वापर व्यावसायिक आस्थापनांमध्ये होणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्व गॅस एजन्सींनी शासनाच्या सूचनांनुसार प्राधान्यक्रम ठरवून वितरण प्रक्रिया पार पाडावी, ग्राहकांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.दरम्यान, तालुक्यातील हॉटेल, ढाबे, उद्योग व इतर व्यावसायिक आस्थापनांनी कोणत्याही परिस्थितीत घरगुती गॅसचा वापर करू नये, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर प्रचलित नियमांनुसार थेट गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी स्पष्ट केले.

**विविध ठिकाणी अचानक तपासणी**

काळाबाजार रोखण्यासाठी तालुका प्रशासनाने विशेष भरारी पथक स्थापन केले असून या पथकाच्या माध्यमातून हॉटेल, उद्योग व विविध आस्थापनांची अचानक तपासणी करण्यात येत आहे. या तपासणीत तहसीलदार पुष्पा सोळंके निरीक्षण अधिकारी रणजित रामाघर,पुरवठा निरीक्षक निखिल मनवरे यांच्या सह तपासणी पथकांनी धाबे हॉटेलची पाहणी केली. साठेबाजी, अवैध वापर किंवा नफेखोरीचे प्रकार आढळल्यास तात्काळ कठोर कारवाई करण्यात येईल, असेही प्रशासनाने सांगितले. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये किंवा एजन्सीसमोर अनावश्यक गर्दी करू नये. असे आव्हान तहसीलदार यांनी केले आहे.

## पट्टाभि श्रीराम मंदिरात 'श्रीराम नवमी महोत्सव'

**अमरावती** - स्थानिक कुंभारवाडा येथील ऐतिहासिक पट्टाभी श्रीराम मंदिर संस्थानच्या वतीने यंदाही श्रीराम नवमी महोत्सव २०२६' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी गुरुवार, १९ ते २७ मार्च २०२६ या कालावधीत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.महोत्सवाचा मुख्य आकर्षण असलेला 'श्रीराम जन्मोत्सव' सोहळा २६ मार्च दुपारी ठीक १२:०० वाजता पार पडणार आहे. या मंगलमयी सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून खा. डॉ. अनिल बोंडे,खा. बळवंत वानखडे, आ.संजयभाऊ खोडके,आ. सुलभा खोडके, अमरावती महानगर पालिकेचे महापौर तेजवानी, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, माजी महापौर तथा विरोधी पक्ष नेता विलास इंगोले, नगरसेवक सुनीता भेले,ललिता रतावा,संजय शिरभाते,अनिल अग्रवाल,संजयभाऊ तिरथकर आणि श्रमिक पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष गिरीश शेरेकर उपस्थित राहणार आहेत.यानिमित्त भजन मंडळांच्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महोत्सवाचे नियोजन संस्थानचे अध्यक्ष डॉ. विलास नांदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. याप्रसंगी अंबादास नलगे,राजेश हरमकर, सहसचिव गोपाल कळसकर आणि विवेक अंबुलकर यांच्यासह हरिसिंग ठाकूर, संजय खारकर,महेश नांदुरकर, लक्ष्मण शिरभाते, सुरेश पाखरे,मीना गुल्हाने,संगीता तिप्पट,मनोहर भुरे आणि विनोद खडसे यांनी अमरावतीकर भाविकांना या नऊ दिवसीय महोत्सवात सहभागी होऊन प्रभू श्रीरामाच्या दर्शनाचा व भजनांच्या मंगलमय वातावरणाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## महिला दिनानिमित्त पु.संत गाडगेबाबा विद्यालयात माता-पालक मेळावा

**चांदुर रेल्वे/ वार्ताहर**
जागतिक महिला दिनानिमित्त पु.संत गाडगेबाबा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मांजरखेड (कसबा )येथे माता-पालक मेळाव्याचे भव्य व उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला गावातील माता-पालक, शिक्षिका तसेच मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थाप्रमुख प्रा.बी.आय. इंगळे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे उद्घाटन सुभाषजी सहारे (केंद्रप्रमुख) मांजरखेड (कसबा) यांच्या हस्ते करण्यात आले.प्रमुख अतिथी म्हणून चांदुररेल्वे येथील नवनिर्वाचित महिला नगराध्यक्षा प्रा.प्रियंका निलेश विश्वकर्मा, प्रमुख वक्त्या व अतिथी म्हणून प्रा.निवेदिता वाघ,संस्थेच्या कोषाध्यक्षा साधना इंगळे तसेच मांजरखेडच्या सरपंच पल्लवी देशमुख, भावना ढगे व चांदुररेल्वे येथील माजी नगरसेवक रवीभाऊ दीक्षित यांची विशेष उपस्थिती लाभली.कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य यु.आर.ढगे यांनी केले. तसेच सुभाषजी सहारे उद्घाटक यांनी आपल्या भाषणातून ग्रामीण भागातील महिलांचा सहभाग विद्यार्थ्यांच्या जडणघडणी करिता किती महत्त्वाचा आहे याबद्दल सांगितले.यावेळी प्रमुख वक्त्या



प्रा.निवेदिता वाघ यांनी आपल्या भाषणातून महिलांचे शिक्षण,आत्मविश्वास व सशक्तीकरण यावर भर दिला. नगराध्यक्षा डॉ. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांनी महिलांनी शिक्षण व सामाजिक कार्यात पुढे येण्याचे आवाहन केले. विद्यार्थिनी यशस्वी भिल हिने आपल्या भाषणामध्ये सांगितले की,ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या कोण कोणत्या आहेत व त्या कशा पद्धतीने त्यावर मात करता येतात याबद्दल माहिती दिली. शिक्षिका खडसे यांनी आपल्या भाषणामध्ये देशातील मोठमोठ्या स्त्रियांनी आपले कर्तृत्व कसे सिद्ध केले याबद्दल माहिती दिली.कार्यक्रमाचे अध्यक्ष बी.आय.इंगळे यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये सर्वांनी स्त्रियांचा सन्मान करावा कारण स्त्रियाच मुलांच्या शिक्षक व माता असून मुलांवर संस्कार करण्याचे काम त्या करत असतात असे म्हटले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक हेमंत यावले यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन प्रा.निलेश मडघे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व कार्यरत शिक्षक त्यामध्ये पर्यवेक्षक सरदार, प्रा.धोटे, प्रा.शिरपूरकर, प्रा.पठाण, डॉ.प्रा. राऊत, शिक्षक सर्व बोरकर, सूर्यवंशी, यावले, माळोदे, काळे, इंगळे, गोहत्रे, प्रा.वर्षा इंगळे, प्रा.डोंगरे, प्रा.भांडे, प्रा.डॉ.रोटे, प्रा.बेलसरे प्रा.महाजन, प्रा.मनवर, समीर देशमुख शिक्षकेतर कर्मचारी रावसाहेब वानखडे, मनोहरे, प्रफुल कोराटे, अक्षय पळसपगार, वसंतराव नेवारे, शिवदास ढोके, सविता गवई, प्रतिभा शेंडे, तसेच लेक्सीकोन इंग्लिश शाळेतील मुख्याध्यापिका श्रद्धा देशमुख, सवाई, स्थूल, जाधव, ढोके तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते. या सर्वांचे कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी योगदान दिले. कार्यक्रमाचा शेवट सर्वांना अल्पोपहार देऊन करण्यात आला.

## पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकीतील ५१ विद्यार्थ्यांची 'सेडेमॅक मेकाट्रॉनिक्स लिमिटेड'मध्ये निवड

**अमरावती/ का.प्र.**
पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील कोअर विभागात अंतिम वर्षाला शिकत असलेल्या ५१ विद्यार्थ्यांची 'सेडेमॅक मेकाट्रॉनिक्स लिमिटेड' या प्रातिष्ठित कंपनीत महाविद्यालयातील कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड झाली आहे. 'सेडेमॅक मेकाट्रॉनिक्स लिमिटेड' ही नामांकित कंपनी ऑटोमोबाईल आणि औद्योगिक क्षेत्रासाठी अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक कंट्रोल युनिट्स विकसित करणारी संशोधनकेंद्रित कंपनी, ही कंपनी ऑटोमोबाईल (दुचाकी व तिनचाकी) तसेच औद्योगिक क्षेत्रासाठी अत्यावश्यक असलेल्या इलेक्ट्रॉनिक कंट्रोल युनिट्स (ECUs) चे संशोधन, डिझाईन व उत्पादन करणारी संशोधनकेंद्रित संस्था आहे. कंपनीच्या प्रमुख उत्पादनांमध्ये



इंटिग्रेटेड स्टार्टर जनरेटर (ISG) तसेच फ्युएल इंजेक्शन सिस्टिम्स यांचा समावेश आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ३१ विद्यार्थी इलेक्ट्रिकल इंजीनिअरिंग विभाग व २० विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्यूनीकेशन इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ पी. एम. जावांधिया, कॉर्पोरेट रिलेशन डीन प्रा. मोनिका जैन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रतीक भट्टड, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे विभाग प्रमुख डॉ उमेश होरे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे विभाग प्रमुख डॉ. संजय बी वरकड, तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्लेसमेंट कोऑर्डिनेटर प्रा. अनिकेत पावडे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्लेसमेंट कोऑर्डिनेटर प्रा. सचिन जळीत यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## बकिंगहॅम कंपनीचा ५०० हून अधिक शेतकऱ्यांच्या जमिनीवर दावा

**चांदुर रेल्वे/ वार्ताहर**
चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर व धामणगाव रेल्वे तालुक्यातील सुमारे ५०० हून अधिक शेतकऱ्यांच्या जमिनीवर कलकत्ता येथील बकिंगहॅम लिमिटेड कंपनीने मालकी हक्काचा दावा केला आहे. १९३५ च्या सुमारास जिनिंग-प्रेसिंग व्यवसाय करताना कंपनीने शेतकऱ्यांना कर्ज देऊन त्यांच्या जमिनी गहाण घेतल्या होत्या. नंतर कंपनीच्या संचालकांनी या जमिनी शेतकऱ्यांना विकल्या असल्या तरी कंपनीतील अंतर्गत वादानंतर सुप्रीम कोर्टाने जमीन कंपनीच्या मालकीची असल्याचा निकाल दिला. या निकालाच्या आधारे कंपनीने १९७८ मध्ये दावा दाखल केला होता. २००० मध्ये कंपनीच्या बाजूने निकाल लागला आणि त्याविरोधात दाखल अपीलचा निकालही फेब्रुवारी २०२६ मध्ये कंपनीच्या बाजूने लागला.

त्यामुळे आता कंपनीकडून सर्व जमीन आपल्या नावावर करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.या पार्श्वभूमीवर बाधित शेतकऱ्यांनी पुढील कायदेशीर लढ्यासाठी चांदूर रेल्वे येथे माजी आमदार प्रा. विरेंद्र जगताप यांच्या उपस्थितीत बैठक घेतली. शेतकऱ्यांनी ही कंपनीची सामान्य शेतकऱ्यांची जमीन लुबाडण्याची साजिश असल्याचा आरोप केला असून पुढील लढा विधी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनात लढण्याचा निर्णय घेतला आहे.

## पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकीमध्ये टी.सी.एस.तज्ज्ञांद्वारे करिअर मार्गदर्शन

**अमरावती/ का.प्र.**
पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात आयइइइ (IEEE) विद्यार्थी शाखेच्या वतीने नुकतेच विशेष करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) चे चीफ टेक्नॉलॉजी आर्किटेक्ट अभिजीत अनंत महांकाळ यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील संधी आणि आयटी क्षेत्रातील आव्हाने यावर सखोल मार्गदर्शन केले. दोन सत्रांत प्रभावी मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन या कार्यक्रमाचे दोन भागात नियोजन करण्यात आले होते.विशेषतः 'Gen-Z' पिढीसाठी आयटी क्षेत्रातील महत्त्वाची क्षेत्रे आणि मुलाखतीचे कौशल्य कसे आत्मसात करावे, यावर त्यांनी भर दिला.दुसऱ्या सत्रात 'भविष्य कौशल्ये' या



विषयावर चर्चा झाली. यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) चे भविष्य, आवश्यक टेक्नॉलॉजी स्टॅक, TCS NQT आणि CodeVita यांसारख्या स्पर्धात्मक परीक्षांची माहिती देण्यात आली. तांत्रिक कौशल्यासोबतच टाइम मॅनेजमेंटचे महत्त्वही त्यांनी विषद केले. यामध्ये इंडस्ट्री-अकॅडमिया गॅप कसा भरून काढता येईल,यावर चर्चा झाली.या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे डॉ. विवेक कुटे (डीन, संशोधन व विकास) आणि प्रा. प्रतीक भट्टड (प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी) यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन IEEE विद्यार्थी शाखेचे समुपदेशक अशिष दुचकके आणि विद्यार्थी शाखा अध्यक्ष प्रथमेश अडे यांनी केले.या सत्राचा लाभ महाविद्यालयातील असंख्य विद्यार्थ्यांनी घेतला.

GHARKUL Masale
**पाहिजेत**
**ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.**
**: संपर्क :**
**घरकुल मसाले फॅक्टरी, एमआयडीसी. अमरावती**

# मनपाच्या आमसभेमध्ये विषय समित्यांची घोषणा





**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या दुसऱ्या आमसभेमध्ये आज एकदा पुन्हा शहरातील स्वच्छतेच्या मुद्द्यावर घमसान पाहायला मिळाले. सोबतच या सभेमध्ये स्वच्छता समितीमध्ये एकही महिला नगरसेविकाचा सहभाग न केल्याचा मुद्दाही समोर आला. या सभेमध्ये स्वच्छता समितीची पुर्ननियुक्ती करण्यात आली. तसेच विधी, शहर सुधार, शिक्षा, महिला व बालकल्याण

## भाजपसह राकाॅ व युवा स्वाभिमानचे वर्चस्व

व वृक्ष प्राधिकरण समितीची घोषणा करण्यात आली. यासाठी सर्वपक्षीय गटनेत्यांनी आपल्या पक्षांच्या सदस्याचे नावे समोर केली. चारही समितीमध्ये ९-९ सदस्यांना नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच वृक्ष प्राधिकरण समिती ही बनविण्यात आली आहे. यापूर्वी झालेल्या आम सभेमध्ये स्वच्छतेच्या मुद्द्यावर चांगलाच गोंधड झाला होता. आठ ते नऊ तास स्वच्छतेच्या मुद्द्यावर रंनकंदन झाले होते. यानंतर ही दुसरी आमसभा आज बोलविण्यात आली. या



सभेमध्ये पुन्हा एकदा स्वच्छता समितीची नियुक्ती करण्यात आली. वेगवेगळ्या पक्षाच्या सदस्यांना यामध्ये सहभागीं केले आहे. मनपाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये झालेल्या सभेमध्ये वेगवेगळ्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. पिठासीन सभापती व महापौर श्रीचंद तेजवानी यांनी स्वच्छता समितीची पुर्ननियुक्ती केली. मनपा आम सभेमध्ये विषय समिती बनविण्यात ☞(पान २ वर)

# पेपरफुटी प्रकरणातील दुसराही आरोपी निलंबित

### निलंबित शिक्षकाला दिले थंड हवेचे चिखलदरा ठिकाण

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** संपूर्ण राज्यात खळबळ माजवून देणाऱ्या २७ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या शालांत परीक्षा पेपरफुटी आणि चोरी प्रकरणातील फरार असलेला दुसरा आरोपी सुशिल अभ्यंकरला अखेर १७ दिवसांनंतर प्रशासनाने कठोर पाऊल उचलत निलंबितचा आदेश काढला आहे.



अंजनगाव सुर्जी येथे २७ फेब्रुवारी २०२६ रोजी कस्टडी मध्ये हा प्रकार उघडकीस आला. इंग्रजी पेपर दरम्यान दोन विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकामध्ये भरारी पथकाला अनियमितता आढळली होती. तपासात हे प्रकरण केवळ उत्तर पत्रिकाचोरी पुरतेच नसून संगनमताने झालेल्या गैरप्रकाराकडे निर्देश करत असल्याचे स्पष्ट झाले. या धक्कादायक प्रकारानंतर पोलीसांनी तात्काळ गुन्हे दाखल करत तपासाची चक्रे फिरवली. या प्रकरणात संबंधित असणाऱ्यावर विविध कायद्यानुसार गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. प्राथमिक पुराव्यानुसार त्यांच्यावर संशयाची सुई थेट फिरली आणि अखेर जिल्हा ☞(पान २ वर)

# ‘गरीबांच्या झोपड्यांवर बुलडोझर; न्याय कुठे?’

## नुकसानभरपाई न दिल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**वरूड-प्रतिनिधीः-** वरूड नगरपरिषदेतर्फे आठवडी बाजार परिसरातील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईदरम्यान गोरगरीब नागरिकांच्या झोपड्या व घरांवर करण्यात आलेल्या कारवाईचा तीव्र निषेध नोंदवत तानाजी नाकट मित्र परिवाराच्या वतीने नगरपरिषद वरूड येथे जोरदार धडक देण्यात आली. या कारवाईत नुकसान झालेल्या सर्व कुटुंबांना तात्काळ नुकसानभरपाई द्यावी, अन्यथा आठ दिवसांत तीव्र आंदोलन



उभारले जाईल, असा ठाम इशारा सामाजिक कार्यकर्ते तानाजी नाकट यांनी दिला आहे.

मागील काही दिवसांपूर्वी नगरपरिषद प्रशासनाने आठवडी बाजार परिसरातील अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली कारवाई केली. मात्र या कारवाईत अनेक गोरगरीब कुटुंबांच्या झोपड्या व घरांवर बुलडोझर फिरविण्यात आल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले. अनेक कुटुंबे अक्षरशः उघड्यावर आली असून त्यांच्या डोक्यावरचे छप्पर हिरावले गेले आहे. याबाबत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत तानाजी नाकट यांनी सांगितले की, अतिक्रमण हटविणे चुकीचे नाही, ☞(पान २ वर)

# मनपा व्यापारी संकुल भाडे व लीज वृद्धीवर निर्णय रखडला

## आमसभेमध्ये समितीच्या शिफारशीला स्थगिती

### नव्याने होणार सर्वेक्षण

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या आमसभेमध्ये आज मनपाच्या पाच प्रमुख व्यापारी संकुल यांच्या भाडे आणि लीज करारावर नियमानुसार वृद्धी करण्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. प्रशासक राज मध्ये विशेषज्ञ समितीद्वारे भाडे आणि लीज



संदर्भात घेतलेल्या शिफारशी आमसभे समोर ठेवण्यात आल्या. यामध्ये विरोधी पक्षांनी मनपाच्या आर्थिक परिस्थिती आणि बाजाराच्या सध्याच्या भावानुसार प्रस्तावित भाडे अत्यल्प असल्याचे म्हटले. दोन्ही पक्षाने यावर आक्षेप उचलल्यानंतर सभापती व महापौर श्रीचंद तेजवानी यांनी मागील समितीच्या शिफारिशींना स्थगिती दिलेली आहे. तीन महिन्याच्या आत यावर नवीन समिती बनवून व्यापारी संकुलांचे नव्याने सर्वेक्षण करण्याचे त्यांनी म्हटले. यामुळे व्यापारी संकुल भाडे आणि लीज करार वृद्धीचा मुद्दा समोर ढकल्या गेल्या. यामुळे आता नव्याने सर्वेक्षण होऊन भाडे वृद्धीवर निर्णय ☞(पान २ वर)

# नांदगाव केंद्रावर शासकीय चना खरेदीचा शुभारंभ

**नांदगाव खंडेश्वर / प्रतिनिधीः-** शासकीय हमीभाव योजनेअंतर्गत नाफेडच्या वतीने स्थानिक खरेदी विक्री संस्थेमार्फत १७ मार्च रोजी खरेदी विक्री संस्थेच्या गोडाऊनमध्ये ५८७५ या हमीभावाने चना खरेदीचा शुभारंभ झाला. यावेळी तालुक्यातील धानोरा फसी येथील शेतकरी केशव नारायण ढेरे यांच्या चण्याची सर्वप्रथम मुहूर्तावर खरेदी करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष परीक्षित ढेकेकर पाटील यांनी काटा पूजन करून शेतकरी केशव ढेरे यांना शाल



व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. शुभारंभाच्या वेळी संस्थेचे माजी वयोवृद्ध अध्यक्ष मानकचंद जैन यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष परीक्षित ढेकेकर, उपाध्यक्ष भालचंद्र☞(पान २ वर)

# स्वीकृत नगरसेवक सय्यद मुनज्जर आली यांचे सदस्यत्व रद्द

## मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** एमआयएम द्वारे सय्यद मुनज्जर अली सैं. मुजफ्फर यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्त करण्यात आले होते. सय्यद मुनज्जर महानगरपालिकेमध्ये कंत्राटदार असल्याने त्यांचे स्वीकृत नगरसेवक पद तात्काळ प्रभावाने मनपा आयुक्त सोम्या शर्मा यांनी रद्द करण्याचे निर्देश दिले आहे. माहितीनुसार २० फेब्रुवारी रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती करण्यात आली होती.



यावेळी एमआयएम गटनेचा शेख हमीद शेख वाहेद यांनी स्वीकृत नगरसेवक म्हणून सै.मुनज्जर यांचे नाव प्रस्तावित केले होते. एमआयएमच्या वतीने त्यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती करण्यात आली. सभा संपल्यानंतर माहित झाले की, सै.मुनज्जर महानगरपालिकेमध्ये कंत्राटदार आहे. यामुळे त्यांना शो कॉज नोटीस पाठविण्यात आली होती. ९ मार्च रोजी यावर सुनावणी झाली. यावेळी सै.मुनज्जर यांनी ☞(पान २ वर)

# मोर्शीतील अर्धवट पुलासाठी कॉंग्रेसचा रस्ता रोको!

## १७ एप्रिलपर्यंत काम पूर्ण करण्याचे आश्वासन!



**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी येथील नळा नदीवरील अर्धवट पुलाचे बांधकाम तात्काळ पूर्ण करण्यात यावे या मागणीसाठी आज दि.१७ मार्च रोजी माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या मार्गदर्शनात काँग्रेसचे मोर्शी वरुड विधानसभा प्रमुख श्रणीत राऊत यांच्या नेतृत्वात पुलावर बसून आंदोलन छेडण्यात आले.यावेळी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोर्शी वरूड या राष्ट्रीय महामार्गावर बसून रस्ता रोको आंदोलन ☞(पान २ वर)

# पोलिसांनी २४ तासांत लावला अल्पवयीन मुलीचा शोध

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** रहिमापूर पोलीस स्टेशन हद्दीतील विहिगाव येथील मुलगी १६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता ‘टायपिंगला जाते’ असे आजोबांना सांगून घराबाहेर निघून गेली होती, पण संध्याकाळपर्यंत मुलगी परतली नसल्याने आजोबांनी परिसरात चौकशी केली. आई व आजी कामावरून परतल्यावर त्यांनीही नातेवाईकांकडे फोन करून शोध घेतला, पण पत्ता लागला नाही. अखेर आईने त्याच संध्याकाळी रहिमापूर पोलीस स्टेशनमध्ये



फिर्याद दिली व तक्रारीमध्ये अज्ञात व्यक्तीने मुलीला फुस लावुन पळवून नेल्याचा संशय नोंदवला. सदर प्रकरण अल्पवयीन मुलीगी गायब झाल्याचे असल्याने व गंभिर असल्याने ठाणेदार अनंत वडतकर यांच्या☞(पान २ वर)

# जिल्हा नियोजनचा निधी २५ मार्चपूर्वी खर्च करावा

### -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा नियोजन व विकास समितीमधील संपूर्ण निधीचे वितरण करण्यात आले आहे. तसेच आवश्यक असलेल्या सर्व मान्यता देण्यात आल्या आहे. त्यामुळे यंत्रणांनी २५ मार्चपूर्वी निधी खर्च करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हा नियोजनच्या खर्चाबाबत अंतिम बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपवनसंरक्षक अर्जूना के. आर., जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, जिल्हा कोषागार अधिकारी शिल्पा पवार यांच्यासह कार्यान्वयन यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, यावर्षीच्या जिल्हा वार्षिकच्या निधीमधून एकही रूपया परत करू नये. व्यपगत होणारा निधी तातडीने जिल्हा नियोजनला कळविण्यात यावा. तसेच हा निधी परत करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच यंत्रणांना निधीची आवश्यकता असल्यास त्याची माहिती सर्व मान्यतासह सादर करण्यात यावी. या कामांच्या गरजेनुसार निधी देण्यात येईल. जिल्हा वार्षिकच्या जिल्ह्यातील कामांना २५ मार्चची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे खर्चाबाबत सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी.

यंत्रणांनी कामे पूर्ण केली असल्यास देयके तातडीने कोषागारामधून आहरित करण्यात यावी. तसेच आभासी वैयक्तिक ठेव लेखा या यंत्रणेचा उपयोग करण्यात यावा. या यंत्रणेचा उपयोगाने निधी एक वर्षापर्यंत उपयोगात आणू शकता येणार आहे. या सेवेच्या माहिती करून द्यावी, जिल्ह्यातील यंत्रणांच्या सहकार्य करण्यासाठी कोषागार कार्यालयाने मदत करावी. त्यामुळे यंत्रणांनी वेळेवर निधी समर्पित करू नये, असे निर्देश दिले. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे ☞(पान २ वर)


# परिवहनेत्तर नवीन वाहनांसाठी नवीन वाहन मालिका

**अमरावती/प्रतिनिधीः-** परिवहनेत्तर ( दुचाकी) संवर्गातील नवीन वाहनांसाठी नवीन वाहन मालिका सुरू करण्यात येत आहे. इच्छुक अर्जदारांनी शुक्रवार, दि. २० मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांकाच्या विहित शुल्काच्या डिमांड ड्राफ्टसह अर्ज परिवहन कार्यालय, कॅम्प, अमरावती, खिडकी क्रमांक -२५ येथे जमा करावेत. वाहन ज्याच्या नावावर असेल त्या व्यक्तीच्या नावाच्या अर्जासोबत त्यांच्या पत्त्याचा पुरावा, पॅन कार्ड जोडावे. तसेच अर्जामध्ये वाहन ज्या व्यक्तीच्या नावे आहे, त्या व्यक्तीचा आधारकार्डला संलग्न असलेला भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. पसंती क्रमांक डिमांड ड्राफ्ट अमरावती, कॅम्प ब्रांच, ट्रेझरी ब्रांच कोड नं ००३८६६ साठी देय असावा.

एका पसंती क्रमांकासाठी एकच अर्ज आला असेल, त्यांची व एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोनपेक्षा जास्त अर्ज आले असतील, त्यांच्या पसंती क्रमांकाची यादी दि. २० मार्च २०२६ रोजी ४ वाजता कार्यालयातील☞(पान २ वर)

# चांगापूर हनुमान मंदिरात पोलिसांची मॉक ड्रिल, एक अतिरेकी ठार, एक ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी गुढीपाडवा, रमजान ईद, रामनवमी, हनुमान जयंती तसेच व्हीव्हीआयपी यांची सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्था अनुषंगाने चांगापूर हनुमान मंदिर येथे पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशाने दहशतवाद विरोधी पथकाचे मॉक ड्रिल घेण्यात आले. यामध्ये दोन शस्त्रधारी इसमांनी मंदिर परिसरात गोळीबार करून दोन भाविकांना ओलीस ठेवले होते. या माहितीवर जलद प्रतिसाद पथकातील कमांडो यांनी



उपनिरीक्षक अजय जाधव यांच्या निर्देशाने कुशलतेने आणि कार्यवाही करून कोणतीही मनुष्यहानी होऊ न देता एक अतिरेकीला ताब्यात घेतले व एका अतिरिक्यास जागीच ठार केले. दोन भाविकांची सुखरूप सुटका केले. ☞(पान २ वर)

# ८ घरगुती गॅस सिलेंडर जप्त

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** तहसीलदारांनी नेमलेल्या पथकाने धामणगाव, देवगांव आणि तळेगाव दशासर येथे तीन ठिकाणी धाड मारून ८ घरगुती सिलेंडर जप्त केले. देवगाव मधून ४ सिलेंडर जप्त करण्यात आले. तहसीलदार अभय घोरपडे यांनी कमर्शियल वापरासाठी घरगुती सिलेंडर चा वापर न करण्याची ताकीद दिली आहे. जिल्ह्यात सिलेंडर जप्तीची ही तिसरी कारवाई आहे. यापूर्वी अमरावती येथील एका हॉटेल आणि दर्यापूर ते अंजनगाव टी पॉईंट वर हॉटेलमध्ये कार्यवाही करून सिलेंडर जप्त करण्यात आले होते. इराण इस्त्राईल मध्ये सुरू युद्धामुळे सिलेंडरची टंचाई



निर्माण झालेली आहे.☞(पान २ वर)

# चहा कॅन्टीनच्या आड एमडी ड्रग्स तस्करी

## ३.५२ लाखाचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** चहा कॅन्टीनच्या आड एमडी ड्रग्सची तस्करी करणाऱ्या आरोपी महेश राजू खोडे (वय २६,समर्थवाडी, साईनगर) याला गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून ३ लाख ५२ हजार रुपये किमतीची २३.५३० ग्रॅम एमडी ड्रग्स जप्त करण्यात आली आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने अमली पदार्थांच्या विरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे.



या दरम्यान पथकाला आज मंगळवार १७ मार्चच्या सायंकाळी माहिती मिळाली की बेनाम चौक येथील एका चहा ☞(पान २ वर)